# जिम आणि लॅसी

रमा परूळकर



BVBK-0402776

# जिम आणि लॅसी

BVBK-0402776




रमा परुळकर

जिम आणि लॅसी

रमा परुळकर

पहिली आवृत्ती
२४ मार्च १९९३
चैत्र गुढीपाडवा



©
रमा परुळकर
बी/१० मीरा-मार सोसायटी,
३ रा मजला,
वीर सावरकर मार्ग, कॉलेज लेन,
दादर, मुंबई-४०००२८

**प्रकाशक**
वासुदेव (विवेक) शंकर परुळकर
बी/१० मीरा-मार सोसायटी,
३ रा मजला,
वीर सावरकर मार्ग, कॉलेजलेन,
दादर, मुंबई-४०००२८

**वितरक**
ग्रंथाली, द्वारा इं. एज्यु. सोसायटीची
महात्मा फुले कन्याशाळा,
बाबरेकर मार्ग, दादर (प), मुंबई-४०००२८

**मुखपृष्ठ/मांडणी/चित्रे**
अनिल दाभाडे

**अक्षरजुळणी/मुद्रक**
मोहन खैरे
जयमल्हार प्रिंटिंग प्रेस
२१७, आशिष इंडस्ट्रियल इस्टेट,
गोखले रोड (द), मुंबई-४०००२५

मूल्य : ४५ रुपये



चि. गौरी व चि. मयुरेश
या माझ्या नातवंडांस अर्पण



# मनोगत

'जिम व लॅसी' यांच्या गोष्टींचं पुस्तक मुलांच्या हाती देताना मला खूपच आनंद होत आहे. गेल्या वर्षी माझ्या अमेरिकेतील वास्तव्यात मी जॅक व लॅसीची टी. व्ही. सिरियल पाहिली. त्याचवेळी माझ्या मनात विचार आला की यावरून आपल्या भारतातील मुलांसाठी गोष्टी लिहिल्या तर ?

त्याच सुमारास माझे बंधू श्री. मंगेश पाडगावकर व सौ. यशोदावहिनी अमेरिकेतील माझ्या घरी काही दिवस मुक्कामाला आले असताना, त्यांना मी लिहिलेली गोष्ट वाचण्यास दिली. ती गोष्ट वाचून ते म्हणाले, ''अग, यावर मुलांसाठी छानसं गोष्टींचं पुस्तक होऊ शकेल.'' एवढ्या मोठ्या ज्येष्ठ व श्रेष्ठ कवीने पावती दिल्यावर माझा उत्साह अधिकच बळावला. त्यानंतर मी अनेक प्रसंगांवरून गोष्टी लिहायला सुरुवात केली.

लहानपणीच मुलांना काऊ-चिऊच्या, कुतुच्या गोष्टी ऐकून प्राणिमात्रांविषयी जवळीक निर्माण झालेली असते. मुलांना प्राण्यांविषयी वाटणारं प्रेम, जवळीक, सर्वकाही या गोष्टींमधून अनुभवायला मिळेल.

या गोष्टींमधील लॅसी फारच समजूतदार आहे. प्रत्येक संकटाच्या वेळी जीव धोक्यात घालून ती जिमला वाचवते. तिचा छोटा मित्र, जिमवर तिचं विलक्षण प्रेम आहे. जिमलाही तिच्यावाचून क्षणभर करमत नाही. या दोघांचं आगळंवेगळं प्रेम मुलांना भावणारं

आहे; प्राणिमात्रांविषयी ओढ निर्माण करणारं आहे. त्या दोघांचे सुखदु:खाचे अनेक प्रसंग मुलांना आपलेच वाटतील असे आहेत.

धाकटी बहीण या नात्यानं माझ्या विनंतीला मान देऊन माझे बंधू श्री. मंगेश पाडगावकर यांनी माझ्या या पुस्तकाला प्रस्तावना लिहून दिली. त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. तसेच ग्रंथालीच्या एक विश्वस्त सौ. उषा मेहता यांनी मला मोठ्या उत्साहानं सहकार्य दिलं त्याबद्दल त्यांचे मी आभार मानते. विशेष म्हणजे ग्रंथालीचे श्री. दिनकर गांगल यांनी या कामी बहुमोल सहकार्य करून हे पुस्तक आकाराला आणलं त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानते. हे पुस्तक छपाईला देण्यासाठी जिनं आपल्या सुवाच्य अक्षरात या गोष्टी लिहून दिल्या त्याबद्दल प्रीती प्रधान हिचेही आभार मानते.

या पुस्तकातील सुंदर चित्रे काढून हे पुस्तक अधिक बोलकं केलं त्याबद्दल चित्रकार श्री. अनिल दाभाडे यांचे मी मन:पूर्वक आभार मानते. तसेच जयमल्हार प्रिंटिंग प्रेसचे श्री. मोहन खैरे यांचेही अवश्य आभार मानायला हवेत.

हे पुस्तक मुलांनी आवडीनं वाचावं व आपल्या मित्रांनाही वाचायला सांगावं. याशिवाय दुसरं काय लिहू? सर्वात शेवटी माझे पती श्री. शंकर परुळकर, ज्यांनी मला हे पुस्तक लिहिण्यासाठी माझ्यात आत्मविश्वास व उत्साह निर्माण केला त्यांची मी सदैव ऋणी राहीन.

**- रमा परुळकर**



# प्रस्तावना

'जिम आणि लॅसी' हे सौ. रमा परुळकर हिचे पहिलेच पुस्तक आहे. खरे म्हणजे, पुस्तक आणि वाचक यांच्यात प्रस्तावनेचा अंतरपाट धरणाऱ्या पुरोहिताची काही गरज नाही. पण पारंपरिक रुढी म्हणा किंवा आधाराची स्वाभाविक गरज म्हणून म्हणा, आपले पहिले पुस्तक वाचकांपुढे घेऊन येणारे आम्ही बरेचसे लेखक हा प्रस्तावनेचा संकेत पाळतो, हे खरे.

सौ. रमा परुळकर अमेरिकेत असताना, तिथल्या टीव्हीवर 'जॅक ॲण्ड लॅसी' ही मालिका मुलांसाठी सुरू होणार होती. जॅक हा मुलगा आणि त्याची लाडकी कुत्री लॅसी यांचे एकमेकांवरील प्रेम आणि त्यांची अनेक साहसे यांचे दर्शन घडवणारी मालिका, अशी आधीच पुरेशी जाहिरात करण्यात आली होती. सौ. रमा परुळकर हिला या मालिकेविषयी कुतूहल वाटले. तिला स्वतःला कुत्र्यांची विशेष आवड असून, तिने घरी (एक नव्हे तर तीन) कुत्री पाळलेली आहेत. त्यामुळे या मालिकेविषयी तिचे 'कुतू'हल विशेष असणार, हे अगदी स्वाभाविक आहे. तिने अर्थातच, ही मालिका पहायचे ठरवले. मालिकेतील पहिले पुष्प सादर झाले. ते तिला इतके आवडले की, तिने जॅक आणि लॅसीची ही कथामालिका क्रमशः, जशी आठवेल तशी, लिहून काढायचे ठरवले.

एखादा प्रसंग मनाला भिडला की, तो कुणालातरी सांगावा, असे

बऱ्याच माणसांना वाटते. तसे केल्याशिवाय त्यांना मुळी रहावतच नाही. मोठ्या माणसांनाच काय, पण लहान मुलांनाही असे वाटते, हे आपण पहातो. शाळेत काही विशेष घडले की, घरी येऊन ते आईला केव्हा एकदा सांगतो, असे मुलाला होऊन जाते. बाईंच्या टेबलावर चढून एक मुलगा उभा राहिला आणि वेडेवाकडे चेहरे करून नाचू लागला. इतक्यात बाई वर्गात आल्या. त्याबरोबर घाबरून त्या मुलाने उडी मारली आणि तो मुलगा जमिनीवर उताणा झाला. वर्गात घडलेला हा, थरारून टाकणारा प्रसंग. मूल घरी येऊन तो आईला सांगते. घडलेला हा प्रसंग आपल्या शब्दांत सांगताना, पदरचा मसाला त्यात घालून, ते मूल त्या प्रसंगातले थरारक नाट्य उभे करण्याचा प्रयत्न करते.

एखादे नाटक किंवा सिनेमा आवडला की, अनेक मोठी माणसे घरी येऊन मोठ्या उत्साहाने ती गोष्ट, जो कोणी मिळेल त्याला, सांगायला सुरुवात करतात. काही वेळा ऐकणारा हात जोडून सांगतो, "गोष्ट सांगू नको. आम्हाला तो सिनेमा पहायचा आहे. आधी गोष्ट ऐकली की, आमची सगळी गंमत निघून जाईल." पण गोष्ट सांगणाऱ्या व्यक्तीचा उत्साह इतका प्रचंड असतो की, बहुधा ती ही विनंती धुडकावूनच लावते!

मनाला भिडलेली घटना कुणालातरी सांगावी, असे तीव्रतेने वाटणे, ही मानवी मनाची अटळ अशी गरज आहे. असे हे सांगणे म्हणजे, या घटनेची, प्रसंगाची आपल्या शब्दांतून, आपल्या दृष्टिकोनातून केलेली एक प्रकारची पुनर्निर्मिती असते. माणसाच्या या मूलभूत गरजेतूनच पुढे त्याची साहित्यनिर्मिती होत असावी.

मूळ मालिकेत मुलाचे नाव जॅक असे होते. टीव्हीवरची ही कथामालिका आपल्याला सांगणाऱ्या रमा परुळकर हिने त्या मुलाचे जॅक हे नाव बदलून ते जिम असे ठेवले. गोष्ट जो सांगतो त्याची ती गोष्ट होते — निदान त्या वेळेपुरती तरी! त्यामुळे जॅकचा जिम करण्याचे स्वातंत्र्य तिने घेतले. असे हे स्वातंत्र्य तिने, ही गोष्ट सांगण्याच्या भरात, अनेक ठिकाणी घेऊन ही गोष्ट 'आपलीशी' करण्याचा प्रयत्न कळत-नकळत केला असेल. आपण ही मूळ मालिका पाहिली नसल्यामुळे, त्याविषयी आपल्याला अधिक काही सांगता येणार नाही.

सौ. रमा परुळकर हिने या गोष्टी लिहून काढलेल्या असल्या तरी, तिचे हे लिहिणे गोष्ट 'सांगावी' यासाठी आहे. आपले 'लिहिणे' हे जेव्हा 'सांगण्यासाठी' होते, तेव्हा आपल्या भाषेवर त्याचा फार परिणाम होत असतो. अशी ही सांगण्यासाठी लिहिलेली भाषा वाचताना ती आपल्याला 'ऐकू' येते. पुस्तकी किंवा ग्रांथिक भाषा आपण डोळ्यांनी वाचतो आणि ती आपल्याला कळते; पण ती आपल्याला ऐकू येत नाही. सांगण्यासाठी निर्माण झालेली भाषा वाचताना आपल्याशी कोणीतरी बोलते आहे, असे वाटत रहाते. सौ. रमा परुळकर हिचे हे लेखन गोष्ट सांगण्यासाठी झालेले असल्यामुळे, तिची भाषा कुठेही पुस्तकी झालेली नाही.

आपल्याशी बोलणाऱ्या माणसाच्या वाणीतली स्वाभाविकता, सहजता या भाषेत उतरली आहे.

मुलांना साहसाची आवड असते. त्या वयात फारशी साहसे करणे शक्य नसते. त्यामुळे, कल्पनेतल्या साहसांना फार मोठे स्थान प्राप्त होते. मला आठवते की, मी लहान असताना एकदा झाडावर चढून फांदीवर बसलो. झाड अर्थातच फारसे उंच नव्हते आणि चढायलाही अगदी सोपे होते. थोड्या वेळाने घरातली मोठी माणसे धावत आली आणि त्यांनी मला खाली उतरवले! ''भयंकर साहसी पोर आहे'' असे माझे वर्णन करण्यात आले! पण खरी गंमत वेगळीच होती. फांदीवर बसून, मी हातातल्या काठीची तलवार करून, एका प्रचंड राक्षसाशी लढून त्याला गारद केले होते. माझे हे खरे साहस कोणाच्या ध्यानातच आले नव्हते! फांदीवर चढून बसणे हे वडील माणसांनी हेरलेले माझे साहस या साहसाच्या तुलनेने अगदीच क्षुद्र नव्हते काय?

जिम आणि लॅसी या पुस्तकात अशी कल्पनेतली साहसे अनेक आहेत. ती टीव्हीच्या पडद्यावर प्रत्यक्ष उतरलेली आहेत, हे मात्र खरे! ही सर्व साहसे मुलांना गुंग करून टाकतील यात शंका नाही. जिम आणि लॅसी पिकनिकला जातात. दोघेही भटकत जवळच्या टेकडीकडे पोचतात. तिथे सुरुंग लावलेला असतो. धडाम्! त्याचा स्फोट होतो. जिवावरचा प्रसंग. लॅसी आणि एक हरणाचे पाडस दगडांत अडकून पडतात. आता काय बरे करणार? हेलीकॉप्टरवरून खाली दोर सोडून, त्यावरून उतरून, जिमचे डॅडी दोघांची सुटका करतात. एकदा तर सिंहच दारात येऊन उभा रहातो. फारच जीवघेणा आणि अंगावर काटा उभा करणारा प्रसंग! अशा वेळी जिम मोठेच प्रसंगावधान दाखवतो. अखेर सुरक्षादलाचे जवान येऊन सिंहाला पकडून नेतात. सुरक्षादलाचे जवान जिमचे कौतुक करून त्याला शंभर डॉलर्स बक्षीस देतात. एकदा जिमला रानात सर्पदंश होतो आणि विषाचा परिणाम होऊन तो बेशुद्ध पडतो. सगळ्यांच्या तोंडचे पाणीच पळते. आता जिम काही वाचत नाही, असेच वाटते. पण लॅसी कमाल करते. आजोबांची चिठी घेऊन ती डॉक्टरला गाठते! जिमचे प्राण वाचतात.

थरारून टाकणारे असे अनेक प्रसंग या पुस्तकात आहेत, तसेच भावनेला हळुवार स्पर्श करणारे प्रसंगही अनेक आहेत. जादुगाराने पिंजऱ्यात ठेवलेल्या कबुतराची सुटका लॅसी करते. लॅसी आणि जिम यांना या कबूतराचा लळा लागतो. शेवटी तो जादूगार आपले कबूतर शोधीत जिमच्या घरी येतो. तो जादूगार ते कबूतर आपल्या जादूने 'अदृश्य' करतो. हा प्रसंग किंवा लॅसीला तीन पिले होतात हा प्रसंग मनाला भिडतो. ही कथामाला वाचताना जिम आणि लॅसी हे आपले जानी दोस्त होतात. असे, थरारून टाकणाऱ्या साहसांनी आणि भावनेला भिडणाऱ्या प्रसंगांनी भरलेले, हे पुस्तक मुलांना अतिशय आवडेल, याची मला खात्री आहे. जिम आणि लॅसी अशी जोडी अनेक मुलांच्या मनात असतेच मुळी! ती जोडी काहींना नवीन साहसे घेऊन पुन्हा भेटेल.

सौ. रमा परुळकर ही माझी धाकटी बहीण. आपल्या या पहिल्या पुस्तकाला, वडील भाऊ या नात्याने, मी आशीर्वादपर चार शब्द लिहावे, असे ती मला म्हणाली. तो तिचा हक्कच आहे. या निमित्ताने तिला माझे आशीर्वाद आणि या क्षेत्रातील भावी प्रवासासाठी शुभेच्छा.

**- मंगेश पाडगावकर**



# लॅसी व जिमचा दोस्त

जिमच्या शाळेला आज सुट्टी होती, त्यामुळे जिम आज थोडा उशिराच उठला. सकाळची न्याहारी झाल्यावर जिम आपल्या लाडक्या लॅसीला घेऊन फिरायला निघाला. फिरायला जायचं म्हणून लॅसीही खुशीत होती. हिंडता-हिंडता, आपण बरंच अंतर चालून आलो आहोत हे जिमच्या ध्यानातही आलं नाही. त्याची लाडकी, आज्ञाधारक लॅसी झाडाझुडपातून, उन्हातान्हातून त्याच्याबरोबर मजेत फिरत होती.

आता मात्र उन्हातून बरंच अंतर चालल्यामुळे जिम खूप तहानला. चालता-चालता, तो एका घरापाशी थांबला. इथं निदान आपल्याला पाणीतरी प्यायला मिळेल, या कल्पनेनं त्याला खूप आनंद झाला. त्यानं बिचकतच त्या घराचा दरवाजा ठोठावला. दार उघडताच छोटी, अंगावर काळे ठिपके असलेली, पांढरी शुभ्र, एक कुत्री त्याच्या अंगावर भुंकू लागली; घरात येऊ देण्याचं तर नावच सोडा. हा तिचा पवित्रा पाहून जिम लॅसीला म्हणाला, "लॅसी, तू सांगना ग तिला की, आम्ही चोर नाही. आम्ही तुला मारणारही नाही."

लॅसीला जिमची भाषा छान समजायची. तिनं बारीक आवाज काढून त्या कुत्रीला आपल्या भाषेत सांगण्याचा खूप प्रयत्न केला. पण छे!

इतक्यात तिचा मालक बाहेर आला. त्याचं वय सत्तरीच्या पुढेच असावं; केस पांढरेशुभ्र आणि चेहरा प्रेमळ होता. त्यानं आपल्या कुत्रीला न भुंकण्याचा इशारा

केल्याबरोबर काय आश्चर्य! ती अगदी शांत झाली, आणि आज्ञाधारकपणे उभी राहिली.

त्या प्रेमळ, वृद्‌ध गृहस्थांनी जिमला व त्याच्या लॅसीला पाहून विचारलं, "बाळ, तुला काय पाहिजे? तू का आलास?"

त्यांच्या ह्या प्रेमळ शब्दांनी जिमला धीर आला. तो म्हणाला, "मला व लॅसीला फार तहान लागली आहे. थोडं पाणी प्यायला मिळेल का?" जिमच्या ह्या गोड व लाघवी शब्दांनी ते आजोबा खुश झाले. ते म्हणाले, "ये बाळ. आत ये." त्यांनी जिमला व लॅसीला पाणी प्यायला दिलं. नंतर जणूकाही खूप दिवसांची ओळख असल्याप्रमाणे त्यांनी बऱ्याच गप्पागोष्टी केल्या. आणि मग जिम त्यांच्या घरून त्यांचा निरोप घेऊन घरी आला.

जिमला म्हातारे जॉनअंकल खूपच आवडले. आता त्यांना भेटल्याशिवाय त्याला मुळी चैनच पडत नसे. त्यामुळे लॅसीला घेऊन तो दररोज त्यांच्याकडे येऊ लागला. एक दिवस तो अंकलना भेटण्यासाठी म्हणून आला. पण जॉनअंकल त्याला भेटलेच नाहीत. त्याला खूप वाईट वाटलं. त्यांनतर सतत चार-पाच दिवस तो आला आणि निराशेनं घरी परतला. जॉनअंकलच्या घरात त्यांची स्मोकी एकटी, दीनवाणी बसून होती. जिमला व लॅसीला पाहिलं की यांनीच आपल्या मालकाला काहीतरी केलं आहे असं समजून ती त्यांच्यावर भुंकू लागे.

जिम मनोमन दुःखी झाला. त्याला असा उदास झालेला पाहून त्याच्या मम्मी-डॅडींनी विचारलं, "जिम, काय झालं बाळा?" जिमनं सारं काही सांगून टाकलं. तेव्हा मम्मी-डॅडींनी त्याला समजावलं. ते म्हणाले, "जिम, आम्ही तुझ्या जॉनअंकलचा शोध लावतो, तू काही काळजी करू नकोस. आता तू शाळेत जा आणि नीट अभ्यास कर."

जिमचं शाळेत, अभ्यासात मुळीच मन लागत नव्हतं. तरीही तो नेमानं शाळेत जाऊ लागला. एक दिवस त्याच्या डॅडींनी त्याला आनंदाची पण तितकीच गंभीर एक बातमी दिली. त्यांना जॉनअंकलचा पत्ता मिळाला होता, पण मोटारीचा अपघात होऊन, गंभीर अवस्थेत ते हॉस्पिटलमध्ये होते. जिमला हे ऐकून वाईट वाटलं. लॅसीसुद्धा बारीक आवाजात रडू लागली.

जिम लॅसीला घेऊन हॉस्पिटलमध्ये आला. तिथे फोनवर बोलणाऱ्या नर्सला त्यानं जॉनअंकलचा रूमनंबर विचारला आणि तो तडक त्यांच्या रूममध्ये गेला. तिथे पाहातो तर काय? जॉनअंकल बेशुद्ध होते व त्यांच्याजवळ डॉक्टर व नर्स उभी होती. जिमला लॅसीबरोबर पाहून त्यांना खूप आश्चर्य वाटलं आणि जरी लॅसी शांत उभी होती, तरी ते त्याला म्हणाले, "बाळ, तुझे अंकल फार गंभीर अवस्थेत आहेत, त्यांच्या जगण्याची आशा आम्ही सोडलेली आहे. या हॉस्पिटलमध्ये प्राण्यांना घेऊन येण्यास परवानगी नाही. तेव्हा तू तिला बाहेर घेऊन जा व मग आत ये." जिम शहाणा मुलगा होता. त्याला डॉक्टरांचं म्हणणं

पटलं. त्यानं लॅसीला हॉस्पिटलच्या दरवाजाबाहेर आणून तेथेच शांत उभं राहाण्याची तिला आज्ञा केली. लॅसीसुद्धा चुपचाप उभी राहिली. थोड्या वेळानं, जिम लॅसीला घेऊन घरी परत आला. जॉनअंकलना पाहून जिमचं मन उदास, अस्वस्थ झालं होतं. त्या एवढ्याशा जिवाला काय करावं तेच सुचेना.

इथे स्मोकी, मालक दृष्टीला पडत नाही म्हणून व्याकुळ झाली होती. जिमनं लॅसीला स्मोकीची काळजी घेण्यास सांगितलं. तिच्यासाठी लॅसीच्या तोंडात खाऊ दिला. खाऊ तोंडात धरून लॅसी स्मोकीकडे आली. पण लॅसीला पाहाताच स्मोकीनं भुंकायला सुरुवात केली. तिला जिमचा व लॅसीचा खूप राग आला होता. तिचा समज झाला होता की ह्या दोघांनीच आपल्या मालकाला आपल्यापासून हिरावून घेतलं आहे! लॅसी मात्र इकडून तिकडे फेऱ्या मारत होती. जिमनं तिच्याजवळ दोन-तीन वेळा दिलेल्या खाऊला स्मोकीनं स्पर्शसुद्धा केला नव्हता.

एवढ्यात लॅसीच्या इवल्याशा डोक्यात एक कल्पना आली. ती तडक हॉस्पिटलमध्ये आली आणि सर्वांच्या नजरा चुकवून जॉनअंकलच्या खोलीत गेली. जॉनअंकल अजूनही तसेच पडून होते. तिनं त्यांच्याकडे एकवार केविलवाण्या नजेरनं पाहिलं. आणि थोडा विचार करत ती इकडे-तिकडे पाहू लागली. इतक्यात एका कोपऱ्यात तिला जॉनअंकलचे बूट दिसले. तिनं लगेच तिथे जाऊन एक बूट तोंडात धरला आणि ती तडक स्मोकीकडे आली. तिनं स्मोकीला बोलावलं. ती बाहेर तर आली, पण लॅसीजवळ जाण्याचं नावच घेईना. उलट लॅसीवर भुंकायचं मात्र तिनं सोडलं नाही. लॅसी जवळ गेली की स्मोकी घरात पळून जाई.

'आता काय करावं?' लॅसी विचार करू लागली. पण तिनं तिचे प्रयत्न काही सोडले नाहीत. मोठ्या धिटाईनं ती स्मोकीजवळ गेली. तिच्या मालकाचा तो बूट लॅसीनं तिच्या नाकाजवळ नेला. असं दोन-तीन वेळा केल्यावर सरतेशेवटी लॅसीच्या प्रयत्नांना यश आलं. स्मोकीनं हळूच बुटाचा वास घेतला आणि त्याबरोबर तिच्या गळ्यातून एक वेगळाच करुण आवाज निघाला. तिनं आपल्या धन्याचा तो बूट ओळखला आणि तिच्या डोळ्यांत मालकाच्या आठवणीनं पाणी तरारलं. मोठ्या करुण नजरेनं तिनं लॅसीकडे पाहिलं आणि लॅसीनंसुद्धा मोठ्या आश्वासक नजरेनं तिच्याकडे पाहून, जणू काही 'घाबरू नकोस' असा, तिला दिलासा दिला.

लॅसी खरंच हुषार आणि बुद्धिवान होती. तो बूट आपल्या तोंडात धरून स्मोकीला ती आपल्या बरोबर येण्यास सांगू लागली. आता मात्र स्मोकी बरोबर समजली. कसलाही विरोध न दर्शविता ती निमूटपणे लॅसीच्या मागून धावू लागली.

धावत-धावत दोघीही हॉस्पिटलच्या दारापाशी आल्या. पण काय हे दुर्दैव! दरवाजा तर बंद होता. बिचारी असहाय्य लॅसी तोंडात बूट घट्ट पकडून, कुणीतरी

दरवाजा उघडेल या आशेनं, वाट बघत उभी राहिली, आणि स्मोकी तिच्याकडे पाहात उभी राहिली. थोडा वेळ गेला आणि एका माणसानं आत जाण्यासाठी दरवाजा उघडला. ही संधी साधून लॅसी स्मोकीला घेऊन आत शिरली. धावतच ती जॉनअंकलच्या खोलीत आली. तोंडातला बूट दुसऱ्या बुटाजवळ ठेवून तिनं स्मोकीला तिच्या धन्याच्या पलंगापाशी नेलं. एवढ्यात एक नर्स खोलीत आली. पण खोलीत दोन कुत्रे पेशंटच्या अगदी जवळ गेलेले पाहून तिची भीतीनं गाळण उडाली आणि ती तात्काळ डॉक्टरांकडे धावत गेली. तिनं त्यांना बोलावून आणलं. तेवढ्यात जिमही तिथे आला.

समोर जे दृश्य होतं ते उपस्थितांचं हृदय हेलावून टाकणारं होतं. आपल्या धन्याला पाहून स्मोकीनं आपले पुढचे पाय उंचावले. आपलं तोंड त्यांच्याजवळ नेऊन ती त्यांना डोळ्यांत पाणी आणून चाटू लागली आणि आश्चर्य घडलं! तिच्या चाटण्याच्या स्पर्शानं जॉनअंकल किंचित हलल्यासारखे वाटले. डॉक्टर अवाक् होऊन हे सर्व पाहात होते. त्यांनी नर्सला हाताची खूण करून तिथंच थांबण्यास सांगितलं. सर्वजण स्तिमित होऊन पाहात होती. स्मोकी मात्र कुणाकडेच पाहात नव्हती. ती चाटतच होती आणि बारीक आवाज काढून बोलत होती.

आणि काय आश्चर्य! डॉक्टरांच्या प्रयत्नांनी जे शक्य झालं नाही ते नवल स्मोकीनं करून दाखवलं. हळूच जॉनअंकलनी डोळे उघडले. ते शुद्धीवर आले. सर्वांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. ही सारी किमया लॅसीची होती.

जिमच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्याला त्याचे लाडके जॉनअंकल परत मिळाले होते. जिमच्या लाडक्या लॅसीनं केवढं मोठं काम केलं होतं! तिच्यामुळेच स्मोकी जॉनअंकलच्या जवळ आली होती, आणि तिच्या चाटण्याच्या स्पर्शानं अंकल शुद्धीवर आले होते. तिला आपले मालक परत मिळाले होते आणि जिमला आपला दोस्तअंकल.

पूर्ण बरे होऊन अंकल घरी आले. जिमही त्यांच्याकडे पूर्ववत् जाऊ लागला. स्मोकीचं भुंकणं अजिबात बंद झालं. उलट, जिम व लॅसी आले रे आले की ती दोघांनाही चाटू लागली. आपल्या धन्याशी आपली भेट घडवून आणणाऱ्या या जिमवर व त्याच्या लाडक्या लॅसीवर स्मोकी बेहद्द खुश होती. □



# जादुगार, जिम व लॅसी

आज सकाळी जिमला लवकरच जाग आली. त्याला इतक्या लवकर उठलेला पाहून त्याच्या आईला नवलच वाटलं. तिनं विचारलं, ''जिम, आज तू लवकर कसा काय उठलास ?'' जिम म्हणाला, ''मम्मी, आज डिपार्टमेंट स्टोअरच्या बाजूला एक जादुगार जादूचे प्रयोग करून दाखविणार आहे. मी जाऊ पाहायला ?'' मम्मी नाही म्हणणार नाही याची त्याला खात्री होती. तरी आईनं हो म्हणताच त्याचा आनंद गगनात मावेना. जिम जादूचे प्रयोग पाहायला गेला; अर्थातच लॅसीला घेऊन. हॉलमध्ये लॅसी त्याच्या बाजूला बसून चुपचाप जादूचे प्रयोग पाहात होती.

जादुगारानं प्रयोगांना सुरुवात केली. त्याच्या कपड्यांचा थाट मोठा रंगीबेरंगी आणि झगमगीत होता. मोठ्या ऐटीत त्यानं जादूनं एक कबुतर काढलं. कबुतर उडालं ते थेट जिमच्या डोक्यावर येऊन बसलं. हे सारं लॅसी निमूटपणे पाहात होती. कबुतर पुन्हा जादुगाराजवळ गेल्यानंतर त्यानं त्याच्या मदतनीस मुलीला बोलावून ते पिंजऱ्यात ठेवण्यास सांगितलं.

लॅसी हे सारं पाहात होती. जादुगारानं कबुतराला पिंजऱ्यात कोंडून ठेवलं हे तिला मुळीच आवडलं नाही. ती लागलीच तिथून उठली. हे जिमच्या मुळीसुद्धा लक्षात आलं नाही. जादुगारानं पुढचा प्रयोग चालू केला. सर्वांचं लक्ष तिकडे लागलं होतं. जिमसुद्धा या गोष्टीला अपवाद नव्हता.

लॅसी सरळ निघाली ती स्टेजच्या मागे आली. तिथे आल्यावर तिला कबुतराचा पिंजरा लटकताना दिसला, आणि जादुगाराची मदतनीस मुलगी आड उभी राहून पुढचा प्रयोग पाहाण्यात गुंग होती. ही संधी साधून लॅसीनं कबुतराचा पिंजरा तोंडात धरला आणि धावत-धावत ती सरळ घरी आली.

इथे जादुगार नवे-नवे जादूचे प्रयोग करीतच होता. सर्व प्रेक्षक मुग्ध होऊन पाहात होते. जादुगारानं आपली छाप सर्वांवर बसविली होती. त्यामुळे कार्यक्रम कधी संपला हे कोणाला कळलंच नाही. खेळ संपल्यावर जिमनं लॅसीला चल म्हटलं. पण लॅसी तिथे नव्हती. जिम थोडा चरकलाच, पण त्यानं विचार केला की बहुधा, कंटाळून ती घरी गेली असेल. म्हणून जिम सायकलवरून घरी परतला.

घरी आल्यावर जिमनं पाहिलं तर काय लॅसीच्या तोंडात पिंजरा आहे आणि तो कुठे ठेवावा याचा ती विचार करते आहे. शेवटी लॅसीनं पिंजऱ्याचं दार उघडलं. पिंजऱ्यातून सुटका होताच कबुतर थेट घराच्या कौलावर जाऊन बसलं. अजूनही पिंजरा लॅसीच्याच तोंडात होता. हे पाहून जिमनं तो काढून बाजूला ठेवला. कबुतराला मुक्त केल्याचा लॅसीला कोण आनंद झाला होता!

रात्र झाली. जिमनं आजोबांना आणि मम्मीला 'गुड नाईट' केलं आणि तो लॅसीला घेऊन त्याच्या खोलीत झोपायला गेला. नेहमीच्या सवयीप्रमाणे लॅसी जिमच्या पलंगाच्या पायथ्याशी झोपली. थोडा वेळ गेला असेल-नसेल, तेवढ्यात लॅसीला खिडकीजवळ कबुतराच्या पंखांची फडफड ऐकू आली. लॅसी लगेच उठली आणि जिमचा पायजमा तोंडानं ओढून तिनं त्यालाही जागं केलं. ती त्याला खिडकीजवळ घेऊन गेली. आता जिमच्या लक्षात आलं की लॅसीनं त्याला का उठवलं? त्यानं लागलीच कबुतराला उचलून घेतलं व त्याचे खूप लाड केले.

सकाळ झाली. जिमला जाग आली. तो उठला तेव्हा त्याचे डॅडी चहा घेत होते. तेवढ्यात त्याला आठवलं की जादूच्या प्रयोगाच्या वेळी कबुतर त्याच्याच डोक्यावर का बरं येऊन बसलं? त्याला त्या घटनेचा अर्थच कळेना. त्याच्या इवल्याशा डोक्यात अनेक प्रश्न उभे राहिले.

पण जेव्हा मम्मी-डॅडींना समजलं की तो कबुतराचा पिंजरा त्या जादुगाराचा आहे, आणि लॅसीनं तो तोंडात धरून घरी आणला आहे. तेव्हा मम्मीनं जिमला खूप समजावलं. ती जिमला म्हणाली, ''जिम, बाळा, ते कबुतर आपल्याला ठेवता येणार नाही. ते जादुगारानं आपल्या धंद्यासाठी पाळलं आहे. कळलं ना तुला?'' नंतर तिनं जादुगाराला फोन करून कळवलं की, 'तुझा कबुतराचा पिंजरा आमच्या घरी आहे. तो आमची लॅसी कुत्री तोंडात धरून घरी घेऊन आली'. तिनं आपल्या घराचा पत्ता त्याला देऊन तो घेऊन जाण्यास त्याला

सांगितलं. थोड्या वेळानं जादुगार जिमच्या घरी येऊन आपला पिंजरा घेऊन जाऊ लागला. तेव्हा जिमला खूपच वाईट वाटलं. चिमणीएवढं तोंड करून तो उभा राहिला. लॅसी तर रडायलाच लागली. तेव्हा जिम तिला समजावत म्हणाला, ''लॅसी, मला माफ कर, पण मी काही करू शकत नाही.'' तेव्हा ती थोडी शांत झाली. तिनं जिमची पापी काय घेतली, त्याला चाटलं काय, की काही विचारू नका. जिमनं पण तिला थोपटून तिचे लाड केले.

जादुगार पिंजरा गाडीत ठेवून निघाला. पण कबुतराच्या मनात जायचं नव्हतं. तेसुद्धा अस्वस्थ होऊन फडफडू लागलं, बाहेर पडण्यासाठी धडपडू लागलं. जादुगारानं पिंजऱ्याचं दार अधिकच घट्ट बंद केलं. आणि कबुतर मिळाल्याच्या आनंदात त्यानं गाडी भरधाव हाकायला सुरुवात केली.

इथे जिमच्या मनाची चलबिचल होत होती. त्याचं मन त्या कबुतरात अडकलं होतं. तो मम्मीला म्हणाला, ''मम्मी, मी जादुगाराला पाहून येऊ का? अगदी लवकर येतो बघ?'' ती म्हणाली, ''जिम, तुला घरचा अभ्यास करायचा आहे नं?'' त्यावर जिम म्हणाला, ''होय ग, मम्मी. पण मी हा अस्सा जाऊन येतो बघ'' आणि तो लॅसीला घेऊन निघाला.

इथे जादुगार भरधाव गाडी चालवत होता. कबुतर मिळाल्याच्या आनंदात तो होता. पण व्हायचं तेच झालं. जादुगाराची गाडी उलटली. तिला अपघात झाला. गाडी उलटली पण जादुगाराचे प्राण थोडक्यात बचावले. मात्र तो गाडीत असा काही अडकून पडला की त्याला बाहेर पडता येणं अशक्य होऊन बसलं. त्यानं गाडीतून बाहेर पडण्याची खूप धडपड केली. पण व्यर्थ! त्याच्या हातापायाला सगळीकडे जखमा झाल्या व त्यातून रक्त वाहात होतं. कबुतराची अवस्था मात्र बिकट झाली होती. 'या कबुतराची सुटका कशी करावी?' याचा विचार करून थकलेल्या जादुगारानं थोडासा हात लांबवून त्याला पिंजऱ्यातून बाहेर काढलं. त्याच्या पायाला टाय बांधून त्याला सोडून दिलं. कबुतर जे उडालं ते थेट झाडाच्या फांदीवर जाऊन बसलं. जादुगाराची मात्र 'मला कुणीतरी वाचवा-वाचवा' म्हणून ओरड चालूच होती.

जिम व लॅसी रस्त्यानं चालत येत होते. लॅसी पुढे होती, आणि जिम तिच्यापासून थोडा मागेच होता. झाडावर बसलेल्या कबुतराला लॅसी दिसली. त्याबरोबर त्यानं पंख फडफडवून आवाज दिला. लॅसीनं कबुतराचा फडफडाट ऐकून त्याला जवळ बोलावण्यासाठी भुंकायला सुरुवात केली. ते झटकन् आलं आणि लॅसीच्या पाठीवर बसलं. इतक्यात जिम पण तिथं आला. लॅसीच्या पाठीवर कबुतराला बसलेलं पाहून जिमच्या मनात भीतीची पाल चुकचुकली. जिमनं कबुतराच्या पायाला बांधलेला टाय पाहिला. जिम मनाशी म्हणाला, 'नक्कीच काहीतरी घोटाळा आहे.' कबुतराला बरोबर घेऊन तो निघाला. थोड्याच अंतरावर त्यांना जादुगाराची गाडी उलटी होऊन पडलेली दिसली. जिमचं हृदय धडधडू लागलं.

जिम धावत गाडीपाशी गेला. वेदनांनी कण्हत असलेला जादुगार जिमला 'मदत कर' म्हणून विनवू लागला. पण जादुगाराला या अडचणीतून बाहेर काढणं जिमच्या शक्तीच्या आवाक्याबाहेरचं होतं.

जिमनं क्षणभर विचार केला आणि त्याला एक युक्ती सुचली. तो लॅसीला म्हणाला, ''लॅसी, तू इथंच थांब.'' तिनंही बारीक आवाज काढून 'थांबते' असं उत्तर दिलं. जिम क्षणाचाही विलंब न करता सायकलवरून भरधाव निघाला, आणि तडक आपल्या घरी आला. त्यानं आपल्या मम्मी-डॅडींना, जादुगाराला अपघात झाल्याचं व तो मोटारीत अडकून पडल्याचं एका दमात सांगितलं. जिमचे मम्मी-डॅडी जराही वेळ न दवडता जिमबरोबर गाडी घेऊन निघाले. ते सर्व जादुगारापाशी आले. अडकून पडलेल्या जादुगाराला त्यांनी बाहेर काढलं आणि ते त्याला आपल्या घरी घेऊन आले. त्याच्या सर्व जखमांना औषध लावून त्यांनी त्याला मलमपट्टी केली. हा सारा प्रकार लॅसी केविलवाणी होऊन पाहत होती. कबुतर तर तिच्यापाठीवरच बसून होतं. जिम लॅसीला म्हणाला, ''लॅसी, आता काळजी करण्याचं मुळीच कारण नाही.''

नंतर सर्वजण हॉलमध्ये येऊन बसले. जादुगार सर्वांच्या मदतीनं, सेवेनं पार हेलावून गेला. तो म्हणाला, ''तुमचे सर्वांचे आणि लॅसीचे कसे आणि किती आभार मानू?'' मग तो जिमला म्हणाला, ''जिम, तुझ्यासाठी मी जादूचा खास प्रयोग करून दाखवतो.'' त्यानं पिंजरा घेतला, त्यात कबुतर ठेवलं, आणि तो सर्वांना म्हणाला, ''पहा, या पिंजऱ्यातलं कबुतर एकदम नाहीसं होईल. छु-मंतर, जादु-मंतर, एक, दोन, तीन...'' आणि काय चमत्कार! पिंजरा कुणीही न उघडता कबुतर फडफडून जिमच्या पाठीवर येऊन बसलं. जिमला खूप नवल वाटलं. तो जादुगाराला म्हणाला, ''मला सांगा नं, तुम्ही ही जादू कशी केलीत?''

जादुगार हसला आणि म्हणाला, ''जिम, अरे, हे तर आमच्या धंद्याचं गुपीत आहे.'' आणि तो सर्वांचा निरोप घेऊन निघाला. लॅसी मात्र कबुतराचा पिंजरा घेऊन जाणाऱ्या जादुगारावर भुंकत राहिली! □



# लॅसी संकटात

रात्री झोपायला जाताना जिमनं मम्मी-डॅडींना 'गुड नाईट' केलं तेव्हा मम्मीनं त्याला सांगितलं, ''जिम, उद्या सकाळीच आपल्याला पिकनिकला जायचं आहे, तेव्हा लवकर उठ, बरं का!'' 'बरं मम्मी', म्हणून लॅसीला घेऊन तो झोपायला गेला.

सकाळ झाली; पण जिम कसा बरं उठला नाही! मम्मीला नवलच वाटलं. पिकनिकला जायचं म्हटलं की जिम सर्वांआधी उठून तयार असतो. तिनं जिमला हाक मारली आणि लॅसीसुद्धा त्याचा शर्ट तोंडात धरून त्याला उठवू लागली. अखेरीस एकदाची जिमला जाग आली. पिकनिकला जायचं आहे हे आठवताच तो ताडकन् उठला. त्यानं भरभर जाण्याची तयारी केली. मम्मी-डॅडी तयारच होते. मग सर्वजण गाडीत बसले. लॅसीसुद्धा टुणकन् उडी मारून गाडीत बसली. गाडीत जिम आणि मम्मी-डॅडींच्या अगदी जोरात गप्पा सुरू होत्या.

बऱ्याच अंतरावर आल्यावर अचानक गाडी थांबली. काय झालं तेच कळेना. डॅडींनी खाली उतरून पाहिलं. तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की गाडीचा टायर पंक्चर झाला आहे. दुसरा टायर लावेपर्यंत थोडा वेळ होता. अर्थात् जिम व लॅसी स्वस्थ थोडीच बसून राहाणार? डॅडी-मम्मीची परवानगी घेऊन जिम आणि लॅसी अवतीभवती फिरायला लागले.

फिरता फिरता त्यांना एक माणूस दिसला. तो गाडी चालवत होता. त्याच्या हातात इमारत बांधण्याचा नकाशा होता. त्याला जिमनं विचारलं, ''आम्ही या

बाजूला फिरायला गेलो तर चालेल का?'' तो म्हणाला, ''बाळा, फार दूर जाऊ नकोस. इथेच आसपास फिर. पुढे गेलास तर धोका आहे.''

जिम व लॅसी तिथून फिरायला निघाले. एवढ्यात लॅसी जिमची नजर चुकवून आडबाजूला झाली. जिमच्या जेव्हा हे लक्षात आलं तेव्हा तो 'लॅसी, लॅसी' म्हणून तिला मोठ्यानं हाका मारू लागला. हाक मारल्यावर नेहमी चटकन् येणारी लॅसी, किती जरी हाका मारल्या तरी आली नाही. मग मात्र जिम घाबरला. लॅसीचा विचार येऊन त्याचे डोळे पाण्यानं भरले. तो तिला शोधायला पुढे जाणार एवढ्यात आधी भेटलेल्या माणसानं त्याला अडवलं. जिमनं पुढे जाण्यासाठी निसटण्याची खूप धडपड केली. पण त्या भल्या गृहस्थानं जिमला घट्ट धरून ठेवलं. आणि काही क्षणांतच धुम् धडाम् धुम् चा कानठळ्या बसविणारा मोठा आवाज आला. तो आवाज सुरुंग पेरल्याचा होता. सर्वत्र मातीच्या धुराचा लोट उसळला होता. अशा प्रसंगी लॅसीवर कोणतं संकट कोसळलं असेल याची कल्पना येऊन जिमची पाचावर धारण बसली.

इथं लॅसी डोंगरकपारीत अडकून पडली होती. लॅसीला तिथे एका मोठाल्या दगडात हरणाचं एक पाडस अडकलेलं दिसलं. लॅसीनं तो मोठाला दगड बाजूला काढण्याचा खूप प्रयत्न केला. पण काही केल्या तो प्रचंड दगड तिच्यानं हलेना. बिचारं ते पाडस लॅसीकडे मोठ्या केविलवाण्या नजरेनं पाहून रडत होतं. शेवटी लॅसीनं जिमला बोलावण्यासाठी भुंकायला सुरुवात केली.

थोड्या वेळानं तो भला गृहस्थ व जिम लॅसीचा शोध घ्यायला निघाले. जिमनं लॅसीला खूप हाका मारल्या. पण एकाही हाकेला त्याला प्रतिसाद मिळाला नाही. तसा जिमच्या मनाचा धीर सुटू लागला. 'लॅसी आपल्याला कायमची अंतरणार', या एकाच विचारानं तो हवालदिल झाला. तरीही मोठ्या आशेनं तो लॅसीला हाका मारतच होता. बऱ्याच वेळानं जिमला आशेचा किरण दिसला. त्याच्या प्रयत्नांना यश आलं. लॅसीच्या भुंकण्याचा आवाज त्याला ऐकू आला आणि आवाजाच्या दिशेनं जिम आणि ते गृहस्थ तिथे गेले. पहातात तर काय! एकदम खाली, मोठमोठ्या उंच दगडांत लॅसी उभी आहे. तिला वर काढणंही सहजसोपं नव्हतं. ते दृश्य पाहून जिम हादरला. भीतीनं तो रडू लागला. तेव्हा बरोबरच्या त्या भल्या गृहस्थानं त्याला धीर दिला, ''जिम, तू घाबरू नकोस. आम्ही तुझ्या लॅसीची नक्कीच सुटका करू.'' जिमला मोठा धीर आला. जिम म्हणाला, ''तुम्ही इथेच थांबा. मी माझ्या डॅडींना बोलावून आणतो.'' धावत-पळत जिम डॅडींना बोलवायला निघाला. शिवाय त्या भल्या गृहस्थानंसुद्धा आपल्या चार मित्रांना मदतीला बोलावून आणलं. सर्वांनी मिळून लॅसीला वर काढण्याचा प्रयत्न चालू केला. दोरखंड मोठाल्या दगडाला बांधून जिमचे डॅडी खाली उतरू लागले. त्यांना खाली उतरताना पाहून जिम आणि त्याची मम्मी यांची कासाविस होत होती. 'डॅडींना खाली उतरताना

अपघात झाला तर?' ही कल्पनाच असह्य वाटणारी होती.

डॅडी फरफटत, ठेचकाळत खाली उतरत होते. सुरुंग फुटल्यामुळे दगडाचे तुकडे, मातीचा धूर यांच्यामध्ये काहीही नीट दिसत नव्हतं. खूप प्रयत्न करूनही यश कसं ते येईना. अशा लोंबकाळणाऱ्या स्थितीत डॅडी किती वेळ राहाणार? काहीतरी दुसरा उपाय शोधायलाच हवा होता. शेवटी जिमला प्रथम भेटलेल्या त्या भल्या गृहस्थानं युक्ती सुचविली. तो म्हणाला, "शेवटचा एक उपाय करून पाहावा. मी माझ्या मित्राला हेलिकॉप्टर घेऊन बोलावतो. तोच आता यातून काहीतरी मार्ग काढील." सर्वजण तिथेच थांबले होते, पुढच्या काही क्षणांची वाट पाहात, आशेनं!

मोटार भरधाव चालवत तो गृहस्थ मित्राला बोलवायला गेला. इथे लॅसी भुंकून बेजार झाली होती. आपली जिमशी भेट होईल ना? हे पाडस बाहेर येईल ना? असे अनेक प्रश्न तिच्या नजरेत दिसत होते. थोड्याच अवधीत हेलिकॉप्टर आलं आणि त्याच्या घरघराटानं सारी आनंदित झाली. प्रथम पायलटनं एका मोठ्या थैलीला दोरी बांधली. नंतर त्यानं जिमच्या डॅडींना दोरीला घट्ट धरून खाली डोंगरकपारीत उतरायला सांगितलं.

डॅडींनी दोरी घट्ट पकडली व ते लोबकाळत खाली उतरू लागले. वर हेलिकॉप्टर घर-घर आवाज करत फिरत होतं. सर्वजण हे दृश्य श्वास रोखून पाहात होते. सर्वांच्याच मनावर एक प्रकारचं दडपण आलं होतं. क्षण आणि क्षण काळजाचं पाणी-पाणी करणारा होता. इतक्यात डॅडी खाली उतरले. त्यांनी प्रथम लॅसीला जवळ घेतलं, तिला कुरवाळलं. तीही त्यांना अगदी बिलगली. मग ती त्यांना पाडसाजवळ घेऊन गेली आणि तिनं भुंकून त्याला बाहेर काढण्यास सांगितलं. ते छोटंसं, पाणीदार डोळ्यांचं हरणाचं पाडसही, 'आपल्याला कुणी बाहेर काढील का?' या आशेनं केविलवाणं होऊन पाहात होतं.


डॅडींनी तो मोठाला दगड बाजूला केला आणि त्या पाडसाला आपल्या छातीशी धरलं. वरून सर्वजण हा आनंदाचा सोहळा पाहात होते. जिमच्या व मम्मीच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. तरी त्यांचा चेहरा मात्र आनंदानं उजळला होता.

डॅडींनी मग पायलटनं दिलेल्या थैलीत लॅसीला व हरणाच्या पाडसाला ठेवलं व ती थैली घट्ट पकडून आपणही हेलिकॉप्टरच्या दोरीला लोंबकाळू लागले. प्रसंग मोठा बाका होता! जर दोरीवरचा हात सुटला असता तर! डॅडींसकट, लॅसी व ते पाडस, या सर्वांवरच मृत्यू ओढवला असता: परंतु या दिव्यातून डॅडी सहीसलामत बाहेर पडले.

सर्वांना खूप आनंद झाला. जिमच्या मम्मीनं देवाचे आभार मानले. लॅसीनं तर जिमकडे धाव घेतली. त्यांचं ते प्रेम पाहून सगळ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले.

नंतर डॅडींनी हरणाच्या पाडसाला त्याच्या आईकडे नेऊन दिलं. हेलिकॉप्टरच्या पायलटाचं बुद्धिकौशल्य आणि हेलिकॉप्टर चालविण्याचं त्याचं कौशल्य

वाखाणण्याजोगंच होतं. जिमच्या डॅडी-मम्मीनं त्याचे खूप आभार मानले. तिथल्या सर्वांचे पुन्हा एकवार आभार मानून सर्वजण लॅसीसकट घरी आले. जिमची लॅसी आज एका मोठ्या संकटातून सहीसलामत सुटली होती. □



# जिमचे आजोबा व लॅसी



जिमनं कालच ठरवून ठेवलं होतं की उद्या मासे पकडायला जायचं! आज शनिवार म्हणजे शाळेला सुट्टी. सकाळी लवकरच उठून, न्याहारी करून जिम लॅसीला बरोबर घेऊन नदीकिनारी निघाला. मासे पकडण्याचा गळ जिमच्या हातात होता आणि इतर सामान असलेली बास्केट अर्थातच लॅसीच्या तोंडात होती. आज जिम भलताच खुशीत होता. त्यानं डोक्यावर हॅट घातली होती, आणि गाणं गुणगुणत तो लॅसीबरोबर उड्या मारत चालला होता.

काही अंतर चालून जातो-नाही, तर जिमला पानांआडून सळसळ ऐकू आली आणि लॅसीसुद्धा भुंकायला लागली. पहातो तर काय? बापरे! एक भला मोठा लांडगा त्यांच्या दृष्टीस पडला. त्याबरोबर जिमनं लॅसीला सांगितलं की, 'जा, त्याची पाठ धर' लॅसीला सांगण्याचाच अवकाश ती त्याच्यामागून धूम पळत सुटली. पळताना तिला भान राहिलं नाही की ती रस्त्याच्या बाजूला आली आहे. तितक्यात तिथून भरधाव वेगानं एक मोटार येत होती. आणि लॅसी नेमकी त्या गाडीच्याच समोर आली. हे पाहून जिमच्या हृदयाचे ठोके क्षणभर मंदावले. 'लॅसी मला सोडून जाणार' म्हणून जिम रडायला लागला. पण नाही! जिमच्या सुदैवानं गाडीच्या ड्रायव्हरनं गाडीला ब्रेक लावला आणि लॅसीला किंचितसुद्धा दुखापत झाली नाही. तिनं नेमकी त्याचवेळेस पलिकडच्या बाजूस अलगद उडी मारली होती. जिमला हायसं वाटलं,

आणि त्यानं रोखलेला श्वास सोडला. या प्रसंगामुळे घाबरून दुसरीकडे कुठेही न जाता लॅसीला घेऊन जिम घरीच आला.

घरी आल्यावर जिमनं धापा टाकतच 'आज आपली लॅसी मोटारअपघातातून कशी वाचली' हे सविस्तर सांगितलं. लॅसी मात्र तहानेनं व्याकुळ झाल्यामुळे घटाघटा पाणी पीत होती. जिमला पण खूप भूक लागली होती. मम्मीनं आज शंकरपाळे केले होते, त्यांचा वास त्याच्या नाकात घुसला. टेबलावर ठेवलेले शंकरपाळे त्यानं मम्मीच्या परवानगीनं घेतले आणि लॅसीलापण दिले. नंतर तो आजोबांना शोधत त्यांच्या खोलीत आला.

जिमचे आजोबा तीन-चार लोकांबरोबर चर्चा करत होते. जिमच्या कानावर पडलं की ती लोकं एक लाख रुपये देऊन आजोबांची जागा विकत घेणार होते. ती सर्व माणसं गेल्यावर जिम आजोबांजवळ आला. त्यानं आजोबांना विचारलं, ''आजोबा, तुम्ही त्या माणसांना जागा द्यायचं कबुल का केलंत ?'' जिमसारख्या लहान मुलानं हा प्रश्न विचारलेला आजोबांना आवडलं नाही. ते जिमवर भलतेच रागावले. 'आपले डॅडी जिमवर एवढे रागावले कशासाठी बरं ?' जिमच्या मम्मीला काहीच कळेना. ती बाहेर आली आणि आजोबांना म्हणाली, ''डॅडी, काय झालं एवढं रागवायला ?'' ते म्हणाले, ''तुझा जिम बिघडणार आहे बरं. ज्यात-त्यात नाक खुपसायला हवं त्याला.'' ''डॅडी, तुम्ही फार काळजी करता. माझा जिम गुणी आहे, समजुतदार आहे. तो मुळीच बिघडायचा नाही,'' मम्मी म्हणाली.

जिमच्या डोक्यातून मात्र आजोबांकडे आलेल्या त्या माणसांचा विचार काही केल्या जाईना. कसाबसा खाऊ तोंडात टाकून जिम व लॅसी त्या येऊन गेलेल्या माणसांचा मागोवा काढत निघाली. आलेली माणसं त्याच्या आजोबांच्या रिकाम्या जागेत, शेताच्या एका बाजूला होती. लॅसीला जिमनं थोडं दूर उभं राहाण्यास सांगितलं आणि तो एका झाडाआड उभा राहून ते काय करतात ते पाहात त्यांच्या मोटारीच्या मागे येऊन उभा राहिला.

त्यानं पाहिलं तर त्या माणसांनी एक खड्डा खणायला सुरुवात केली होती. जिमच्या मनात आलं, हे लोकं एवढा मोठ्ठा खड्डा का खणत आहेत बरं ? त्याची मती गुंग झाली. मम्मीला विचारून पाहावं म्हणून तो लॅसीला घेऊन घरी आला. घरी त्याची मम्मी इस्त्री करत होती. त्यानं मम्मीला सांगून पाहिलं. पण तिनं काही त्याच्याकडे फारसं लक्ष दिलं नाही.

जिमला चैन पडेना. त्याच्या डोक्यात विचारांचं काहूर माजलं. ती माणसं काय करतात ते जिमला कळायलाच हवं होतं. तो पुन्हा लॅसीला घेऊन त्या ठिकाणी आला. त्यानं पुन्हा झाडाआड लपून पाहायला सुरुवात केली. एव्हाना खड्डा खणून झाला होता. नंतर एकानं मोटारीतून एक बोर्ड काढला. त्या बोर्डवर लिहिलेलं जिमनं वाचलं. त्यावर मोठ्या अक्षरात लिहिलं होतं, 'कॅपिटल सिटी मोटार कंपनी'. म्हणजे आमच्या जागेवर मोटार कंपनी

स्थापन होणार तर? जिमला ते अजिबात सहन झालं नाही. तो रागानं धावत तिथे गेला. त्यानं तो बोर्ड काढून फेकून दिला. 'कोण हा मुलगा? एकदम येतो काय आणि बोर्ड काढून फेकून देतो काय!' त्यांना जिमचा खूप संताप आला आणि त्यांनी त्याला बदडायला सुरुवात केली.

लॅसीनं पाहिलं की जिमला सर्वजण मार देत आहेत. ती हे पाहून स्वस्थ थोडीच बसणार? तिला ते मुळीच सहन झालं नाही. तिनं तात्काळ तिच्या जिमला मारणाऱ्या माणसांवर उडी घेतली आणि ती त्यांच्यावर अशी काही तुटून पडली की विचारू नका. आता लॅसीबरोबर त्यांची झटापट सुरू झाली. या झटापटीत त्यातला एक माणूस त्या खड्ड्यातच जाऊन पडला. आणि मोठ्यामोठ्यानं ओरडू लागला, 'वाचवा, वाचवा! मेलो. मला बाहेर काढा'. एखादी दोरी असती तरच त्याला बाहेर काढणं शक्य होतं. पण त्यांच्याकडे तर दोरी नव्हती आणि दोरीशिवाय दुसरा इलाजच नव्हता.

ज्यांनी जिमला मारलं तेच आता त्याच्या विनवण्या करू लागले. त्याच्याकडून काही मदत मिळेल, निदान तो दोरी तरी आणून देईल म्हणून ते त्याच्याकडे आशेनं पाहू लागले. "मुला, आम्ही संकटात आहोत. तुला आम्ही मारलं त्याबद्दल आम्ही तुझी माफी मागतो. बाळ, एक दोरी घेऊन येशील का?" जिमनं क्षणभर विचार केला. त्यानंतर तो त्यांना म्हणाला, "आणून देईन दोरी, पण एक अटीवर. माझ्या आजोबांनी तुम्हाला दिलेला जमिनीचा कागद तुम्ही मला परत केला पाहिजे."

"बरं, बरं. आम्ही तुला वचन देतो, तो कागद तुला परत देऊ" ते म्हणाले.

जिमनं त्यांच्याकडून एक कागद घेऊन त्यावर 'मम्मी व आजोबांना एक मोठी दोरी घेऊन लवकर या. कारण एक माणूस खड्ड्यात पडला आहे' असंही लिहिलं. अर्थात् चिठ्ठी पोचवण्याचं काम लॅसीनं निभावलं. तिच्या तोंडात तो कागद देऊन जिम लॅसीला म्हणाला, "लॅसी, लवकर पळत जा आणि ही चिठ्ठी देऊन मम्मी व आजोबांना घेऊन ये."


लॅसी वेगानं पळत सुटली. तिनं घर गाठलं, मम्मीच्या हातात चिठ्ठी दिली, आणि त्याहीपुढे जाऊन तिनं आजोबांचा हात ओढायला सुरुवात केली. मम्मीनं चिठ्ठी वाचली व आजोबांकडे दिली. त्यांनी चिठ्ठी वाचली. त्यांच्या ध्यानात सर्व काही यायला वेळ लागला नाही. दोरी घेऊन लॅसीसकट दोघंही त्या ठिकाणी आली. आत पडलेल्या माणसाची आरडाओरड, किंचाळ्या सुरूच होत्या. त्या आत पडलेल्या माणसाची सर्वांना दया आली, अगदी जिम व लॅसीलासुद्धा.

आजोबांनी दोरी त्या खोल खड्ड्यात टाकली. आत पडलेल्या माणसानं ती घट्ट धरली. आता वरून सर्वांनी, म्हणजे त्याचे दोन मित्र, मम्मी, आजोबा, जिम, व लॅसीदेखील, दोरी ओढायला सुरुवात केली. सर्वांच्या प्रयत्नांनी तो माणूस दोरीला धरून

वर आला. सर्वांनी जिम, मम्मी, व आजोबांचे मनापासून आभार मानले. आणि लॅसीला तर 'गुड गर्ल' म्हटलं, कारण तिच्यामुळेच तर आजोबांना निरोप मिळाला होता. शिवाय सर्वांबरोबर लॅसीनंसुद्धा दोरी ओढण्याचं काम केलं होतं!

आता जिमला दिलेल्या वचनानुसार त्या माणसांनी खुश होऊन 'कॅपिटल सिटी मोटार कंपनी'चं व्यवहारपत्र जिमच्या आजोबांना परत केलं आणि सर्वांचा निरोप घेतला. आणि बरं का, लॅसीनंसुद्धा त्यांना 'शेकहँड' दिलं. त्यांनतर सर्वजण खुशीत घरी आले. □





# लॅसीचा रुसवा

जिमला खूपच भूक लागली होती. तो स्वयंपाकघरात येऊन मम्मीला म्हणाला, ''मम्मी, मला भूक लागली आहे. खाऊ दे ना.'' मम्मीनं त्याच्या गालाचा गोडसा पापा घेतला आणि त्याला खाऊ दिला. अर्थात लॅसीही दोन्ही हात वर करून खाऊ मागायला विसरली नाही. जिमनं तिलासुद्धा खाऊ दिला. एवढ्यात जिमला आजोबांनी हाक मारली.

जिमला हाक मारून आजोबांनी त्याला एक सुंदर बॅट बक्षीस दिली. जिमनं लगेच प्रात्यक्षिक केलं आणि आजोबांना त्याचा चांगलाच प्रसाद मिळाला. त्यामुळे जिम शरमला आणि त्यानं त्यांची क्षमा मागितली.

जिमला आता रेडिओ लावायची लहर आली. त्या आवाजानं पुन्हा आजोबा वैतागले, जिमवरती रागावले. मम्मी आत पत्र लिहीत होती, ती उठून आली. ती म्हणाली, ''डॅडी, काय झालं?''

''तू 'काय झालं' विचारतेस? ह्या तुझ्या जिमनं सतावलं आहे बघ.''

मम्मी हसली. ती आजोबांना म्हणाली, ''डॅडी, असं काय करता? रागावू नका जिमवर, लहान आहे तो.''

''अग ॲलन, लहान आहे म्हणून काय झालं? आम्ही नव्हतो का लहान?''

''पण डॅडी, त्यावेळचा काळ आणि आजची परिस्थिती यात खूप फरक नाही का पडला? मुलांना पण थोडी करमणूक नको का?''

थोड्याच वेळात आजोबांचा राग कुठच्या कुठे नाहीसा झाला. त्यांनी जिमला हाक मारली, ''जिम, बाळ, इकडे ये.'' पण जिमचा आजोबांवरचा राग काही गेला नव्हता. त्यानं आजोबांच्या हाकेला मुळीच ओ दिली नाही. तो लॅसीबरोबर बॉलनं खेळत राहिला. पण मम्मीला मात्र जिमचं हे वागणं मुळीच आवडलं नाही. ती जिमला रागावून म्हणाली, ''जिम, जातोस की नाही आजोबांजवळ? ते का बोलावत आहेत, ते पाहून ये.''

हिरमुसल्या चेहऱ्यानं जिम आजोबांजवळ जाऊन उभा राहिला. त्यांना जिमचा हिरमुसला चेहरा पाहवला नाही. त्यांनी त्याला एकदम जवळ ओढलं, त्याचे लाड केले, त्याची समजूत घातली. मग मात्र जिमची कळी खुलली. ''आजोबा, मला का बोलावलंत?'' जिम म्हणाला.

ते म्हणाले, ''चल, मी तुला एक गंमत दाखवतो,'' आणि त्यांनी बाहेर नेऊन त्याला एक गंमत दाखवली, त्यांनी त्याला एका छोट्याशा घोडीकडे नेलं. ''हे बघ, कशी आहे? आवडली तुला? ही तुला बक्षीस म्हणून घे,'' आजोबा म्हणाले. जिम अगदी खूपच खुश झाला. आजोबा आता त्याला एकदम प्रिय झाले. ती छोटीशी घोडी त्याला खूप आवडली. त्यानं तिचे लाड केले. जिमच्या लाडाच्या स्पर्शानं घोडीचं शरीर थरथरलं. तो तिथंच रमला.

लॅसी जिमला बॉलनं खेळण्यासाठी बोलावू लागली. तिनं तोंडातून बॉल आणून जिमकडे दिला. पण जिमनं लॅसीकडे अजिबात लक्ष दिलं नाही. तो त्या घोडीचेच लाड करत राहिला. लॅसीनं पुन्हा बारीक आवाज काढला. पण छे! आज जिमनं तिच्याकडे पूर्णच दुर्लक्ष केलं. झालं! शेवटी रागावून जिमनं लॅसीला 'चालती हो' सांगितलं. लॅसी जिमच्या या वागण्यानं खूप दुःखी झाली. जिम असा तिच्याशी अजूनपर्यंत कधीच वागला नव्हता. आज माझा जिम माझ्याशी असा फटकून का वागला? तिला जिमचं हे वागणं मुळीच सहन झालं नाही. ती खाली मान घालून, शेपूट खाली पाडून, अपमानित होऊन घरात आली. घरात मम्मी व आजोबा बुद्धिबळाचा पट मांडून खेळत बसले होते. लॅसीला पाहून, तिला कदाचित खाऊ हवा असेल म्हणून, मम्मीनं तिला खाऊ दिला. पण तिनं खाऊला तोंडही लावलं नाही. जणू काही तिला मम्मीचा मुकेपणानं निरोपच घ्यायचा होता. तिचा जिम तिला म्हणाला होता, 'गेट आऊट लॅसी. यू नेव्हर कम अगेन.' जिम तिच्यावर कध्धी कध्धी एवढा रागावला नव्हता. 'नाही, मी पुन्हा येणारच नाही' अस ठरवून ती घराबाहेर पडली.

जिमचे घोडीबरोबरचे लाड संपले तसा तो घरात आला. आता त्याला लॅसीची आठवण झाली. 'लॅसी, लॅसी' हाका मारत तो तिला घरभर शोधत राहिला. पण लॅसीमात्र नेहमीप्रमाणे हाकेसरशी आली नाही. किंबहुना जिमच्या हाकेला तिचा प्रतिसादही मिळाला नाही. 'म्हणजे लॅसी घरात नाही तर...' जिमच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. 'मघा मी तिला रागावलो होतो. म्हणून ती घरातून निघून गेली आहे' हे त्याला समजलं. तो खिन्न झाला. आणखीन वाट पाहूनसुद्धा लॅसी आली नाही. तसं त्याच्या काळजाचं पाणी पाणी झालं. तो मम्मीला कळवळून म्हणाला, ''मम्मी, माझी लॅसी कधीच येणार नाही का? ती रागावली ग माझ्यावर.'' मम्मीनं त्याची समजूत काढली, ''अरे जिम, कुठे जाणार ती? आपसुक येईल उद्या.'' म्हणता म्हणता रात्र झाली. जिम आपल्या खोलीत झोपायला गेला. आज झोपायला जाताना लॅसी बरोबर नाही या जाणिवेनं त्याच्या जिवाची तळमळ सुरू झाली. त्याला झोप कशी ती येईना. अखेरीस न राहवून जिम रात्रीच्या मिट्ट काळोखात लॅसीला शोधायला निघाला.

रात्रीच्या काळोखात जिम लॅसीला हाका मारत शोधत होता. त्याच्या मनात विचारांचं काहूर माजलं होतं. आपण तिच्यावर रागावलो, तिच्याकडे दुर्लक्ष केलं याचा त्याला आता पश्चात्ताप झाला. काट्याकुट्यांची, अंधाराची, कसलीच तमा आता तो बाळगत नव्हता. तरीसुद्धा लॅसी त्याला सापडली नाही. नेहमीच्या, ठराविक जागीपण तो गेला. पण छे! लॅसीचा पत्ताच नव्हता. जिम मात्र काट्याकुट्यांतून हिंडून रक्तबंबाळ झाला होता.

इथे लॅसी रुसून गेली खरी, पण काही वेळानं तिला घराची, जिमची तीव्र आठवण झाली. तिला तरी कुठं जिमवाचून चैन पडत होतं? अस्वस्थ होऊन लॅसी चुपचाप खिडकीतून आली ती जिमच्या खोलीत शिरली. पण तिला जिम बिछान्यावर दिसला नाही. ती मम्मीकडे आली. बारीक आवाजात तिनं मम्मीला सांगितलं आणि ती मम्मीला घेऊन जिमच्या खोलीत आली. खरंच, जिम तिथे नव्हता. आता मम्मीसुद्धा घाबरली. 'रात्रीच्या काळोखात हा कुठे बरं हिंडत असेल? एखादं रानटी श्वापद येऊन...' तिच्यानं पुढे कल्पनाही करवेना. घाबरून जाऊन तिनं आपल्या डॅडींना हाक मारली, ''डॅडी, जिम आपल्या खोलीत नाही, तो लॅसीला शोधायला बाहेर गेला आहे.'' आजोबा आपल्या घाबरलेल्या मुलीला म्हणाले, ''तू मुळीच घाबरू नकोस. मी आताच जिमला शोधायला जातो. लॅसीसाठी जिमला शोधून आणलंच पाहिजे.''

काळ्याकुट्ट अंधारात बॅटरी घेऊन आणि लॅसीला घेऊन आजोबा जिमला शोधायला निघाले. बरंच अंतर चालून गेल्यावर आजोबांनी जिमला हाका मारायला सुरुवात केली. लॅसीसुद्धा भुंकून जिमला बोलावत होती.

इथे जिम लॅसीला शोधून शोधून खूप दमला होता. चालता-चालता तो काट्याकुट्यांत पडत होता. तो अगदी रक्तबंबाळ झाला होता, आणि त्याचा पाय दुखावला

होता. तरी कसातरी उठून लंगडत तो लॅसीला शोधत होता.

आजोबा लॅसीला घेऊन जिमचा शोध घेतच होते. पण आपला जिम इथेच आपल्या आसपास आहे हे लॅसीनं वासावरून ओळखलं. तिला खूप आनंद झाला. तिनं भुंकायला सुरुवात केली आणि आजोबाही समजले की जिम इथेच असला पाहिजे.

लॅसी आजोबांना जिमजवळ घेऊन आली. आणि त्याला पाहून 'जिम आपल्या हाकेला ओ का देत नव्हता ?' हे आजोबांच्या लगेच ध्यानी आलं. जिम लॅसीला शोधून दमल्यामुळे, काट्याकुट्यांतून हिंडून रक्तबंबाळ झाल्यामुळे बेशुद्ध होऊन पडला होता. त्याला हाकाही ऐकू येत नव्हत्या, आणि उठताही येत नव्हतं.

आजोबांनी जिमची ही अवस्था पाहिली. त्यांना खूपच वाईट वाटलं. त्यांनी जिमला तसंच उचलून गाडीपाशी आणलं व त्याला घेऊन ते घरी आले. मम्मी अस्वस्थ होऊन वाटच पाहात होती. जिमला या अवस्थेत पाहून ती खूपच घाबरली. डॉक्टरांना घरी येण्यासाठी तिनं फोन केला.

जिम तापानं फणफणला होता. त्याचं सारं शरीर काट्याकुट्यांनी बोचकारलं होतं, लॅसी जिमकडे पाहात, अश्रू ढाळत सारखी त्याच्याजवळ बसून होती. तिनं खाऊला तोंडही लावलं नाही.

थोड्या वेळानं डॉक्टर आले. त्यांनी जिमला तपासलं. ते म्हणाले, ''बाहेरच्या थंड हवेनं जिमला न्युमोनिया झाला आहे. पण घाबरायचं मुळीच कारण नाही. मी औषध व इंजेक्शन देतो. तो लवकरच बरा होईल.''

जिम आता थोडा-थोडा सुधारत होता. त्याचा ताप उतरला होता. डोळे उघडताक्षणी त्यानं लॅसीला पायाशी बसलेलं पाहिलं. 'लॅसी' म्हणून त्यानं हाक मारली. त्याचक्षणी उडी मारून ती जिमच्या जवळ आली. जिमनं तिला घट्ट मिठी मारली आणि लॅसीनं जिमला चाटून काढलं. त्याचे पापे घेतले. जिम तिला म्हणाला, ''लॅसी, माझी लॅसी. तू माझी मैत्रीण आहेस ना ? तू मला कधीच सोडून जाऊ नकोस.'' जिम बरा झाला, परत मिळाला म्हणून तिलाही खूप आनंद झाला.

इतक्यात खिडकीकडे कसलासा आवाज झाला. म्हणून जिमनं पाहिलं. जिमची घोडी खिंकाळून तिचा आनंद व्यक्त करत होती. लॅसीनं बारीक आवाजात तिला दुजोरा दिला. दोघांची मैत्री झालेली पाहून जिमही बेहद्द खुश झाला. आणि लॅसीचा रुसवा कुठल्याकुठे नाहीसा झाला. हे दृश्य पाहाणारे जिमचे आजोबा व मम्मी किती आनंदित झाले याचं वर्णन करता येणं केवळ अशक्य होतं. जिम व लॅसीकडे पाहून दोघंही प्रेमपूर्वक हसत होते. □

# लॅसी आई होते



आज लॅसी जिमबरोबर खोलीत आली नव्हती. लॅसीला त्यानं हाक मारली, तरीही ती आली नाही. म्हणून जिम लॅसीला पाहायला बाहेर आला. तिथे पसरून ठेवलेल्या गवतावर निपचित पडलेली लॅसी त्याला दिसली. तिच्याजवळ येऊन जिमनं तिला हाक मारली. तिला थोपटून तिचे लाड केले. पण लॅसी जराही तेथून हलेना. उलट मध्येच ती कण्हत होती. लॅसीला नक्की बरं वाटत नाही. त्यानं तिला खाऊ देऊन पाहिला. पण छे! लॅसीचं कण्हणं मात्र चालू होतं. आणि हालचाल करण्याचं नावच नव्हतं. मग मात्र जिम खूपच अस्वस्थ झाला. एवढ्यात जोराचा वारा सुरू झाला आणि थोड्याच वेळात वादळानं थैमान घातलं.

तरी लॅसी तिथून उठत नाही असं बघून जिम घाबरला आणि त्यानं आजोबांना बोलावून आणलं. ते लगेच लॅसीजवळ आले. लॅसीला त्यांनी पाहिलं मात्र; लगेच त्यांच्या ध्यानात आलं की लॅसी आई होणार आहे, तिला बाळं होणार आहेत. ते जिमला हसून म्हणाले, ''तू म्हणजे अस्सा आहेस, जिम! माझा वेळ निष्कारण वाया घालवलास. अरे, घाबरू नकोस. बरं का, तुझ्या लॅसीला पिल्लं होणार आहेत.''

''काय, लॅसीला पिल्लं होणार?'' जिमला अत्यानंद झाला. तो घरात येऊन मिळेल ती वस्तू इकडे-तिकडे फेकू लागला. ह्या गोष्टीबद्दल आजोबा त्याच्यावर

ग्गावले आणि आपल्या मुलीला म्हणाले, ''तू जिमला फारच लाडावून ठेवलं आहेस बरं.''

जिम थोड्या वेळानं बाहेर आला. पहातो तर लॅसी तळमळत होती. जिमच्या मम्मीला तिची ही तळमळ बघवेना. मधूनच ती रडवेला आवाज काढत होती. वादळी वारेही जोरात सुटले होते. मम्मी धावत फोनपाशी आली. तिनं डॉक्टरांना बोलावण्यासाठी फोन लावला. पण छे! आज त्या फोनचा संपर्क साधेना. दोघांची अस्वस्थता क्षणोक्षणी वाढत होती.

लॅसीच्या कळवळून रडण्यानं काय करावं तेच जिमला सुचेना. तो रडायलाच लागला. मम्मीनं त्याला धीर दिला. ती म्हणाली, ''जिम, बाळा, घाबरू नकोस. अजून थोडा वेळ आहे, तिला बाळ व्हायला. लॅसीला पण तिची बाळं हवी आहेत,'' असं म्हणून तिनं तिचे लाड केले.

पण जिमचा एकच घोषा चालू होता. 'मम्मी, तिला कधी ग बरं वाटेल?' तिला त्यानं दूध देण्याचा प्रयत्न केला. पण लॅसी दुधाला अजिबात तोंड लावेना. मम्मी जिमची सारी तळमळ पाहात होती. ती जिमला शांत राहायला सांगत होती. जिम मम्मीला म्हणाला, ''मम्मी, माझ्या लॅसीला काही त्रास नाही ना होणार? माझी लॅसी माझी उत्तम मैत्रीण आहे. तिला काही झालं तर मी तिच्याशिवाय राहूच शकणार नाही. ती अजिबात वाईट नाही ग, मम्मी. देवा, तिला सोडव रे, तिची सुटका कर,'' म्हणून जिम देवाची प्रार्थना करू लागला. त्याच्या डोळ्यांतून अश्रू गळत होते.

मम्मी डॉक्टरांना सारखी फोन करत होती. सारखी आतबाहेर करून लॅसीला पाहात होती. तिच्या तोंडात पाणी घालत होती. आता मात्र तिचाही धीर सुटला होता. तिलाही रडू आवरेना. रात्रही बरीच झाली होती. तेवढ्यात जिमनं युक्ती काढली, आपण हिला डॉक्टरकडे नेऊ या! पण मम्मी म्हणाली, ''या अवस्थेत आपण तिला कुठेही नेऊ शकत नाही.'' ''मग मी जाऊ का डॉक्टरला आणायला?'' जिमनं विचारलं, ''मम्मी, लॅसीला मदत तर मिळालीच पाहिजे, तेव्हा तू मला अडवू नकोस.'' मम्मीला टाटा करून जिम सायकलवरून डॉक्टरांना आणायला गेलासुद्धा. भरधाव वेगानं सायकल चालवून तो थकला आणि शेवटी सायकलवरून खाली पडला. पहातो तर सायकलचा टायरसुद्धा फुटला होता. हे आणखी नवीनच संकट उभं राहिलं. पण कसल्याच संकटांची पर्वा न करता तो लंगडत लंगडत डॉक्टरांच्या घरापाशी आला. त्यानं घराचा दरवाजा ठोठावला. डॉक्टरांची पत्नी बाहेर आली. तिनं जिमला पाहून विचारलं, ''बाळ, तुला काय हवंय? कशाला आला आहेस तू?''

तो म्हणाला, ''लॅसीला पिल्लं होणार आहेत, ती फार तळमळत आहे. म्हणून डॉक्टरांना न्यायला आलो आहे.'' यावर ती म्हणाली, ''पण डॉक्टर तर घरात नाहीत, थोड्या वेळानं येतील ते.''

जिम तसाच सुसाट पळाला. वाटेत त्याला डॉक्टर पिटर गाडीतून जाताना दिसले. त्यानं त्यांना हात केला. पण गाडी वेगात असल्यामुळे पुढे निघून गेली. जिम कमालीचा निराश झाला. पण जिमनं त्यांना हात केला हे डॉक्टरांनी पाहिलं होतं. त्यांनी गाडी तशीच वळवली. ''तू एवढ्या रात्री इथे कसा ?'' त्यांनी विचारलं. जिम रडत रडत त्यांना म्हणाला, ''डॉक्टर, माझी लॅसी केव्हापासून तळमळते आहे. तिला पिल्लं होणार आहेत. तुम्ही आत वेळ लावू नका. लगेच माझ्याबरोबर चला.''

जिम डॉक्टरांना घेऊन आला. डॉक्टर लॅसीजवळ गेले. त्यांना पाहून तिला रडू आलं, तसं त्यांनी तिला मायेनं थोपटलं. नंतर त्यांनी लॅसीला एक इंजेक्शन दिलं. बाजूला आजोबा व मम्मीसुद्धा उभे होते. मग त्यांनी मम्मीला एक मोठा बॉक्स आणायला सांगितला आणि लॅसीला त्यात अलगद बसवलं.


जिमचा जीव अगदी थाऱ्यावर नव्हता. 'डॉक्टर, लॅसी कशी आहे ?' 'पुढे काय होणार ?' वगैरे प्रश्नांची सरबत्ती त्यानं चालू केली. ते जिमला म्हणाले, ''बाळ, आता तुला लॅसीबद्दल घाबरण्याचं मुळीच कारण नाही. लॅसीला आता लवकरच बाळं होतील. तिचं स्वतःचं कुटुंब होईल. बरं, मी येतो.'' सर्वांनी डॉक्टरांचे आभार मानले आणि त्यांना निरोप दिला.

रात्र फार झाली होती. मम्मीनं जिमला खोलीत जाऊन झोपायला सांगितलं. थोड्याच वेळात तो गाढ झोपी गेला. भल्या पहाटे त्याला जाग आली, आणि लगोलग तो लॅसीजवळ गेला. पहातो तर त्याला काय दिसलं ? लॅसीला सुंदर, गोंडस, इवली-इवली अशी तीन पिल्लं झाली होती. तिच्या कुशीत ती चुळबूळ करत होती, दूध पित होती. त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला. मम्मीला मोठ्यानं हाक मारून तो ओरडला, ''मम्मी, आपली लॅसी आई झाली.''

जिमकडे त्याची मम्मी मोठ्या कौतुकानं पाहात होती. □

२६६४ दिनांक १/५/८३
विषय बा.वा.

# सिंहाच्या तावडीत



जिमच्या मम्मीला काही कामासाठी, एक आठवड्याकरता बाहेरगावी जायचं होतं. जाण्यापूर्वी तिनं सारी व्यवस्था केली होती. फ्रिजमध्ये तिनं आठवड्याभरासाठी म्हणून खूप खाऊ तयार करून ठेवला होता. शिवाय जवळच राहाणाऱ्या फोर्टीला जिमच्या सोबतीला बोलावलं होतं; आजोबा होतेच.

फोर्टीतर केव्हाच येऊन बसला होता. जिम आपल्या लॅसीच्या करामती फोर्टीला सांगत होता. 'लॅसी, खाली बस', 'पडून राहा', 'शेक हँड कर', एक ना दोन, अनेक गोष्टी. लॅसी निमूटपणे ऐकून करत होती. आणि दोन्ही मुलं टाळ्या वाजवून तिला प्रोत्साहन देत होती.

जिमच्या मम्मीची एव्हाना सगळी तयारी झाली होती. निघताना ती जिमला म्हणाली, ''जिम, तुम्हा सर्वांसाठी तुमच्या आवडीचं जेवण करून मी ते फ्रिजमध्ये ठेवलं आहे. तुम्हाला जे आवडेल ते खाऊन घ्या''. आणि टाटा करून ती निघाली. आजोबा तिला स्टेशनवर सोडायला गेले.

मम्मी व आजोबा गेल्यावर मुलांनी दरवाजा लावला. जेवायला अजून थोडा अवकाश होता. म्हणून दोघांनी गोष्टींचं पुस्तक वाचायला घेतलं. बराच वेळ वाचनात गेला. आता मात्र फोर्टीला खूप भूक लागली. तो जिमला म्हणाला, ''मित्रा, आपण आता

जेवून घेऊ या का?'' जिम म्हणाला, ''चालेल, मलाही खूप भूक लागली आहे.'' दोघांनीही आपल्याला आवडेल ते जेवायला घेतलं, आणि जेवण गरम करून ते जेवायला बसले. आपल्याबरोबर जिमनं लॅसीलासुद्धा तिचा खाऊ दिला.

इतक्यात दाराबाहेर लॅसीला कसलातरी आवाज ऐकू आला. ती जेवण सोडून दरवाजाच्याजवळ गेली, आणि आपल्या दोन्ही हातांनी दरवाजा खरवडू लागली. दोन्ही मुलं जेवणात एवढी दंग झाली होती की त्यांचं लॅसीच्या हालचालींकडे लक्षही गेलं नाही. पण थोड्या वेळानं एका मोठ्या आवाजानं ती दोघंही चांगलीच दचकली. तो सिंहाचा आवाज होता. लॅसीकडे त्यांचं लक्ष गेलं, तसं त्यांच्या काळजाचं पाणी पाणी झालं. ती दोघंही सिंह आल्याच्या कल्पनेनं भेदरून गेली.

जिम फोर्टीला म्हणाला, ''फोर्टी, मी जेनीला फोन करतो. ती नक्कीच आपली काळजी घेईल.'' जिम फोनकडे गेला आणि त्यानं जेनीचा नंबर फिरवला. मात्र सिंहाच्या गर्जनेनं तो फोनवर नीट बोलूच शकला नाही.

तरीसुद्धा जिमनं जेनीला पुन्हा एकदा फोन लावला. फोन घेतल्यावर जेनी म्हणाली, ''काय म्हणतोस जिम, सिंह आला आहे? जिम, तू तर मला अगदी काळजीत टाकलंस. पण तुम्ही मुळीच घाबरू नका. मी सारी व्यवस्था करते. पण तुम्ही दरवाजा मात्र उघडू नका, बरं का.''

जिमच्या मनात एक कल्पना आली. तो फोर्टीला म्हणाला, ''कदाचित त्याला भूक लागली असेल तर? त्याची भूक भागली तर तो निघूनही जाईल.'' त्यानं फोर्टीला दरवाजा उघडून दाराला थोडीशी फट ठेवायला सांगितलं. पण दरवाज्याकडे जाण्याचा फोर्टीला धीर होईना. तरी पण जिमच्या जोरदार आग्रहाला बळी पडून फोर्टीनं अंगात मोठं बळ आणलं आणि दरवाजा अगदी छोट्या फटीच्या रूपात उघडला. जिमनं त्या फटीतून मांसाचा तुकडा बाहेर फेकून दिला. स्टुलावर चढून दरवाज्याच्या काचेतून दोघांनी पाहिलं, सिंहानं तो मांसाचा तुकडा गट्ट केला. पण त्या लहानशा मांसाच्या तुकड्यानं काही त्या सिंहाची भूक भागली नाही. त्यानं पुन्हा दारावर पंजा मारण्यास सुरुवात केली.

आता मात्र दोघा मित्रांची भीतीनं गाळण उडाली. त्यांना रडू आलं. अजूनही आजोबा आले नव्हते. दरवाजा तर जोरजोरानं हलत होता. लॅसीचं भुंकणंही चालूच होतं. आणि क्षणार्धात सिंहानं दरवाजा उघडण्यात यश मिळवलं. तो आत आला. आता दोन्ही मुलांची काय अवस्था झाली असेल त्याची कल्पनाच न केलेली बरी. पण जिम मोठा धाडसी होता. त्यानं फोर्टीला व लॅसीला दुसऱ्या खोलीत नेलं आणि मागून जाऊन सिंहानं प्रवेश केलेला दरवाजाही पुन्हा लावून घेतला. हे सर्व जिमनं विलक्षण गतीनं व धैर्यानं केलं.

हे सर्व घडतं आहे तोवर जेनीनं सुरक्षा दलाला फोन करून त्यांच्या

दोन गाड्या व माणसं धाडून दिली. प्रथम त्यांनी मुलांना बाहेर उभं असलेलं पाहिलं. मुलांना सुरक्षित पाहून त्यांना खूप आनंद झाला. नंतर त्यांनी मोठ्या चातुर्यानं सिंहाला पकडलं आणि गाडीत बंद करून ठेवलं.

पण त्यांना कौतुक वाटलं ते जिमच्या साहसाचं. ते खूपच खुष झाले. सिंहाला अडकवून आपली सुटका करून घेण्याचं जे विलक्षण चातुर्य आणि धाडस जिमनं दाखवलं त्याबद्दल जिमची त्यांनी खूप तारीफ केली. शिवाय त्याला शंभर डॉलर्स बक्षीस म्हणून दिले, ते वेगळेच.

हा सर्व प्रकार होतो न होतो तेवढ्यात आजोबा मम्मीला स्टेशनवर सोडून परत आले. जिम व फोर्टीनं त्यांना घडलेली सगळी चित्तथरारक गोष्ट सांगितली. शंभर डॉलर्स बक्षीस मिळालं आहे हेही सांगण्यास ते विसरले नाहीत. आजोबांनी गहिवरून त्या दोघांना जवळ घेतलं व ते म्हणाले, ''अरे बाळांनो, तुम्ही सुरक्षित राहिला नं, त्यातच आम्हाला सर्व काही मिळालं.'' यावर जिम म्हणतो कसा, ''आजोबा, आणि आपली लॅसीसुद्धा.'' हे ऐकून लॅसीनं जिमच्या जवळ येऊन त्याचे खूप लाड केले, त्याला पापी दिली. आज केवढ्या मोठ्या भयंकर संकटातून त्यांची मुक्तता झाली होती ! ☐





# सर्पदंश; काळ आला होता पण...

जिम बाहेर गेला, आणि त्याच्याबरोबर लॅसी नाही असं सहसा कधी घडलंच नाही. दोघांनी कायम एकत्र राहायचं हे समीकरण अगदी ठरून गेल्यासारखं होतं. त्याला आजही अपवाद नव्हता. जिम व लॅसी सकाळीच बाहेर पडली. लॅसीला फक्त चल म्हणण्याचाच अवकाश, लॅसी जिमच्या पुढे तत्परतेनं हजर.

जिमनं एक पिशवी बरोबर घेतली होती. त्याला आज एका झाडाची फळं काढायची होती. जिम लॅसीबरोबर पायांनी काटे-कुटे तुडवत, झाडाझुडपातून चालला होता. तोंडानं शीळ वाजवत, मध्येच गाणं म्हणत जिम आनंदानं उड्या मारीत जात होता. थोड्या वेळानं त्याला हव्या असलेल्या फळांच्या झाडापाशी तो आला. आनंदाच्या भरात त्याचं कुठेच लक्ष नव्हतं. त्यानं फळं तोडायला सुरुवात केली. लॅसी त्याच्या बाजूला चुपचाप बसून होती.

जिम फळं तोडण्यात दंग झाला होता. इतक्यात लॅसीनं मोठमोठ्यानं भुंकायला सुरुवात केली. काहीतरी संकट असल्याशिवाय लॅसी भुंकणं शक्यच नाही हे जिमला पक्कं ठाऊक होतं. त्यानं लगेच लॅसीकडे पाहिलं, तर काय ? लॅसी एका भल्या मोठ्या सापाकडे पाहून भुंकत होती. तो साप जिमला चावू नये म्हणून त्याला ती सावध करत होती. सापाला पाहून जिमची बोबडीच वळली.

आता तो साप फुत्कार करत जिमजवळ न जाता लॅसीजवळ आला.

लॅसी त्याच्याशी झगडत होती, जिमचं त्याच्यापासून रक्षण करत होती. पण साप तिथून निघून जाण्याचं चिन्ह दिसेना. जिमनं त्याला एक दगड मारून पाहिला, तरी काही उपयोग झाला नाही. आता त्याला लॅसीची काळजी वाटू लागली. लॅसीची तर सापाबरोबर झटापट चालूच होती. 'या झटापटीत लॅसीला काही इजा झाली तर?' या कल्पनेनंच जिम शहारला, आणि तिला जवळ घेण्यासाठी पुढे सरकला. तेवढ्यात त्या सापानं संधी साधून जिमच्या पायाला डंख मारला. जिमनं त्याला आधी दगड मारला होता, त्याचा जणू त्यानं सूडच उगवला.

सर्पदंशाची वेदना असह्य होऊन जिम धाडकन् कोसळून खाली पडला. लॅसीनं हे पाहिल्यावर जोरजोरात भुंकायला सुरुवात केली. आजोबा जवळच शेतात काम करत होते. त्यांच्या कानावर लॅसीच्या भुंकण्याचा आवाज पडला. 'नक्कीच काहीतरी घोटाळा असला पाहिजे, त्याशिवाय लॅसी भुंकणं शक्यच नाही...' आजोबांनी हातातलं काम तसंच टाकलं आणि ते लॅसीच्या आवाजाच्या रोखानं निघाले. जिम व लॅसी ज्या ठिकाणी होते त्या ठिकाणी ते आले. त्यांनी जे दृश्य पाहिलं, ते फारच भयानक होतं, जिवाचा थरकाप उडविणारं होतं. त्यांनी पाहिलं तर त्यांचा लाडका जिम बेशुद्ध होऊन पडला होता आणि लॅसी त्या भल्यामोठ्या सापाबरोबर झुंज देत होती. प्रथम आजोबांनी हातातल्या लोखंडी हत्यारानं सापाला तिथल्या तिथे ठेचून काढला. पण लॅसीनं त्याआधीच त्याला अर्धमेला केला होता.

त्यानंतर ते जिमच्या जवळ गेले. मोठ्या व्याकुळतेनं त्यांनी हाक मारली, "बाळ जिम, डोळे उघड बाळा. मी तुझा आजोबा." आजोबांचे शब्द कानी येताच जिमनं अर्धवट डोळे उघडले. त्याला सर्पदंशाच्या वेदना असह्य होत होत्या. त्यानं आपला पाय पुढे करून पायाची जखम आजोबांना दाखवली. आजोबा मनोमन खूपच घाबरले, पण त्यांनी आपल्या मनाची ही अवस्था जिमला दिसू दिली नाही. प्रथम त्यांनी जिमचा पाय कपड्यानं घट्ट बांधला आणि जिमला ते म्हणाले, "बाळा, थोडं सोस, बरं का?" आणि त्यांनी झटक्यासरशी सगळी जखम जाळून टाकली. जिम वेदनेनं चांगलाच कळवळला. त्यानं रडायला सुरुवात केली. जिमचं वेदनेनं कण्हणं, कळवळणं, लॅसी डोळ्यांत अश्रू आणून पाहात होती. ती केविलवाणी बसून होती.

मग आजोबांनी जिमला गाडीत झोपवलं. लॅसीला 'चल' म्हणताच ती टुणकन् गाडीत जाऊन बसली. आजोबांनी जिमला घरी आणलं. दारातच मोठ्या आकांतानं त्यांनी मुलीला हाक मारली, "ॲलन, ॲलन, अग, लवकर बाहेर ये." जिमची मम्मी घाबरून बाहेर आली. पहाते तो काय, जिम बेशुद्ध होऊन आजोबांच्या हातात आहे. तिनं विचारलं, "डॅडी, काय झालं तरी काय माझ्या जिमला?" ते म्हणाले, "ॲलन, आपल्या जिमला साप चावला आहे ग." हे ऐकून ती धाय मोकलून रडायला लागली. पण लगेच तिनं स्वत:ला सावरलं आणि ती डॉक्टरांना फोन करायला गेली. फोनवर धडपणे तिला बोलताही येत नव्हतं.

कसाबसा तिनं त्यांना निरोप दिला, ''डॉक्टर, जिमला साप चावला आहे. आम्ही त्याला लगेच घेऊन येत आहोत.''

आजोबांनी मम्मीला ब्लँकेट आणायला सांगितलं. तिनं लगेच ब्लँकेट आणलं. ते त्यांनी जिमला गुंडाळलं आणि मुलीला म्हणाले, ''ॲलन, चल लवकर, आपण डॉक्टरकडे जाऊ. बघ, जिम अगदी तापानं फणफणला आहे.'' आणि लॅसीकडे पाहून ते म्हणाले, ''लॅसी, तू घरी राहा बरं का. आम्ही डॉक्टरांकडे जाऊन येतो''. पण लॅसीला ही आज्ञा मुळीच मानवली नाही. तिनं बारीक आवाज काढून रडायला सुरुवात केली. पण आजोबा व मम्मीचा आज नाईलाजच होता. लॅसीला घरीच ठेवून गाडी भरधाव वेगानं निघाली.

जेवढी पळवता येईल तेवढ्या वेगानं आजोबा गाडी पळवत होते. ऐंशी वर्षांचा तो वृद्ध माणूस जिमसाठी वाटेल ते करायला तयार होता. गाडीत मम्मीच्या मांडीवर जिम झोपला होता. अजूनही तो नीटसा शुद्धीवर आला नव्हता. मम्मी त्याचे सारखे लाड करत होती, आजोबा गाडी चालवताना मधून-मधून चौकशी करत होते. डॉक्टरांकडे पोचेपर्यंत काही त्यांच्या जिवात जीव नव्हता. पण म्हणतात नं, संकटं यायला लागली की एकामागून एक येतात. गाडीला एक मोठा धक्का बसून गाडी मध्येच थांबली. एक मोठा दगड चाकाखाली आला होता. अरे बापरे! देवा, हे काय आणखी नवीन संकट? आजोबा व मम्मीला दरदरून घाम सुटला. मम्मीच्या डोळ्यांतून तर अश्रुधारा वाहू लागल्या. या स्थितीत डॉक्टरकडे जायला नक्कीच उशीर होणार होता. आणि साऱ्या शरीरभर सापाचं विष पसरलं तर? अशा परिस्थितीतून जिमचं काही बरंवाईट झालं तर? खरंच, काय करावं हा प्रश्न दोघांपुढे आ वासून उभा राहिला.

इकडे लॅसीला आजोबांनी घरात ठेवल्यावर, क्षणाचाही विलंब न करता तिनं खिडकीची काच फोडून पलायन केलं आणि गाडी ज्या वाटेवरून गेली तिथून वास काढत काढत ती जिमकडे आली. लॅसीला आलेली पाहून आजोबांना अगदी देवदूत आल्यासारखं वाटलं. त्यांना लगेच एक युक्ती सुचली. त्यांनी डॉक्टरांना आपल्यावर आलेल्या परिस्थितीबद्दल व जिमच्या गंभीर अवस्थेबद्दल एक चिठ्ठी लिहिली. त्यांनी ती चिठ्ठी लॅसीच्या तोंडात दिली आणि तिला ती डॉक्टरकडे नेऊन देण्यास सांगितलं. डॉक्टरांचं घर लॅसीला माहीत होतंच. लॅसी तोंडात चिठ्ठी घेऊन सुसाट वेगानं पळत सुटली.

पण एवढं करूनही संकटांचा ससेमिरा संपला नव्हता. थोड्या अंतरावर लॅसी आली एवढ्यात वाटेत एक लांडगा आला. त्यानं लॅसीवर हल्ला केला. लॅसीसुद्धा त्याच्यावर तुटून पडली. दोघांच्या झटापटीनं चिठ्ठी जवळच असलेल्या ओढ्यात पडली आणि वाहून गेली. पण लॅसीनं प्रतिकार करून त्या लांडग्याला तर पळवलंच; पण वाहून गेलेली चिठ्ठीही मिळवली. पुन्हा तिनं जोरानं पळायला सुरुवात केली.

आता मात्र नशिबानं साथ दिली. वाटेतच लॅसीला डॉक्टरांची

गाडी जाताना दिसली. डॉक्टर दुसरीकडे जाऊन घरी परतत होते. लॅसीनं डॉक्टरांची गाडी अचूक ओळखली आणि तिनं जोरजोरात भुंकायला सुरुवात केली. गाडीच्या मागून भुंकत-भुंकत लॅसी धावत होती. बरंच पुढे गेल्यावर डॉक्टरांना लॅसीच्या भुंकण्याचा आवाज ऐकू आला. ते बरोबरच्या सहकाऱ्याला म्हणाले, ''काहीतरी विशेष असल्याशिवाय लॅसी भुंकणार नाही.'' त्यांनी गाडी थांबवली व ते लॅसीजवळ आले. तिच्या तोंडातली चिठ्ठी त्यांनी वाचली. अरे बापरे! आता उशीर करून चालणार नाही. खरंच, जिमच्या जिवाला धोका आहे. डॉक्टर लॅसीला म्हणाले, ''लॅसी, चल. आम्हाला रस्ता दाखव.'' बिचारी लॅसी फारच दमली होती. तरी तिच्या जिमसाठी म्हणून ती पळत सुटली, आणि लॅसी पुढे, गाडी मागे असा प्रवास सुरू झाला.

इथे आजोबा जिमला घेऊन रस्त्यानं चालत होते. मध्येच ते दमले, की मम्मी जिमला उचलून घेई. जिमला उचलून आजोबा फारच दमले होते. इतके की तेच कोसळून पडण्याच्या बेतात होते. जिमचे डोळे अद्याप बंदच होते. त्याची ही अवस्था आजोबा व मम्मी यांना असह्य होत होती. त्यांचा धीर पार सुटत चालला होता. मध्येच मम्मी जिमच्या डोक्यावर पाण्यात भिजवून रुमाल ठेवत होती, त्याचे पाय दाबत होती.

इथे लॅसीनं अचूक रस्ता दाखवून डॉक्टरांना जिम होता तिथे आणलं. लॅसीच्या भुंकण्याचा आवाज मम्मीनं ऐकला, ती पण थांबून राहिली. ती विलक्षण दमली होती. सर्वजण जिमकडे आले. डॉक्टरांनी जिमला तपासलं. अजून आशेला जागा होती. थोडा उशीर झाला असता तर?... डॉक्टरांनी जिमला तिथेच इंजेक्शन दिलं. मग सर्वजण जिमच्या घरी आले. घरी आल्यावर पुन्हा त्यांनी औषधोपचार सुरू केले. जिमच्या पलंगाभोवती मम्मी, आजोबा, लॅसी, सारे सचिंत चेहऱ्यानं बसले होते. लॅसीचे डोळेसुद्धा अश्रूंनी डबडबले होते.

थोडा वेळ गेला आणि जिमनं डोळे उघडले. आपल्याभोवती सगळेजण का उभे आहेत याचा त्याला उलगडाच होत नव्हता. जणू काही गाढ झोपेतून तो जागा होत होता. तो मम्मीला म्हणाला, ''तुम्ही सर्व माझ्याभोवती का उभे आहात? मम्मी, काय झालं ग?'' मम्मीनं सांगितलं, ''बाळा, तुला साप चावला होता. पण ह्या डॉक्टरकाकांनी तुझ्या शरीरातलं विष काढून तुला बरं केलं आहे.'' जिमनं मोठ्या कृतज्ञतेनं डॉक्टरांकडे पाहिलं. तो म्हणाला, ''थँक यू, डॉक्टर.''

जिमच्या मम्मीचा व आजोबांचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यानी जिमला मिठीत घेऊन त्याचे लाड केले. आणि जिमची लॅसी; तिचं तर काही विचारूच नका. आनंदानं बेहोश होऊन तिनं टुणकन् पलंगावर उडी मारली. जिमला ती चाटायला लागली, त्याचे पापे घेऊ लागली, आज तिचा जिम केवळ तिच्याच प्रयत्नांमुळे तिला भेटला होता. खरंच, काळ आला होता पण वेळ आली नव्हती, हेच खरं! □

# लॅसी कोर्टात जाते



जिमची शाळा सुटली तसा रॉबर्ट जिमबरोबर निघाला. त्याच्या मनात आज जिमच्या घरी जायचं होतं. जिमच्या लॅसीला आणि घोडीला पाहायची त्याची अनिवार इच्छा होती. बऱ्याच वेळानं तो जिमला म्हणाला, ''मी आज डॅडींबरोबर तुझ्या घरी येतो. चालेल ना?''

जिम म्हणाला, ''हो, हो. तू जरूर ये. मी तुझी वाट पाहातो.''

संध्याकाळी जिम आपला मित्र रॉबर्ट याची वाट पहात होता. थोड्या वेळानं गाडीचा आवाज आला. जिमनं बाहेर येऊन पाहिलं. खरंच त्याचा मित्र व त्याचे डॅडी आले होते. जिमनं रॉबर्टला आपल्याबरोबर नेलं आणि त्याचे डॅडी आजोबांबरोबर गप्पा मारत बसले.

थोडा वेळ खेळून झाल्यावर रॉबर्टला रहावेना. त्यानं लॅसीला तसं पाहिलं होतं, कारण ती जिमबरोबर सतत असे. पण जिमची नवी घोडी पाहाण्याची उत्कंठा त्याला लागली होती. तो जिमला म्हणाला, ''मित्रा, तुझी नवी घोडी दाखव नं मला.'' जिमनं अगदी आनंदानं त्याला घोडी दाखवायचं कबूल केलं. घोडी बांधली होती तिथे तो त्याला घेऊन गेला. इतक्यात जिमच्या मम्मीनं जिमला हाक मारली. तसा तो रॉबर्टला म्हणाला, ''तू इथेच थांब, मी लगेच जाऊन येतो.''

लहानखोर घोडी पाहून तिची थोडी गंमत करण्यासाठी रॉबर्टचं नाठाळ मन चळवळ करू लागलं. बाजूलाच पडलेली एक काठी घेऊन तो घोडीपाशी गेला. रॉबर्टला पहाताक्षणी घोडीनं खिंकाळायला सुरुवात केली. प्राणीसुद्धा आपल्यावर प्रेम करणाऱ्या माणसांना बरोबर ओळखतात, आणि रॉबर्टतर त्यामधला एक नव्हता. तो प्राण्यांकडे, आपल्या मजेचं केवळ एक साधन, या दृष्टीनं पाहात असे. घोडी खिंकाळायला लागली म्हणून त्याला तिचा खूप राग आला. हातातल्या काठीनं तो तिला डिवचायला लागला. लॅसी तिथेच रॉबर्टवर लक्ष ठेवून होती. घोडीला काठीनं डिवचलेलं तिला मुळीच आवडलं नाही. तिनं रॉबर्टवर भुंकायला सुरुवात केली आणि घोडीनं आपल्या पुढच्या पायांनी त्याला ढकलून दिलं. या अनपेक्षित लाथेच्या धक्क्यानं रॉबर्ट कोलमडून पडला. त्याला लाथेचा चांगलाच्च फटका बसला होता. पण चूक रॉबर्टची होती. त्यानं घोडीला काठीनं डिवचून तिची खोडी काढली नसती तर हे सारं घडलंच नसतं.

आता रॉबर्टची मोठी पंचाईत झाली. घोडीची चहाडी करावी तर जिमला ते पटलं नसतं. आपणहून कोणाला लाथ मारणारी त्याची घोडी नव्हती. म्हणजे रॉबर्टनंच प्रथम तिची कळ काढली असणार हे सगळ्यांना समजणार. मग हे सारं लपविण्याचा एकच मार्ग होता. तो म्हणजे खोटं बोलणं, कांगावा करणं. आता त्यानं मोठमोठ्यानं ओरडायला, रडायला सुरुवात केली. तसे घरातून सर्वजण धावतच बाहेर आले. त्याबरोबर रॉबर्टनं आपले पाय धरून आणखी जोरजोरानं रडायला सुरुवात केली. त्याचे डॅडी त्याच्या जवळ आले. त्यांनी विचारलं, "बाळ, काय झालं तुला ?"

तो रडत म्हणाला, "डॅडी, मला लॅसी चावली."

हे ऐकल्यावर रॉबर्टच्या डॅडींचा राग अनावर झाला. ते जिमच्या आजोबांबरोबर भांडायला लागले. ते म्हणाले, "तुमची कुत्री फार भयानक आहे. ती चावरी आहे." पण जिमला व आजोबांना त्यांचा हा आरोप अजिबात सहन झाला नाही. ते म्हणाले, "आमची लॅसी मुळीच चावरी नाही. ती अजूनपर्यंत कुणालाच चावलेली नाही." खूप हमरीतुमरी झाल्यावर रॉबर्टचे डॅडी रॉबर्टला म्हणाले, "चल, आपण आता इथून जाऊ. आता आपली भेट कोर्टातच होईल." असं म्हणून तावातावानं ते दोघं निघून गेले.

इथे जिम हे सर्व ऐकून घाबरून गेला. खरंच लॅसी चावली असेल का ? आणि ती चावली असं कोर्टात सिद्ध झालं तर ? असे अनेक विचार त्याच्या इवल्याशा डोक्यात येऊ लागले. त्याला काहीच सुचेना. लॅसीला शिक्षा होईल, ती आपल्यापासून दूर जाईल, तिला मार बसेल, या आणि अशा उलटसुलट विचारांनी त्याचं बालमन घाबरून गेलं. पण आजोबा व मम्मी त्याला धीर देत होते. ते जिमला म्हणाले, "तू मुळीच घाबरू नको. आपली लॅसी रॉबर्टला मुळीच चावलेली नाही, याची आम्हाला पूर्ण खात्री आहे. निकाल आपल्याच

बाजूनं लागेल. तेव्हा तू शांत राहा.''


अखेर कोर्टात जाण्याचा दिवस उजाडला. दोन्ही पक्षांचे वकील व माणसं कोर्टात हजर होती. लॅसीलासुद्धा आणण्यात आलं. जिमच्या बाजूला ती अगदी निमूटपणे बसून होती. प्रथम जिमची उलटतपासणी झाली. 'जिम तिथे हजर होता का? मग तिथे कोण कोण होतं?' सारं काही विचारलं गेलं. त्याचप्रमाणे आजोबांनाही प्रश्न विचारले गेले.

त्यानंतर रॉबर्टला पिंजऱ्यात उभं करण्यात आलं. जिमच्या वकिलांनी त्याला काही प्रश्न विचारले. त्या प्रश्नांची उत्तरं काही रॉबर्टला धडपणानं देता आली नाहीत. नंतर त्यांनी जखमेवरची पट्टी काढून जखम दाखविण्यास रॉबर्टला सांगितलं. मग मात्र रॉबर्ट घाबरला. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव लगेच बदलले. मोठ्या अनिच्छेनं त्यानं पट्टी सोडली. पहातात तर काय? लॅसीच्या दातांची चावल्याची खूण तर रॉबर्टच्या पायावर नव्हतीच, पण साध्या जखमेचाही पत्ता नव्हता. मग वकिलांनी त्याला विचारलं, ''रॉबर्ट, तू कुठे उभा होतास?''

''मी जिमची घोडी ठेवली आहे तिच्या समोर होतो,'' रॉबर्ट उत्तरला.

''मग जर तू घोडीच्या समोर नुसता उभा होतास तर मग लॅसी तुला येऊन का चावली?'' ह्या प्रश्नाचं उत्तर देताना तो चांगलाच गांगरला, कारण त्यानंच घोडीला काठीनं डिवचलं होतं. आणि त्याची शिक्षा घोडीनं पायानं लाथाडून त्याला दिली होती. तो जमिनीवर कोसळल्यामुळे त्याला मुका मार बसला होता. रॉबर्ट पडल्यावर लॅसीनं भुंकून जिमला बोलावलं होतं. तो पडलेला पाहून तिला वाईट वाटलं होतं. तिच्याजवळ असलेली माणुसकी रॉबर्ट माणूस असूनही त्याच्याकडे नव्हती. त्यानं आपली लबाडी लपविण्याकरता, उलट, लॅसी चावली म्हणून आरडाओरडा केला होता. ही गोष्ट त्यानं गांगरून जाऊन जशीच्या तशी कोर्टात वकिलांना सांगितली. शेवटी रॉबर्ट खोटा ठरला व लॅसीच्या बाजूनं निकाल लागला.

जिमला लॅसी निर्दोष आहे हे ऐकून खूप आनंद झाला. त्यानं लॅसीला जवळ घेतलं, तिचे लाड केले. तिनंही जिमचे लाड केले. आजोबा व मम्मी हे सारं दृश्य प्रेमानं पाहात होते. आजोबा जिमला म्हणाले, ''जिम, मी काय म्हणालो ते पटलं ना तुला? आपली लॅसी फार चांगली आहे. ती कुणाला चावत नाही आणि चावणारही नाही. चल, आता घरी जाऊ या.'' लॅसीला घेऊन सर्वजण आनंदानं घरी आले. रॉबर्टचा व त्याच्या डॅडींचा चेहरा अगदी फोटो काढण्यालायक झाला होता. □



# मांजरीची पिल्लं

दिवस उजाडला तशी जिमला जाग आली. भला मोठा आळस देऊन तो उठला. त्यानं लॅसीला पाहिलं तर ती खोलीत नव्हती. जिमनं 'लॅसी, लॅसी' अशी मोठ्यानं हाक मारली. जिमच्या हाकेसरशी धावत धावत लॅसी जिमच्या खोलीत आली. जिम पाहातो तर काय, तिच्या तोंडात मांजरीचं एक पिल्लू होतं. ते जिमला दाखवायला घेऊन ती आली होती. लॅसी जिमला मांजरीच्या इतर पिल्लांजवळ घेऊन आली. तीन-चार इवली-इवली पिल्लं पाहून त्याला खूप आनंद झाला. ती पिल्लं त्याला खूप आवडली. नाहीतरी जिमचा स्वभाव प्राण्यांवर प्रेम करण्याचा होता. पण त्याला एक गोष्ट खटकली. त्या पिल्लांजवळ त्यांची आई नव्हती. झालं, जिमच्या इवल्याशा डोक्यात विचारचक्र सुरू झालं. ह्या पिल्लांची आई कुठे गेली असेल? ह्या पिल्लांना दूध कोण देणार? दूध न मिळाल्यानं ती भुकेनं मरणार तर नाहीत ना? ह्या सर्व विचारांनी त्याच्या डोक्यात थैमान घातलं. तो व्याकुळ अंत:करणानं धावत मम्मीकडे गेला. स्वयंपाकघरात आजोबा टेबलावर नाश्ता करत बसले होते. जिमला पाहिल्यावर मम्मी म्हणाली, ''अरे जिम, तू दात घासलेस का? घासले असशील तर नाश्ता करायला ये.''

पण जिम मम्मीला म्हणाला, ''मम्मी, तू आधी बाहेर ये. तुला एक गंमत दाखवतो.'' मम्मी जिमला कधीच नाराज करत नसे. त्यांच्या कलानंच ती वागे.

आपला जिम किती प्रेमळ व गुणी आहे हे तिला माहीत होतं. आज जिमचा काहीतरी नवीन प्रकार असणार हे जाणून हसतच ती जिमबरोबर बाहेर आली.

पहाते तो मांजरीची इवली-इवली गोंडस पिल्लं! अजून त्यांचे डोळेपण उघडले नव्हते. बारीक आवाजात ती 'म्यॉंव-म्यॉंव' असं ओरडत होती. त्यांच्या बाजूलाच बसून लॅसी त्यांची राखण करत होती. मम्मीनं त्यातल्या एका पिल्लाला उचलून घेतलं आणि त्याचे खूप लाड केले. जिम हे सारं कौतुकानं पाहात होता. तो मम्मीला म्हणाला, "मम्मी, ह्या पिल्लांना आपण ठेवायचं."

पण मम्मी म्हणाली, "जिम, त्यांना त्यांच्या आईजवळच राहू देत. तुलापण तुझी मम्मी हवी असते ना? मग ह्या पिल्लांनापण त्यांची मम्मी हवी. हे सर्व निसर्गाचे नियम आहेत. त्या नियमांप्रमाणेच त्या सर्वांना तसं राहू दे."

इतक्यात नाश्ता करून आजोबा बाहेर आले. त्यांनी पिल्लांना पाहिलं. आता जिम ह्या सर्वांना आपल्याजवळ ठेवणार या कल्पनेनं त्यांना कसंसंच झालं. ते म्हणाले, "ॲलन, एक पिशवी घेऊन ये, मी त्यांना दूर सोडून येतो." जिमनं हे ऐकलं मात्र त्याला आजोबांचा खूप राग आला. एकतर त्या पिल्लांची आई जवळ नव्हती आणि त्यांना एकटं सोडल्यावर त्यांना दूध कोण पाजणार? पिल्लं सोडायची नाहीत म्हणून त्यानं आजोबांजवळ हट्ट धरला. पण आजोबादेखील आपलाच हेका धरून बसले होते, की पिल्लं पिशवीत भरतो आणि सोडून येतो. पण जिमनं एक तडजोड शोधून काढली. आजोबांनी सकाळपर्यंत थांबायचं. तोपर्यंत जिम पिल्लांच्या आईचा शोध घेणार होता.

पिल्लांची आई जवळ नाही म्हणून त्यांना दूधही नाही, याचं मम्मीलादेखील खूप वाईट वाटलं. ती किचनमध्ये आली. तिनं काडीला कापूस लावला, एका छोट्या वाटीत दूध घेतलं. त्या इवल्याशा पिल्लांना तिनं कापसाच्या बोथीनं दूध पाजायला सुरुवात केली. पण छे! पिल्लं एवढी लहान होती की त्यांना दूधपण पिता येईना.

अखेरीस जिमनं आपली सायकल काढली. लॅसीला घेऊन तो पिल्लांच्या आईच्या शोधात निघाला. जाताना आजोबांना तो म्हणाला, "आजोबा, मी येईपर्यंत पिल्लांना दूर सोडू नका, बरं का." आजोबांनी 'पिल्लांना सोडणार नाही' असं वचन दिलं. जिम मोठ्या आनंदानं आजोबांना 'थँक्यू' म्हणाला आणि निघाला.

जिम सरळ मिसेस लॉरेनच्या घरी आला. तिच्याकडे बरीच मांजरं होती, त्यापैकी एकानं तरी या पिल्लांना जन्म दिला असेल अशी त्यांची कल्पना होती. त्यानं लॉरेनऑंटीचं दार ठोठावलं. ती बाहेर आली तशी तिच्याबरोबर अनेक मांजरंसुद्धा बाहेर आली. जिमनं तिला 'गुड मॉर्निंग' केलं. तिनं जिमला घरात येऊन खाऊ खाण्याचा आग्रह केला. पण जिम म्हणाला, "ऑंटी, खरंच आज मला वेळ नाही. आज मी फार घाईत आहे."

आँटी म्हणाली, ''अरे, पण तू का आलास ते तरी सांगशील की नाही ?''

जिम म्हणाला, ''आँटी, आमच्याकडे मांजरीनं पिल्लं घातली आहेत. पण त्यांची आई तिथे नाही. कदाचित तुमच्या घरच्या मांजरीनं ती पिल्लं घातली असतील. म्हणून मी विचारायला आलो.''

पण आँटी म्हणाली, ''माझ्या मांजरी सध्या पिल्लं घालणार नव्हत्या.'' जिम निराश होऊन, आँटीचा निरोप घेऊन तिथून निघाला.

त्याच्या मनात विचार आला, 'मी नाही हे पाहून आजोबा पिल्लांना सोडून तर येणार नाहीत ? काय सांगावं. मनोमनी तो घाबरला आणि तसाच तडक घरी आला. आणि त्याच पावली तो पिल्लांजवळ गेला. पहातो तर पिल्लांची जागा रिकामी होती. पिल्लं नाहीत हे पाहिल्यावर त्याचं मन दु:खी झालं. त्याला त्याच्या आजोबांचा खूप राग आला. 'मी गेल्यावर आजोबांनी पिल्लं नक्कीच दूर नेऊन सोडली' तो मनात म्हणाला.

त्याच तिरीमिरीत तो आजोबांजवळ येऊन रागानं त्यांना म्हणाला, ''आजोबा, अखेर तुम्ही आपल्याच मनासारखं केलंत ना ? मी येईपर्यंत तरी थांबायचं होतं.'' आजोबा हे ऐकून आश्चर्यचकित झाले. ते जिमला म्हणाले, ''अरे, म्हणतोस काय ? पिल्लं जागेवर नाहीत ? जिमबाळ, मी त्या पिल्लांना खरंच सोडून आलो नाही. ती तिथून कशी नाहीशी झाली हे मलापण एक कोडंच आहे.'' आता जिमची खात्री पटली की आजोबांनी पिल्लांना हातही लावलेला नाही. 'मग ती गेली तरी कुठे ? कुणी उचलून तर नाही ना नेली ?'

शेवटी लॅसीच्या रूपानं त्याला एक आधार सापडला. तो लॅसीला म्हणाला, ''लॅसी, जा, त्या पिल्लांना शोधून काढ.'' आज्ञा मिळण्याचाच अवकाश, लॅसी त्या पिल्लांना शोधायला निघाली. इथे बघ, तिथे बघ, सर्व जागा तिनं शोधल्या. पण पिल्लं काही तिला दिसली नाहीत. पण तिनंही शोध थांबवला नाही. शेवटी शोधताशोधता एका अडगळीच्या बाजूला तिला पिल्लांचा आवाज ऐकू आला. तिनं लागलीच भुंकत जाऊन जिमला बोलावून आणलं. जिमच्या पाठोपाठ आजोबा व मम्मीपण तिथे आली. पहातात तर काय ? घाऱ्या डोळ्यांची, काळ्या रंगाची एक गुबगुबीत मांजरी त्या पिल्लांना जवळ घेऊन दूध पाजत होती. म्हणजे ती आपल्या पिल्लांसाठी सुरक्षित जागा शोधत होती तर !

जिमच्या आईनं डॉक्टरांना फोन केला. त्यांनी येऊन मांजरीला एक इंजेक्शन दिलं व साफ केलं. आता पिल्लांना व त्यांच्या आईला कसलाच धोका नव्हता. सर्वांनी डॉक्टरांचे आभार मानले. मांजरी मात्र आपल्या पिल्लांना दूध पाजण्यात मग्न होती. जेम, लॅसी, मम्मी, व आजोबा हे गोड दृश्य एकटक पाहात होते. □



# हरवलेला मुलगा

रात्र झाली तशी जिम मम्मीला व आजोबांना 'गुड नाईट' करून आपल्या खोलीत झोपायला गेला. अर्थात लॅसीही त्याच्यामागून झोपायला त्याच्या खोलीत आली. थोड्याच वेळात जिम गाढ झोपी गेला. लॅसीही झोपली होती. पण तेवढ्यात लॅसीला कसलातरी आवाज ऐकू आला. तिनं खिडकीतून बाहेर उडी मारली. बाहेर येऊन पहाते तर तिला भिंतीकडे अडचणीत कुणी तरी दिसलं. ती जिमकडे पुन्हा आली आणि बारीक आवाज काढून त्याला उठवू लागली. जिम अर्धवट झोपेतच म्हणाला, "लॅसी, काय झालं?" ती आपली त्याचा शर्ट धरून त्याला ओढत होती; जणू सांगत होती, 'तू बाहेर चल, मी तुला दाखवते!' तेव्हा जिमला उठणं भागच पडलं.

त्यानं लॅसीबरोबर बाहेर येऊन पाहिलं तर त्याला भिंतीकडे एक सावली दिसली. नक्कीच इथे चोर असणार! जिमला खूप भीती वाटली. त्यानं आत जाऊन आजोबा व मम्मीला सांगितलं की बाहेर चोर आला आहे, आणि मी त्याची सावली पाहिली. मम्मीनं हातात भल्यामोठ्या काठीचा झाडू घेतला तर आजोबांनी टोकदार एक हत्यार घेतलं आणि चोराला पकडण्यासाठी ते बाहेर आले.

पण भिंतीलगत कोणाची सावली आहे हे बघायला ते आले तर काय तिथे एक छोटासा मुलगा भेदरून उभा होता. त्याचं वय फारतर पाच-सहा वर्षांचं होतं,

तो सर्वांकडे घाबरून एकटक बघत होता. मम्मीनं हसून त्याला 'हॅलो' म्हटलं, तरी तो आपला मख्खच उभा होता. आजोबांनी त्याला विचारलं, ''बाळा, तुझं नाव काय? तुला भूक लागली आहे का?'' पण त्यानं एकाही प्रश्नाचं उत्तर दिलं नाही. मग जिमनं त्याच्याशी दोस्ती करायला सुरुवात केली. तो त्याला म्हणाला, ''तुला आमची लॅसी आवडली? लॅसी, त्याला शेकहँड दे.'' ते शेकहँड मात्र त्या मुलानं स्वीकारलं. मग जिम म्हणाला, ''चल, घरात चल'', आणि तो लॅसीला म्हणाला, ''लॅसी, त्याचा हात धरून त्याला घरात घेऊन चल.'' लॅसीनं त्याचा हात धरून त्याला स्वयंपाकघरात आणलं.

इथे मम्मीनं त्या लहान मुलासाठी खाऊ तयार केला. ''बाळा, तुला भूक लागली असेल ना?'' म्हणून तिनं त्याला खुर्चीवर बसवलं. खुर्चीवर बसताच त्यानं डोक्यावरची टोपी काढली आणि खाऊ खायला सुरुवात केली. पण अजून बोलायचं काही तो नाव घेईना. लॅसीसुद्धा तो खाऊ खाताना त्याच्याजवळ उभी होती. त्यानं खाताना लाजू नये म्हणून सगळेजण थोडावेळ बाजूला जाऊन उभे राहिले. त्या मुलानं आपल्यातला खाऊ लॅसीला भरवला तसं सगळ्यांना त्याचं मोठं कौतुक वाटलं. पोट भरलं तसा तो खाता-खाताच खुर्चीवर झोपून गेला. मग आजोबांनी त्याला अलगद उचललं आणि बिछान्यावर नेऊन झोपवलं. मम्मीनं त्याला पांघरूण घातलं. त्याच्या निरागस चेहऱ्याकडे पाहून ती म्हणाली, ''किती गोड आहे नाही?'' मग सर्वजण आपापल्या खोलीत झोपायला गेली.

झोप थोडीशी पुरी होते न होते तोच त्या लहान मुलाला जाग आली. त्याबरोबर त्यानं टोपी घातली. बूट हातात घेतले, आणि तो दरवाजा उघडून बाहेर जाणार, एवढ्यात लॅसीनं त्याला पाहिलं. ती तर त्याच्या मागेच होती. तिनं मागून जाऊन त्याचा शर्ट ओढायला सुरुवात केली. बारीक आवाज काढून 'जाऊ नका' असं ती त्याला सांगू लागली. तिच्या आग्रहाचा मोह त्या मुलाला आवरला नाही. तो मागे फिरला आणि निमुटपणे आपल्या खोलीत येऊन झोपला.

सकाळ केव्हा झाली ते समजलंच नाही. जिमला जाग येताच त्याला प्रथम आठवण झाली ती त्यांच्या घरी आलेल्या नवीन पाहुण्याची. तो लगेच त्याच्या खोलीत गेला, तेव्हा तो मुलगा बिछान्यावर उठून बसला होता. जिमनं त्याला 'गुड मॉर्निंग' केलं. पण त्याला कसलाही प्रतिसाद मिळाला नाही. नंतर जिमनं त्याला तोंड धुवायला नेलं व आपल्याबरोबर नाश्त्याला बसवलं. जिमबरोबर बसून त्यानं नाश्ता केला. जिम त्याच्याबरोबर खूप बडबड करत होता. त्याच्या तोंडून मात्र एक शब्दही बाहेर पडत नव्हता. पण जिमच्या प्रश्नांना उत्तरं म्हणून तो किंचितशी मान तेवढी हलवत होता. हळुहळू त्याचा संकोच दूर होत होता. जिमच्या सहवासात, लॅसीबरोबर तो रमत होता. त्याची कळी आता हळुहळू खुलत होती.

''चल, आपण बाहेर बॉल खेळायला जाऊ'', जिम त्याला

म्हणाला. जिमबरोबर चेंडूची झेलाझेल खेळताना त्याला खूप मजा वाटली. पण खेळता-खेळता तो अचानक थांबला. दरवाज्याच्या जवळच जिमची मम्मी पोलीसस्टेशनला फोन करून या मुलाची माहिती देत होती, व त्याच्या आईवडिलांचा लवकरात लवकर शोध लावा म्हणून सांगत होती.

हे शब्द त्याच्या कानी पडले मात्र, तो खूपच अस्वस्थ झाला. आपल्याला इथून जावं लागणार ही कल्पना त्याला असह्य वाटू लागली. त्याच्या मनात विचार आला की थोड्याच वेळात पोलीस येतील आणि आपल्याला घरी पोचवतील. तेव्हा जिम पलीकडे उभा आहे हे पाहून त्यानं पळून जायला सुरुवात केली. पण याही वेळेस लॅसी त्याच्या मागे गेली. तो पुढे धावत होता आणि लॅसी त्याच्या मागून पळत होती.

धावता धावता तो दाट झाडीजवळ गेला. तिथे जाऊन तो लपणार इतक्यात एक अस्वल त्याला त्याच्याजवळ येताना दिसलं. तसा तो विलक्षण घाबरला, रडवेला झाला. काय करावं तेच त्याला कळेना. कावराबावरा होऊन तो इकडेतिकडे पाहात होता, इतक्यात लॅसी तिथे आलीच. त्यानं धावत जाऊन तिला मिठी मारली. अस्वल अजून थोडं लांब होतं. तेवढ्यात जोरानं पळत जाऊन लॅसी आजोबांना, जिमला, व मम्मीला घेऊन आली. आजोबांनी पटकन् आपल्याबरोबर बंदूक घेतली होती. त्यांच्या मनात आलं की लॅसी काहीतरी संकट असल्याशिवाय अशी जोरानं पळत येणार नाही.

तो मुलगा जिथे उभा होता तिथे लॅसीनं सर्वांना आणलं. सर्वांनी पाहिलं ते दृश्य फार भयानक होतं. ते अस्वल झाडीतून मुलाच्याच जवळ येत होतं. आणखी थोडा वेळ जाता तर ?... त्या प्रसंगाची कल्पनाही करणं असह्य होतं.

आजोबांनी आपली बंदूक काढली व त्या अस्वलाच्या दिशेनं नेम धरून गोळी झाडली. गोळी अस्वलाच्या पोटात घुसली व ते तिथल्यातिथे गतप्राण झालं. सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला व त्या मुलाला घेऊन सर्वजण घरी आले.

घरी येऊन पहातात तर पोलीस इन्स्पेक्टरांबरोबर वृद्ध पती-पत्नी आली होती. आजोबांनी त्यांना आत बोलावलं. ते त्यांना म्हणाले, "हा घ्या तुमचा मुलगा."

ते म्हणाले, "हा आमचा मुलगा नाही, हा आमचा नातू आहे."

"बरं, तुमचा नातू तुमच्या स्वाधीन करतो. त्याला नीट सांभाळा. त्याला एकटं बाहेर जाऊन देऊ नका. हा काहीही बोलत नाही. आम्ही खूप प्रयत्न केले. हे असं का बरं?" आजोबांनी विचारलं. यावर ते आजी-आजोबा म्हणाले, "ह्याचं कारण म्हणजे ह्याचे मम्मी-डॅडी हा लहान असताना मोटारअपघातात ठार झाले. हे पोरकं पोर आम्ही सांभाळतो. पण तेव्हापासून हा बोलत नाही. केवळ नशिबानंच हा वाचला. आमची नजर चुकवून त्याच्या मम्मी-डॅडींना शोधायला तो निघाला. तुमच्या इथे आला, म्हणूनच केवळ तो सुरक्षित राहिला"

आणि त्यांनी आपल्या नातवाला प्रेमानं जवळ घेतलं. सर्वांना टाटा करून ती दोघं नातवाला घेऊन गाडीत बसली, आणि आजोबा, मम्मी, लॅसी व जिम निश्चिंत झाले. सर्वांचे चेहरे हसरे झाले. ज्याची ठेव त्याच्या स्वाधीन केली म्हणून आजोबा व मम्मीला समाधान वाटलं. जिमला व लॅसीला सोडून जाताना त्या मुलाचा चेहरा केविलवाणा झाला. मोठ्या जड मनानं त्यानं त्यांना टाटा केलं. मोठ्या नाखुशीनंच तो गाडीत बसला होता. जिमसुद्धा उदास झाला. त्याला उदास पाहून लॅसीनं त्याचे लाड केले आणि त्याला घरात घेऊन गेली. □





# जेनी

आज जेनी जिमच्या घरी आली होती. जेनीच्या मम्मी-डॅडींना बाहेर जायचं असल्यानं जेनीला सांभाळण्याची जबाबदारी जिमनं घेतली होती. जेनी एक फार गोड मुलगी होती, वय असेल जेमतेम पाच किंवा सहा वर्षांचं. जिमची व तिची ओळख असल्यामुळे जिमच्या घरी राहायला आणि त्याच्याबरोबर खेळायला तिला फार आवडे. लॅसीवर तर तिचा भारी जीव होता.

जिमची मम्मीपण काही कामासाठी थोडा वेळ बाहेर जाणार होती. तिचं काही सामान जिमनं तिच्या मोटारीत नेऊन ठेवलं आणि जिम व जेनीचा निरोप घेऊन मम्मी निघाली. जाताना ती जिमला 'मी लवकरच येते. तू जेनीला नीट सांभाळ' असं बजावून गेली. जिम मम्मीला म्हणाला, "मम्मी, तू मुळीच काळजी करू नकोस."

जिम जेनीला म्हणाला, "जेनी, चल आपण अंडी गोळा करुया. लॅसी परडी घेऊन ये." लॅसीनं आत जाऊन जिमला परडी आणून दिली. जिम जेनीला म्हणाला, "पाहिलंस जेनी, लॅसी किती शहाणी आहे ते. ती माझं सगळं ऐकते. तूपण ऐक बरं का." यावर जेनी गोड हसली व म्हणाली, "मलापण लॅसी खूप आवडते. लॅसी, मला पापी दे." लॅसीनं जेनीला पापी दिली व चाटूनही काढलं. मग जिम जेनीला घेऊन अंडी शोधायला निघाला, जिथे जिथे खुराड्यात अंडी मिळाली ती जिमनं गोळा केली. मग जेनीला वाटलं की आपणही

अंडी शोधावीत. म्हणून तिनं गवत उसकायला सुरुवात केली आणि ती आनंदानं ओरडली, 'जिम, मलाही अंडं मिळालं!' परंतु दुसऱ्याच क्षणी ते तिच्या हातून खाली पडलं आणि फुटलंसुद्धा. तिला खूप वाईट वाटलं. जिम म्हणाला, "जाऊ दे जेनी. आता पुन्हा हात लावू नको हं."

एवढ्यात फोर्टी आला. जिमनं त्याला हाक मारली. फोर्टी म्हणाला, "जिम, तुला माती उचलण्याचं यंत्र दाखवायला नेण्यासाठी मी आलो आहे. चल येतोस ना?"

"नाही रे फोर्टी, मी नाही येऊ शकत तुझ्याबरोबर. आज जेनीला सांभाळण्याची जबाबदारी माझ्यावर आहे" त्यानं जेनीबरोबर चेंडूचे खेळ खेळायला सुरुवात केली. थोडा वेळ खेळून झाल्यावर तिला त्या खेळाचा कंटाळा आला. मग फोर्टीला तिनं घोडा व्हायला सांगितलं. फोर्टीनं तिला आपल्या पाठीवर बसवलं आणि खूप फिरवलं. पण तोही दमला. शेवटी त्यानं तिला जबरदस्तीनं खाली उतरवलं. जेनीला खूप रडू आलं. जेनीला रडताना पाहून लॅसीही रडायला लागली, तिला चाटू लागली. जेनीला जवळ घेऊन जिम फोर्टीला म्हणाला, "फोर्टी, जरा सांभाळून घेत जा. तू काळजी घेत नाहीस जेनीची. अरे, लहान आहे ती."

आता मात्र फोर्टीला खूप कंटाळा आला. तो जिमला यंत्र पाहायला चलण्याचा आग्रह करू लागला. शेवटी जिमलासुद्धा मोह आवरला नाही. तो जेनीला समजावू लागला; तिला म्हणाला, "जेनी, तू लॅसीबरोबर राहाशील नं? मी लवकरच जाऊन येतो." पण छे! जेनी कसली ऐकते? तिचा एकच सूर कायम होता, 'मी तुझ्याबरोबर येणार.' आता जिम पुरता वैतागला. तो तिला म्हणाला, "हे बघ, मी जाणारच, आणि तुला लॅसीबरोबर राहिलं पाहिजे." त्याच्या ह्या निर्वाणीच्या बोलण्यानं शेवटी एकदाची कशीबशी जेनी तयार झाली. आणि तिला 'थँक यू' म्हणून दोघं मित्र निघाले.

ते थोडेसे पुढे गेले असतील-नसतील, एवढ्यात त्यांना जेनीच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. मग मात्र जिमचं मन विरघळलं. तो तसाच मागे फिरला आणि त्यानं जेनीला जवळ घेतलं. त्यानं तिचे डोळे पुसले आणि तो तिला म्हणाला, "जेनी, तू रडू नकोस हं, तुला सोडून मी मुळीच जाणार नाही." लॅसीनंसुद्धा तिचे लाड केले आणि जेनीच्या चेहऱ्यावर हसू उमटलं.

एवढ्यात जेनीच्या रडण्याचा आवाज ऐकू आलेले आजोबा बाहेर आले. त्यांना पाहून जिमला फोर्टी म्हणाला, "जिम, जेनीला थोडा वेळ आजोबांकडे का ठेवत नाही?" फोर्टीचा हा विचार जिमला एकदम पसंत पडला. त्यानं आजोबांची विनवणी केली. तो त्यांना म्हणाला, "आजोबा, मी पटकन् फोर्टीबरोबर जाऊन एक यंत्र पाहून येतो. तोपर्यंत तुम्ही जेनीला सांभाळाल का?" आजोबांनी त्यांना जाण्याची परवानगी दिली. पण जेनी काही आजोबांजवळ राहायला तयार होईना. तिचा पहिला सूर पुन्हा चालू झाला, 'मी जिमबरोबर जाणार!'

आजोबा जेनीला म्हणाले, ''जेनी, चल मी तुला बिस्किटं आणि गोळ्या देतो.'' जिम, फोर्टी, जेनी, लॅसी, सर्वजण स्वयंपाकघरात आले. आजोबा बिस्किटं आणि गोळ्या काढू लागले. जेनी तिथेच उभी होती, आणि तिचं सारं लक्ष आजोबांकडे होतं. ही संधी साधून जिम व फोर्टीनं हळूच काढता पाय घेतला. आजोबांनी तिला खाऊ दिला. तो घेऊन तिनं मागे वळून पाहिलं. तर तिला जिम व फोर्टी दिसले नाहीत. ती त्यांना हाका मारू लागली. बाहेर येऊन ती त्यांना शोधू लागली. पण तिला जिम व फोर्टी कुठेच दिसले नाहीत. त्यांना हाका मारून ते दिसले नाहीत की जेनी आपसुक परत येईल या भरवशावर आजोबा आतच राहिले. आणि त्यांची नजर चुकवून जेनी जिमला शोधत त्यांच्या पाठीमागून गेली.

इथे जिम व फोर्टी माती उपसण्याचं यंत्र पाहाण्यात गुंग झाले होते. यंत्रचालक यंत्र चालवून प्रचंड माती उपसत होता, व यंत्रानं ती उचलत होता. हे सारं पाहाताना त्यांना खूपच गंमत वाटत होती. यंत्र चालविणाऱ्यानं ह्या मुलांना पाहून प्रथम जिमला आपल्याजवळ बोलावलं आणि त्याला आपल्या शेजारी बसवून यंत्र कसं माती उपसतं ते दाखवलं. नंतर त्यानं फोर्टीलाही बोलावलं. हे सारं पाहाताना दोघंही जेनीला पूर्णपणे विसरून गेले.

जेनी जिम व फोर्टीच्या मागून निघाली ती तडक जिम व फोर्टी जिथे होते तिथे आली. पण जेनी आली तिथे मातीचा प्रचंड मोठा ढीग होता. त्या ढिगावरून जिम व फोर्टीकडे येण्याच्या प्रयत्नात जेनी होती. पण यंत्र चालवणारा मातीच्या ढिगावर ढीग उपसून टाकत होता. कुणाचंच लक्ष जेनीकडे गेलं नाही. असंच चालू राहिलं असतं तर जेनी मातीच्या ढिगाखाली गाडली गेली असती. पण अचानक लॅसीनं जेनीला पाहिलं. बाहुली हातात धरून जेनी जिमला हाका मारत होती. लॅसी तिथून पळाली ती थेट जेनीजवळ आली आणि तिचा पाय तोंडात धरून तिनं तिला ढिगाऱ्यापासून दूर ओढत नेलं, आणि ती जिम व फोर्टीला बोलावून आणायला गेली.

जिमची मम्मी आपलं काम संपवून घरी आली. घरी पाहते तर जिम व जेनी, दोघंही नाहीत. तिनं वडिलांना विचारलं, ''डॅडी, जेनी व जिम कुठे दिसत नाहीत ते?'' आजोबा म्हणाले, ''जेनी तर घरातच होती. जिम व फोर्टी यंत्र पाहायला गेले आहेत.'' आजोबांना वाटलं की जेनी घरात बाहुलीशी खेळत असेल. त्यांनी व मम्मीनं सारं घर शोधलं. पण जेनी काही सापडली नाही. तसे आजोबा व मम्मी खूप घाबरले. दोघंही शेताकडे धावत गेले. येऊन पाहातात तर जेनी तिथे उभी. मम्मीनं प्रथम जेनीला पोटाशी धरलं, तिचे पापे घेतले, व ती तिला म्हणाली, ''जेनी, तू बरी आहेस ना बाळ?'' ती रडत म्हणाली, ''मला लॅसीनं ओढून वर आणलं. पण माझी बाहुली मातीच्या ढिगात गेली.''

''बरं, तुला आपण दुसरी बाहुली घेऊ. तू रडू नको हं,'' मम्मीनं जेनीला समजावलं.

जिम व फोर्टी अपराधी चेहऱ्यानं तिथे उभे होते. जिमला काही मम्मीकडे पाहाण्याचं धैर्य झालं नाही. मम्मी मात्र जिमला खूपच रागावली. ती म्हणाली, ''जिम, मला तुझं खूप आश्चर्य वाटतं. तू तुझी जबाबदारी टाकून गेलास हे मुळीच बरोबर केलं नाहीस.'' जिम ह्यावर काय बोलणार? त्याची चूक झाली होती. तो मम्मीला म्हणाला, ''मम्मी, मला क्षमा कर, मी चुकलो.'' बरं बरं म्हणून मम्मीनं जिमला क्षमा केली आणि सर्वजण घरी आले.

घरी येतात नाही तर जेनीचे मम्मी-डॅडी जेनीला न्यायला आले. मोठ्या नाराजीनं जेनी सर्वांना 'बाय' करून गेली. जाताना तिनं जिमला विचारलं, ''जिम, मी पुन्हा येऊ ना तुझ्याकडे?'' जिम तिची पापी घेऊन म्हणाला, ''जरुर ये बरं, जेनी.'' आणि लॅसीसुद्धा जेनीचा पापा घ्यायला विसरली नाही. □





# लॅसी व हरीण

आज रविवार होता. म्हणजे जिमच्या शाळेला सुट्टी. सकाळची न्याहारी झाली तशी आजोबा व जिम, लॅसीला बरोबर घेऊन मासे पकडायला नदीकिनारी निघाले. मासे पकडण्याचं सगळं साहित्य त्यांनी बरोबर घेतलं, आणि तिघंही घराबाहेर पडले.

नदीकिनारी आल्यावर आजोबांनी गळाला गांडूळ लावलं. सर्व तयारी केली. एवढ्यात बंदुकीचा मोठ्ठा आवाज झाला. म्हणून लॅसी भुंकायला लागली. 'लॅसी का बरं भुंकते?' म्हणून जिमही तिच्यामागून धावला. जिथून आवाज आला बरोबर तिथेच जिमला घेऊन लॅसी आली. तिथे जिमला दिसलं की दोन माणसं मोटारीची डिकी उघडून तिच्यात कुत्रा ठेवत आहेत. म्हणजे हे दोघं शिकारी आहेत तर! जिमला त्यांचा खूप राग आला आणि तो मनात म्हणाला, 'मुक्या प्राण्यांना ठार मारतात काय? यांनाच मारलं पाहिजे.' पण लॅसी मात्र तोंडात असलेली वस्तू टाकून भुंकत पळत सुटली, आणि तिच्या मागोमाग जिम व आजोबाही धावत गेले.

लॅसी धावता धावता एका झाडाखाली उभी राहिली. तितक्यात जिम व आजोबा तिच्याजवळ आले. पहातात तर काय? लॅसी एका सुंदर हरणाच्या जवळ उभी होती. बंदुकीच्या आवाजानं भेदरून, ते एका झाडाआड उभं राहिलं होतं. जिमनं त्याला जवळ घेऊन त्याचे लाड केले, तसं ते अधिकच बिलगलं. जिम आजोबांना म्हणाला, "आजोबा,

आपण हे हरीण घरी नेऊ या का? मला फार आवडलं आहे ते. शिवाय ते शिकारी येऊन त्याला मारतील नं.'' आजोबा म्हणाले, ''नको रे बाबा. जिम, त्याला घरी न्यायचा विचार अगदी सोडून दे. अरे, लॅसीला ते घाबरेल. शिवाय इथे ते मुक्त हिंडेल. उगाच अडकावून त्याला बंधनात का ठेवतोस?'' पण जिमनं ते हरीण घरी आणलंच. आल्या-आल्या मम्मीला हाक मारून त्यानं तिला हरीण पाहायला सांगितलं. मम्मीला सुद्धा ते छोटं हरीण फारच आवडलं आणि ती म्हणाली, ''किती गोड आहे हे.'' ती लगेच घरात गेली व दुधाची बाटली आणून तिनं त्याला दूध पाजण्याचा प्रयत्न केला. आजोबांनी डॉक्टरांना फोन केला व ते त्यांना म्हणाले, ''डॉक्टर, आज जिमनं एक हरीण आणलं आहे. मला वाटतं, ते दहा आठवड्यांचं असावं. तुम्ही येऊन जरा पाहून जा.''

थोड्या वेळानं गाडीचा आवाज आला. डॉक्टरच आले होते. त्यांनी हरणाला तपासलं व म्हणाले, ''याची प्रकृती फार छान आहे. पण मिस्टर जॉर्ज, तुम्हाला ह्याला लॅसीपासून खूप जपायला हवं. दोघांमध्ये शत्रुत्व होण्याचा संभव आहे. कारण प्रेम विभागलं जाईल.'' पण जिम म्हणाला, ''डॉक्टर, माझी लॅसी ह्याला अपवाद आहे. तीपण आमच्या बरोबरीनंच ह्या हरणाची काळजी घेईल.''

''बरं बरं! प्रयत्न करून पाहा,'' म्हणून सर्वांचा निरोप घेऊन डॉक्टर निघून गेले.

त्या सारा दिवस जिमनं हरणाच्या संगतीतच घालवला. दिवस कधी मावळला ते त्याला कळलंच नाही. रात्र झाली तशी मम्मी म्हणाली, ''जिम, आता झोपायला जा बरं.'' जिमनं 'गुड नाईट' केलं आणि तो लॅसीला बरोबर घेऊन आपल्या खोलीत झोपायला गेला. थोड्याच वेळात जिम गाढ झोपी गेला. जिम झोपलेला पाहून लॅसी बाहेर गेली आणि भुंकून तिनं हरणाला आत बोलावलं. आणि लॅसीच्या सांगण्यावरून हरीण खरंच आत आलं! आजोबांनी मात्र लॅसीचा आवाज ऐकला होता.

सकाळी जिम उठला तो हरणाला पाहायलाच बाहेर गेला. पण हरीण त्याच्या जागेवर नव्हतंच. जिम रडत घरात आला. आजोबा म्हणाले, ''अरे जिम, झालं तरी काय?''

''आजोबा, माझं हरीण जागेवर नाही, पळून गेलं.'' आता आजोबांना आठवलं आणि ते जिमला म्हणाले, ''जिम, रात्री लॅसीच्या भुंकण्याचा आवाज मला ऐकू आला होता. कदाचित तिनं तर काही केलं नसेल नं?''

जिम आता लॅसीवर खूप रागावला. त्यानं तिला विचारलं, ''लॅसी, तू हरणाला चावलीस का?'' लॅसी करुण आवाज काढून रडायला लागली. जिम समजून चुकला की लॅसीनं तसं काहीही केलेलं नाही. मग हरीण गेलं तरी कुठे? जिम व मम्मी लॅसीला घरात

ठेवून हरणाला शोधायला निघाली. पण लॅसी थोडीच एकटी राहाणार? तिनं खिडकीची काच फोडली आणि त्यातून उडी मारून ती मम्मी व जिमच्या मागून पळत सुटली. आता लॅसीसह सर्वजण हरणाला शोधायला निघाले.

शोधता शोधता त्यांना नदीच्या काठी हरीण दिसलं. जिम खूपच आनंदला. पण पुढे जाऊन पहातात तर त्या हरणाच्या समोर एक भला मोठा लांडगा दबा धरून उभा होता. कुठल्याही क्षणी झडप घालून त्यानं त्या हरणाला ठार केलं असतं. पण लॅसी तशीच पुढे गेली. तिनं त्या लांडग्याशी झटापट करायला सुरुवात केली. आता काय करावं? जिम मम्मीकडे पाहात होता, त्याचा जीव अगदी घाबरा-घुबरा झाला होता. लॅसीला काही झालं तर? तिनं त्या हरणासाठी आपला जीव धोक्यात घातला होता.

इतक्यात मम्मी धावत घरी आली. तिनं बंदूक घेतली आणि धावतच ती नदीकडे परत आली. तिनं पाहिलं तर लॅसीची अजूनही लांडग्याबरोबर झटापट चालूच होती. आणि लॅसीला लांडग्यानं ओरबाडलं होतं. तिनं क्षणाचाही विलंब न करता बंदुकीचा नेम धरून चाप ओढला आणि लांडगा तिथेच गतप्राण होऊन पडला. लॅसी खूप दमली होती. तरी हरणाजवळ येऊन ती त्याला चाटू लागली. आता जिमला व आजोबांना 'लॅसीचा निष्कारण संशय' घेतल्याबद्दल पश्चात्ताप झाला. जिम लॅसीजवळ गेला व म्हणाला, ''लॅसी, मला क्षमा कर. मी चुकलो, मी तुझा संशय घेतला.'' त्यानं तिचे खूप लाड केले. लॅसीनं देखील जिमला चाटून त्याचे लाड केले. जिमनं आजोबांकडे पाहिलं, तर आजोबा त्याच्याकडे पाहून डोळे मिचकावत मिष्किलपणे हसले आणि म्हणाले, ''चला आता घरी जाऊ. आणि जिम, हरणाला पण बरोबर घे बरं का!'' जिम दिलखुलास हसला. □


२८८६ ९६/८/९३
बा.वा.



# मम्मी नोकरी करते

आज रविवार होता. म्हणजे चर्चला जाण्याचा दिवस. आजोबा, मम्मी, आणि जिम चांगले झकपक कपडे करून चर्चमध्ये गेले. चर्चमध्ये आज जिमची मम्मी पियानोवर बसली. तिनं गाणं म्हणायला सुरुवात केली. गाण्याच्या ओळी होत्या, 'एकमेकांवर प्रेम करा, मी पण तुमच्यावर करीन'. मम्मीचा आवाज गोड होता. गाणं ऐकताना सारेजण मंत्रमुग्ध झाले. साऱ्यांचे कान तृप्त झाले. चर्चमधून घरी आले तेव्हा सगळे आनंदात होते.

घरी आल्यावर मम्मीनं जेवणाची तयारी केली. इतक्यात दारावरची घंटी वाजली. मम्मीनं जिमला विचारलं, "जिम, कोण रे? सेल्समन का?"

"नाही मम्मी. तुला कोणी तरी भेटायला आले आहेत" जिम म्हणाला.

मम्मी बाहेर आली. आलेल्या गृहस्थांना बसायला सांगून तिनं 'माझ्याकडे आपलं काय काम आहे?' असं विचारलं. ते म्हणाले, "आज तुम्ही पियानोवर गाणं म्हटलंत ते आम्ही ऐकलं. मला तुमचा आवाज फारच चांगला वाटला. तेव्हा तुम्हाला रेडियोवर गाणं म्हणण्यासाठी संधी द्यावी, म्हणून मी येथे आलो आहे. त्याबद्दल तुम्हाला आठवड्याला १०० डॉलर मिळतील."

यावर मम्मी म्हणाली, "माझे पती बाहेरगावी असतात, त्यामुळे

मला शेतावर जावं लागतं. मग कळवीन मी तुम्हाला.''

'बरं' म्हणून ते गृहस्थ निघून गेले. ते गेल्यावर मम्मीनं विचार केला, 'खरंच, चांगली संधी चालून आली आहे. चार पैसे अजून मिळाले तर घरखर्चही चांगला चालेल. कपडालत्ता घेता येईल. आजोबा पाहातील थोडे दिवस शेतीचं काम.' तिनं होकार द्यायचं मनाशी ठरवलं.

पण गाव सोडून मुख्य शहरात राहाण्याचा विचार जिमला मुळीच आवडला नाही. तो मम्मीवर रुसून बसला. आज तिघांनी जणू मम्मीबरोबर असहकार पुकारला. तिनं लॅसीला खाऊ दिला, पण तिनं त्याला तोंडसुद्धा लावलं नाही. आजोबा व जिम, दोघांनीही जेवणाला स्पर्श केला नाही. पण मम्मीचा मात्र शहरात जाऊन रेडियोवर नोकरी करण्याचा निर्धार कायम होता. तिनं जिमला आपल्याबरोबर घेऊन लॅसीला आजोबांकडे ठेवली, आणि शहराची वाट धरली.

जिम गेल्यावर लॅसी अगदी एकटी झाली. ती खाऊला तोंडच लावेना. एकसारखी ती जिमच्या खोलीत येऊन पलंगावर डोकं ठेवून रडायची. इकडे जिमचंदेखील कशातही लक्ष लागत नव्हतं. शहरात आल्यावर शेजारच्या मुलानं त्याला खेळायला बोलावलंदेखील, पण कुणाबरोबर खेळण्याचीपण त्याला इच्छा झाली नाही. जिमची ही अवस्था मम्मीच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. पण तिचाही नाइलाज होता. 'जिमबाळ, आपण आठवड्याच्या सुट्टीत घरी जाऊ बरं' म्हणून ती त्याला समजावत होती.

इथे लॅसीही जिमशिवाय राहूच शकत नव्हती. ती शहराकडे यायला निघाली. आपली मोटार कुठे तरी दिसेल म्हणून ती खूप हिंडली. शेवटी हिंडता हिंडता तिला आपली मोटार दिसली. ती भुंकत भुंकत मोटारीपाशी आली. जिम घरातच होता. त्यानं आपल्या लाडक्या लॅसीचा आवाज बरोबर ओळखला. तो 'लॅसी, लॅसी' हाका मारतच बाहेर आला. तिनं त्याला हैराण केलं.

आता जिम खुश होता. त्याची लॅसी त्याच्याजवळ होती. तो रोज तिच्याबरोबर खेळू लागला. पण लॅसीच्या भुंकण्याचा त्रास त्यांच्या शेजारच्या बाईला होऊ लागला. ती रोज तक्रारी करू लागली. 'तुमची कुत्री चावली तर? तिनं घाण केली तर?' नाना खुसपटं काढून ती हैराण करू लागली. मम्मीनं तिला समजावलं, 'आमची लॅसी त्रास देणार नाही. खरंच ती चांगली आहे!' पण छे! तिची कटकट चालूच होती.


शेवटी मम्मीनं विचार केला, 'इथे राहाण्यात काही तथ्य नाही.' लॅसीवरून रोजची कटकट तिला सहन होईना. सर्वांची ताटातूट करून, व म्हाताऱ्या वडिलांवर जबाबदारी टाकून मिळवलेल्या पैशानं काय सुख मिळणार? तिनं नोकरीचा राजीनामा द्यायचं ठरवलं.

ती जिमला व लॅसीला घेऊन घरी आली. सर्वांना घरी आलेलं पाहून आजोबांना खूप आनंद झाला. मम्मीनं घरात जाऊन पाहिलं तर घरात सारा पसारा होता. जिमनं रागानं फोडलेली प्लेट, एका कोपऱ्यात जिम व मम्मीचा फोटो आणि टेबलावरचा सारा पसारा पाहून तिला हसू आलं. ती काय समजायचं ते बरोबर समजली.

तिनं फोन उचलला, 'हॅलो मन्रो, सॉरी, मी नोकरीवर येऊ शकत नाही. सॉरी'. तिनं फोन ठेवला. तिनं पियानो काढला आणि गाणं म्हणायला सुरुवात केली. जिम व आजोबा यांनीसुद्धा साथ दिली आणि लॅसीदेखील नाचू लागली. □



# लॅसी स्पर्धा जिंकते



आज सकाळापासून फोर्टी आपल्या स्मोकीला घेऊन जिमच्या घरी हजर झाला होता. फोर्टी जिमचा जिवलग दोस्त, त्यामुळे दोघांनाही एकमेकांवाचून चैन कसं ते पडत नसे. आज दोघांना नदीकिनारी मासे धरायला जायचं होतं. तसे ते नेहमीच मासे पकडायला जात. अर्थात् लॅसी या दोघांबरोबर गेली नाही असं कधी झालं नाही. कधी हे दोघं मिळून जात तर कधी आजोबांबरोबरही जात. पण आज मासे पकडायला जाण्यात दोघांचा खास हेतू होता. त्यांच्या गावात आज मुलांसाठी मासे पकडण्याची स्पर्धा ठेवली होती. जो मुलगा सर्वांत जास्त वजनाचा मासा पकडेल त्याला पहिलं बक्षिस मिळणार होतं.

जिम व फोर्टी मासे पकडायचं भांडं, जाळं, गळ, सारं काही बरोबर घेऊन नदीकिनारी आले. लॅसी त्यांच्यामागून निघालीच होती. आता त्यांनी बक्षिस मिळविण्याच्या उत्साहानं मासे पकडायला सुरुवात केली. बराच प्रयत्न करून मासे मिळत तर होते, पण ते अगदीच लहान व किरकोळ होते. स्पर्धा जिंकायला जास्त वजनाचा मोठा मासा हवा होता. आणि तो काही केल्या गळाला लागत नव्हता.

शेवटी फोर्टीला व जिमला खूप कंटाळा आला. डोक्यावर ऊनही तळपत होतं. थोडावेळ दोघांनी गवतातच ताणून दिली, दमल्यामुळे दोघांचाही काही मिनिटं डोळा लागला. पण लॅसी त्या दोघांच्या बाजूला बसून होती. ती काही झोपली नव्हती. आणि

ती पाण्याकडे एकटक पाहात होती.

थोड्या वेळानं लॅसीनं पाहिलं तर तिला पाण्यात टाकलेल्या गळाला काही तरी वरखाली होताना दिसलं. म्हणून तिनं थोडं निरखून पाहिलं, तो एक मोठा मासा होता आणि तो गळाला अडकलेला होता. लॅसीनं जिम व फोर्टीकडे पाहिलं. दोघांना अगदी गाढ झोप लागली होती. तिनं काही त्यांना उठवलं नाही. पण तिला माहीत होतं की तिचा जिम व फोर्टी मोठ्यात मोठा मासा पकडण्यासाठीच आले आहेत. मग असा गळाला लागलेला मोठा मासा ती थोडीच सोडणार होती ? तिनं गळाचं टोक तोंडात धरून गळ ओढायला सुरुवात केली. ओढत ओढत गळ तिनं किनाऱ्यावर आणला. तर भला मोठा मासा लागला होता. पाण्याबाहेर आल्यानं तो फडफड उडत होता. लॅसी जिमजवळ आली आणि त्याची शर्टची बाही धरून, भुंकून तिनं त्याला उठवला. धडपडून जिम व फोर्टी उठले. पण लॅसी का भुंकते आहे याचा त्यांना उमजच पडेना. जिमनं आजुबाजूला पाहिलं आणि त्याला गळाला लागलेला मोठा मासा दिसला. तो फोर्टीला म्हणाला, ''फोर्टी, पाहिलंस का लॅसी किती शहाणी आहे ते ! तिनं मासा पाहून गळ ओढला !'' असे म्हणून त्यानं 'शाब्बास लॅसी' म्हणत लॅसीला थोपटलं. फोर्टीलासुद्धा केवढातरी आनंद झाला होता.

इथे स्पर्धेला बऱ्याच मुलांनी मासे आणले होते. सर्वांनी एकच गर्दी केली होती. 'कोणाला बक्षीस मिळतं' याची मुलांनाच काय, पण मुलांच्या आई-वडिलांना व स्पर्धा पाहायला आलेल्या इतर लोकांनाही उत्सुकता लागून राहिली होती. जिमची मम्मी व आजोबासुद्धा याला अपवाद नव्हते. स्पर्धेला सुरुवात झाली. स्पर्धक मुलांनी आपला मासा पुढे करायचा आणि परीक्षकांनी त्याचं तराजूवर वजन करायचं. बऱ्याच मुलांनी आपापल्या माशाचं वजन करायचं. बऱ्याच मुलांनी आपापल्या माशाचं वजन करायला दिलं पण हेन्रीचा मासा इतर मुलांपेक्षा अधिक वजनाचा निघाला. पण अजून जिम व फोर्टी कसे आले नाहीत ? मम्मी व आजोबा त्या दोघांची वाट पाहात होते. आता तर स्पर्धेचा थोडाच वेळ राहिला होता. 'आणखी कुणी आहे का ?' म्हणून परीक्षकांनी विचारणा केली. एवढ्यात जिमनं 'आजोऽबा' अशी मोठ्यानं हाक मारली. आजोबांना खूप आनंद झाला. जिम पुढे आला आणि त्यानं मासा परीक्षकांच्या हातात दिला. सर्वजण उत्सुकतेनं पाहात होते. मम्मी - आजोबासुद्धा मोठ्या आशेनं पाहात होते. हेन्रीचा मासाही तेवढाच मोठा होता. पण दोघांच्या वजनात किती फ़रक पडतो यावरच सारं अवलंबून होतं. परीक्षकांनी मासा वजनकाट्यावर ठेवला. 'दोन पौंड'... आणि परीक्षकांचे पुढचे शब्द ऐकायला सगळ्यांनी कान टवकारले होते. परीक्षक म्हणाले, 'दोन पौंड व सहा औंस'. म्हणजे हेन्रीपेक्षा चार औंसांनी जिमचा मासा मोठा निघाला. मम्मी आणि आजोबा खूप खुष झाले, हेन्री मात्र नाराज झाला. चार औंसांच्या फरकानं त्याचं बक्षीस गेलं होतं. तो बाजूला एका दगडावर बसून रडू लागला.

इथे जिमला परीक्षकांनी शाबासकी दिली, आणि त्याचा पहिला नंबर आल्याचं जाहीर केलं. परीक्षक जिमला म्हणाले, "तू कसा काय गळ लावलास? आणि एवढा मोठा मासा पकडलास तरी कसा?" पण जिमला काहीच उत्तर देता येईना. तो पक्का समजून होता की मासा पकडण्यात त्याचं काहीच कौशल्य नव्हतं, कारण मासा लॅसीनं पाहिला होता आणि गळही तिनंच ओढला होता. आणि या मधल्या वेळात तो आणि फोर्टी गाढ झोपले होते.

जिम थोडा वेळ गोंधळला. काय सांगावं? आणि कसं सांगावं? शेवटी मम्मी म्हणाली, "जिम, काय खरं असेल ते सांग. तू पकडलास ना मासा?" जिमनं खरं सांगायचा निर्धार केला आणि तो म्हणाला, "सर, बराच वेळ प्रयत्न केला. पण छोट्या माशांखेरीज मोठा मासा काही गळाला लागला नाही. थोडा वेळ वाट पाहावी म्हणून तिथंच जरा लवंडलो आणि मला व फोर्टीला गाढ झोप लागली. हा मासा लॅसीनं पाहिला आणि तिनं गळ ओढला. मासा किनाऱ्यावर आणल्यावर तिनं मला व फोर्टीला उठवलं. तेव्हा पहिला नंबर माझा नसून लॅसीचा आला आहे. तिलाच बक्षीस मिळायला हवं."

लॅसी हे सारं ऐकत होती. तिनं पाहिलं, हेन्री एका बाजूला जाऊन रडत बसला आहे. तिनं, मासे पकडण्याचा जो गळ बक्षीस म्हणून ठेवला होता तो तोंडात धरला आणि धावतच ती हेन्रीकडे गेली. तिनं तो गळ हेन्रीच्या हातात दिला. लॅसीनं हेन्रीला बक्षीस दिलं. सर्वांना लॅसीचं खूप कौतुक वाटलं. हेन्रीच्या डोळ्यांतून आसवं गळत होती, पण आता त्याच्या ओठांवर हसू होतं. जिमला लॅसीचा अभिमान वाटला. त्यानं तिला लाडानं जवळ घेतलं, थोपटलं, व प्रेमानं म्हणाला, "माझी शहाणी लॅसी." ☐



# फोर्टी घर सोडून जातो

रात्रीचे दहा वाजून गेले होते. जिमची झोपायची वेळ झाली. नेहमीप्रमाणे मम्मी आणि आजोबांना 'गुड नाईट' करून जिम आणि लॅसी आपल्या खोलीत गेले. उशीला डोकं लागताच जिम गाढ झोपी गेला.

बाहेर काळोख मी म्हणत होता. आकाशात तारे तेवढे लुकलुकत होते. बाकी सर्वत्र नीरव शांतता होती. अशावेळी लॅसीला बाहेर कुणाच्यातरी पावलांचा आवाज ऐकू आला. त्याबरोबर तिनं जिमला झोपेतून उठवलं. दोघंही खिडकीतून उडी मारून बाहेर आली. बाहेर येऊन पाहातात तर जिम बुचकळयात पडला, कारण बाहेर फोर्टी उभा होता.

फोर्टीच्या हातात कपड्यांचं बोचकं होतं आणि त्याचा चेहरा रागावलेला आणि रुसलेला होता. बरोबर अर्थातच् स्मोकी होती. जिमनं त्याला विचारलं, "अरे फोर्टी, एवढ्या रात्री तू कसा काय आलास ? आणि हे कपड्यांचं बोचकं कशासाठी आणलं ?" प्रथम फोर्टीनं जिमला उत्तरच देण्याचं टाळलं. तो खाली मान घालून उभा राहिला. पण जिमला राहावेना. तो म्हणाला, "फोर्टी, मी तुझा "जिवलग मित्र आहे ना ?" यावर फोर्टी कळवळून म्हणाला, "म्हणजे काय ? खरंच तू माझा जिवलग मित्र आहेस !" यावर जिम म्हणाला, "मग मला खरं खरं सांग, तू एवढ्या रात्री घराबाहेर का पडलास ?"

फोर्टी म्हणाला, "मला एका सिनेमाला जायचं होतं. पण

मम्मी-डॅडींनी 'मुळीच जायचं नाही' असं मला ठणकावून सांगितलं. मी त्यांच्या किती विनवण्या केल्या, तरीपण त्यांनी मला जाण्याची परवानगी दिली नाही. म्हणून मला त्यांचा खूप राग आला. आता मी त्यांच्या घरात मुळीच राहाणार नाही आणि मी कुणालाही न सांगता बाहेर पडलो. पण तू माझा मित्र आहेस, तुला सांगितल्याशिवाय मला चैनच पडेना."

जिम म्हणाला, "फोर्टी, तू आता माझ्या घरात चल आणि माझ्याबरोबर झोप. सकाळी उठून घरी जा."

"छे! छे!" फोर्टी म्हणाला, "मी तुझ्या घरी मुळीच येणार नाही. मी दुसरीकडे जाणार आहे."

"पण फोर्टी, माझं ऐक तू. आपल्या मित्राचं तू ऐकणार नाहीस का?" जिम म्हणाला.

यावर फोर्टी म्हणाला, "नाही रे! तसं नाही. तुझ्या घरी राहिलो तर सगळ्यांना समजेल. आणि तेच तर मला नको आहे. माझा जिवलग मित्र म्हणवतोस ना? मग माझं एक ऐक, आणि मला वचन दे की मी कुठे आहे ते तू कुणालाच सांगणार नाहीस. आपण लांब फिरायला जातो त्या ठिकाणी मी जाणार आहे."

हे ऐकून जिम म्हणाला, "अरे फोर्टी, तेथे तर दाट जंगल आहे. कुणी जनावर आलं तर? साप चावला तर?"

यावर फोर्टी म्हणाला, "तू मुळीच काळजी करू नकोस. माझं गुपित कुणाला सांगू नकोस म्हणजे झालं."

जिम म्हणाला, "बरं, बरं, नाही सांगणार कुणाला. पण जरा थांब, मी तुला थोडा खाऊ आणून देतो." आणि जिमनं घरात जाऊन फोर्टीसाठी खाऊ आणून दिला. जिम आणि लॅसीचा निरोप घेऊन फोर्टी व स्मोकी निघून गेली, आणि ही दोघंजण परत घरात आली.

त्या रात्री काही जिमला झोप आली नाही. ती सारी रात्र त्यानं तळमळून काढली. 'त्या दाट जंगलात फोर्टीची अवस्था काय झाली असेल' या कल्पनेनंच तो शहारून गेला. सकाळी तो उठला तरी त्याच्या मनात फोर्टीच्याच विचारांचं काहूर माजलं होतं. आजोबा आणि मम्मीबरोबर तो कसाबसा नाश्ता करायला बसला.

एवढ्यात टेलिफोनची घंटी वाजली. मम्मीनं फोन उचलला तर तो फोर्टीच्या मम्मीचा फोन होता. मम्मीला विचारत होती, "फोर्टी काल रात्रीपासून घरी नाही. तो तुमच्या घरी आला आहे का?" मम्मीनं तिला 'नाही' सांगून म्हटलं, "तरी पण मी जिमला विचारते," आणि तिनं जिमला विचारलं, "जिम, फोर्टी घरात नाही. तो कुठे गेला आहे ते तुला माहीत आहे का? फोर्टीचे डॅडी-मम्मी खूप चिंतेत आहेत." जिम एकदम बावरला, गोंधळला.

फोर्टीचं गुपित तर त्याला माहीत होतं. पण ते तो सांगणार कसा? फोर्टीला त्यानं वचन दिलं होतं. तो मम्मीला म्हणाला, ''मम्मी, मला खरंच माहीत नाही''.

टेबलावर ठेवलेला नाश्ता तसाच पडून राहिला. आजोबा, मम्मी, सर्वांना फोर्टीची काळजी वाटू लागली. जिम तर खूपच अस्वस्थ झाला. जिमला व लॅसीला घेऊन आजोबा फोर्टीच्या शोधात निघाले.

आजोबा लॅसीला म्हणाले, ''लॅसी, फोर्टीला शोधून काढ बरं.'' लॅसीनं बारीक आवाज काढला आणि ती फोर्टीला शोधू लागली. पण वचनबद्ध असलेल्या जिमनं लॅसीला बजावलं, 'तू मुळीच शोधून काढू नकोस'. लॅसीनंसुद्धा भुंकून इकडेतिकडे शोधण्याचा बहाणा केला. निराश होऊन आजोबा घरी परत आले.

जिम फोर्टीला जंगलात खाऊ घेऊन गेला, पण फोर्टी खूपच घुश्श्यात होता. त्यानं झाडाआड बसून लॅसीचा आवाज ऐकला होता. त्याला वाटलं की जिमनं आपल्याला दिलेलं वचन मोडलं आणि तो आजोबांना घेऊन आपल्याला शोधायला आला. त्यानं जिमचा खाऊ घेतला नाही. तेव्हा जिम म्हणाला, 'हे बघ फोर्टी, तुला खरंच शोधू नको म्हणून लॅसीला मी सांगितलं. तिनं उगाच इथे-तिथे जाऊन भुंकण्याचा बहाणा केला होता.' आता मात्र फोर्टीला पटलं आणि जिमकडून खाऊची पिशवी घेऊन त्यानं व स्मोकीनं तो खायला सुरुवात केली.

इकडे आजोबांनी जेनीला फोन करून पोलीसइन्स्पेक्टरला घरी बोलावलं. त्यांनीसुद्धा फोर्टीविषयी जिमला खोदून, खोदून विचारलं. पण जिमनं कुणालाच दाद कशी ती दिली नाही.

आजोबा, इन्स्पेक्टर, सर्वजण शोधून आले. पण झाडात लपून बसलेला फोर्टी कुणालाच दिसला नाही. इन्स्पेक्टर आजोबांना म्हणाले, ''घाबरू नका. मी प्रयत्नांची शिकस्त करतो,'' आणि सर्वांचा निरोप घेऊन ते निघून गेले.

जिम त्याच पावली फोर्टीकडे गेला. पण फोर्टी त्या झाडांच्या आड दिसलाच नाही. जिम घाबरला. 'फोर्टीला वाघानं मारलं तर नसेल ना?' तशा स्थितीत लॅसीला घेऊन तो रानातून धावत सुटला. पुढे रेल्वेचा एक फाटा लागला आणि लॅसीनं दुरूनच फोर्टीला पाहिलं, स्मोकीला घेऊन रेल्वेच्या रुळांमधून फोर्टी चालत होता. हे तिनं जिमला भुंकून सांगितलं. जिम धावतच फोर्टीकडे गेला, लॅसी मागे होतीच. त्यानं फोर्टी व स्मोकीला प्रथम रुळांबाहेर काढलं. पण फोर्टीला जिमचा राग आला. त्यानं त्याला रागानं लोटूनच दिलं. तो त्याला म्हणाला, ''कशाला मला वाचवतोस? मरू दे मला.''

पण जिमनं फोर्टीला अडवलं आणि त्याला म्हणाला, ''फोर्टी, तू नाहीसा झाल्यामुळे तुझे मम्मी-डॅडी खूप चिंतेत आहेत. माझ्या मम्मीला ते सारखा फोन करतात. अरे, चूक कोणाच्या हातून होत नाही? म्हणून कोणी मम्मी-डॅडींवर राग धरतं का?

ते तुझ्यावर कितीतरी प्रेम करतात. तू माझा मित्र म्हणवतोस ना? मग असं वेडंवाकडं वागू नकोस, मम्मी-डॅडींना दु:ख देऊ नकोस. त्यांना तू हवा आहेस.''

फोर्टीला त्याच क्षणी मम्मी-डॅडींची तीव्रतेनं आठवण झाली, त्याचा जीव त्यांच्या आठवणींनी व्याकुळ झाला आणि डोळे अश्रूंनी भरून आले. तो स्मोकीला घेऊन जिमबरोबर मुकाट चालू लागला. लॅसीनं चाटून फोर्टीचे व स्मोकीचे खूपच लाड केले.

□



# जिम व माकड



स्वयंपाकघरात मम्मी कांदे चिरत होती. तिला स्वयंपाकाची घाई होती. जेवणाच्या टेबलाजवळ बसून जिम व फोर्टी 'फन अँड प्रॉफिट'चा खेळ पाहात होते. जिमचं अधुनमधून नसते प्रश्न विचारून मम्मीला भंडावून सोडणं चालूच होतं. इतक्यात लॅसीनं भुंकायला सुरुवात केली.

बाहेर काहीतरी गडबड असल्याखेरीज लॅसी भुंकणार नाही याची जिमला खात्री होती. बाहेर काय चाललंय हे पाहाण्यासाठी जिम व फोर्टी बाहेर आले. इकडेतिकडे पाहातात तोच लॅसी त्यांना अंगणाच्या कोपऱ्यातील पिंजऱ्याकडे घेऊन गेली. पिंजऱ्यात एक माकड होतं. या सर्वांना पाहून त्यानं नाचायला सुरुवात केली. तसं ते लहान नव्हतं. एक छोटा मुलगा वाटावा एवढ्या उंचीचं होतं ते. तोंड मात्र काळं काळं कुळकुळीत. फोर्टीच्या दोन्ही खांद्यांवर त्यानं हात ठेवले मात्र, तो जामच दचकला. त्यानं जिमला विचारलं, "अरे जिम, हा माकडाचा पिंजरा इथे कुणी आणून ठेवला?"

इतक्यात लॅसी त्या माकडाच्या अगदी जवळ गेली आणि त्याला चाटू लागली. हे दृश्य पाहून जिम व फोर्टी एकदम म्हणाले, "अरे! ह्या दोघांची तर मैत्री झाली. मग आपण तरी कशाला घाबरायचं?" आता त्या दोघांची भीती खूपच कमी झाली होती. त्यांनी हळूच त्या पिंजऱ्याचं दारही उघडलं आणि त्या माकडाचे लाडही केले. जिम

तर याहीपुढे गेला. त्यानं त्याला कोट, पॅन्ट वगैरे घालून सजवलं. माकड पण फारच खुश झालं होतं. इतक सगळं झाल्यावर त्यांनी त्याला पुन्हा पिंजऱ्यात ठेवलं आणि दार बंद करून ते चुपचाप घरी आले.

मम्मीचं बटाटे तासणं चालू होतं. जिमनं तेवढ्यात एक केळं घेतलं. ते त्यानं लॅसीच्या तोंडात दिलं व म्हणाला, 'हे केळं नेऊन मंकीला दे!' लॅसीही पडत्या फळाची आज्ञा घेऊन बाहेर आली. आजोबा अंगणात सुतारकाम करीत होते, त्यांची नजर चुकवून तिनं केळं माकडाला नेऊन दिलं. पण परत येताना तिच्या उडी मारण्याचा आवाज आजोबांना ऐकू आला. त्या आवाजाच्या रोखानं आजोबांनी निरखून पाहिलं, तर त्यांना माकडाचा पिंजरा आणि लॅसीनं दिलेलं केळं मजेत खाणारं माकड दिसलं.

आजोबा आरडाओरडा करीतच स्वयंपाकघरात आले. जिमचा हा नवा प्राणी त्यांचा संताप वाढवण्यास कारणीभूत झाला. ते रागावून मुलीला म्हणाले, ''ॲलन, आता या घरात नवीन प्राणी येता कामा नये, सांगून ठेवतो. मी सांगतो, त्याच्याबरोबर अजिबात सलगी करू नका.''

दिवस कधी सरला ते कळलंच नाही. रात्री जेवणं आटोपल्यावर सर्वजण आपापल्या खोलीत झोपायला गेली. तसा जिम लॅसीला म्हणाला, ''लॅसी, तू मात्र माकडाच्या सोबतीला राहा, बरं का. तुला आज पहारा करायचं काम आहे.'' लॅसीही बारीक आवाज काढत माकडाच्या पिंजऱ्याजवळ गेली.

दुसरा दिवस उजाडला. जिमला जाग आली. तसा तो एक मोठ्ठा आळस देत उठला आणि नाश्ता करून माकडाजवळ गेला. इतक्यात फोर्टीची खुणेची साद ऐकू आली. जिमनं त्याला पिंजऱ्याजवळ बोलावलं. फोर्टी जवळ आला, तसं जिमनं माकडाला पिंजऱ्यातून बाहेर काढलं. मम्मीही तेवढ्यात बाहेर आली. तिनं त्याला उचलून घेऊन बाळासारखे त्याचे लाड केले, आणि ती आपल्या कामाला निघून गेली. जिम व फोर्टी माकडाला झोपाळ्यावर, सायकलवर बसवून खेळवत होते. आजोबांचं मात्र सुतारकाम चालू होतं.

मम्मीचं काम झाल्यावर ती जिमला म्हणाली, ''जिम, माझ्याबरोबर थोडा वेळ बाजारात येतोस का?'' जिमला मम्मीबरोबर जाण्यास खूप गंमत वाटे. म्हणून तो लगेच तयार झाला. लॅसीला मात्र त्यानं आपल्याबरोबर न घेता, माकडावर लक्ष ठेवण्यास म्हणून घरीच ठेवली.

जिमचे आजोबा त्यांच्या घरावरील कौले नीट करत होते. पण अचानक त्यांचा पाय घसरला आणि त्यांचा तोल गेला. ते घसरत खाली येऊ लागले. अशा स्थितीत ते खाली कोसळणार हे निश्चित होतं. त्यांनी मोठ्यानं 'वाचवा, वाचवा' म्हणून ओरडायला सुरुवात केली.

आजोबांचा आवाज लॅसीनं ऐकला. माकडही पिंजऱ्यातून ओरडू लागलं. तेव्हा लॅसीनं पिंजऱ्याचा दरवाजा उघडून त्याला मोकळं केलं. आता दोघंही आजोबांकडेच पाहात होती. पण लॅसी भुंकण्याखेरीज त्यांना कसलीच मदत करू शकत नव्हती. माकड मात्र स्वस्थ बसलं नाही. बाजूलाच पडलेली शिडी त्यानं उभी केली. स्वत: उडी मारून ते वर गेलं. पण आजोबांना शिडीपर्यंतसुद्धा येता येणं शक्य नव्हतं. 'आता काय करावं?' माकडानं विचार केला आणि ते खाली उतरलं. त्यानं आजुबाजूला दोरी दिसते का, पाहिलं. नशिबानं त्याला एक दोरी दिसली. दोरी घेऊन माकड पुन्हा सरसर कौलावर चढून गेलं. त्यानं आधी आपला कोट, बाजूला काढून पॅन्ट ठेवली.

माकड जवळ आल्यावर आजोबा थोडे घाबरलेच. पण जेव्हा त्यानं आजोबांच्या हातात दोरी दिली तेव्हा त्यांच्या ध्यानात आलं, 'अरे, हे तर आपल्याला मदत करायला आलं आहे.' दोरीचं दुसरं टोक घेऊन माकड खाली कधी उतरलं ते त्यांना कळलंसुद्धा नाही.

आजोबा दोरीला धरून घसरत शिडीजवळ आले. खाली माकड दोरी धरून उभं होतं. त्यानंतर, शिडीचा आधार घेऊन आजोबा खाली उतरले. उतरल्यावर प्रथम त्यांनी माकडाला प्रेमानं जवळ घेतलं. इतक्यात, जिम व मम्मीही आली. आजोबांनी माकडाला प्रेमानं जवळ घेतलं आहे, लॅसी बारीक आवाजात भुंकते आहे! हे दृश्य खरोखरच आश्चर्यकारक होतं. हे घडलं कसं?

पण त्या दोघांना फार वेळ कोड्यात रहावं लागलं नाही. आजोबांनी सारं काही त्यांना समजावून सांगितलं. ते म्हणाले, "ॲलन, आज हे माकड नसतं तर मी तुम्हाला दिसलोच नसतो." जिमनं माकडाचे खूप लाड केले आणि मम्मीनं त्याला खाऊ दिला.

पण आठ दिवसांपूर्वीच आजोबांनी जेनला फोन करून माकडाला घेऊन जायला सांगितलं होतं. ठरल्याप्रमाणे गाडी आली. पण माकड जायला तयार नव्हतं. लॅसी बारीक आवाज काढून रडत होती. जिमही हिरमुसला झाला होता. पण या गोष्टीला इलाज नव्हता. माकडाला गाडीत ठेवून गाडी चालू झाली. लॅसी गाडीच्या मागून काही अंतरापर्यंत भुंकत गेली. पण परत आली. जिम मम्मीला म्हणाला, "मम्मी, आपण मंकीला दुरावलो ग." मम्मीलासुद्धा खूप वाईट वाटलं. □

# ‘हॅपी’ चिंपाझीचा जिमच्या घरात पुन्हा प्रवेश



आज छोटा जेम्स जिमच्या घरी राहायला आला होता. बऱ्याच दिवसांनी आल्यामुळे मम्मी, जिम, आजोबा, व फोर्टी, सारेचजण त्याचे खूप लाड करीत होते. मम्मीनं त्याच्यासाठी खास केक केला होता.

दुपारी जेवताना आजोबा म्हणाले, “बरं का जिम, आज आपण जेम्सला घेऊन प्राणीसंग्रहालय पाहायला जाऊ या. आपल्याकडे आलेला ‘हॅपी’ चिंपांझीही पाहाता येईल. आपल्याला सर्वांना ओळखून तो नक्कीच खूष होईल. तेव्हा बरं का जेम्स, जेवण झाल्यावर लगेच तयारीला लागायचं.” जेम्स खुशीनं ‘हो’ म्हणाला.

सारेजण तयारीला लागले. मम्मी जेम्सची तयारी करत होती. जिम, फोर्टी, व आजोबा तोपर्यंत गाडीत जाऊन बसलेसुद्धा. इतक्यात लॅसी तिकडे आली आणि जेम्सच्या शर्टाची बाही धरून त्याला ओढतच गाडीकडे नेऊ लागली. मम्मीला लॅसीची ही खटपट पाहून हसूच आलं.

आजोबांसह जेम्स, जिम, फोर्टी प्राणीसंग्रहालय पाहायला निघाले. आज सुट्टी असल्यामुळे प्राणीसंग्रहालय पाहायला येणाऱ्यांची खूपच गर्दी होती. सर्वजण प्रथम वाघाच्या पिंजऱ्याजवळ गेले. वाघ भला मोठा होता, पण तो माणसांना पाहून अस्वस्थ झाला होता. त्याचं पिंजऱ्यात जोरजोरानं फेऱ्या मारणं चालू होतं. तिथून पुढे सिंह, अस्वल, गेंडा,

असे खूप प्राणी पाहिले. पण जेम्सला मात्र केव्हा एकदा चिंपाझीचा पिंजरा येतो असं झालं होतं. 'चिंपाझी म्हणजे काय ?' हा प्रश्न त्यानं फोर्टीला एकदा नाही तर चांगला चार-पाच वेळा विचारला. फोर्टीनं त्याला सांगितलं, "चिंपाझी म्हणजे गोरिला, जवळ-जवळ माणसासारखाच दिसणारा प्राणी. त्याला माणसासारखेच हात-पाय असतात. कळलं ना ?" परंतु त्याला प्रत्यक्ष बघेपर्यंत जेम्सच्या डोक्यात मुळीच प्रकाश पडत नव्हता.

अखेर एकदाचे सर्वजण 'हॅपी' चिंपाझीच्या पिंजऱ्याजवळ आले. आजोबा, जिम, आणि फोर्टीला पाहून त्यानं आनंदानं चित्कार केला, आणि दे दणादण उड्या मारून तो नाचत सुटला. इतर लोकांना हे दृश्य पाहून आश्चर्य वाटत होतं, 'हा चिंपांझी या लोकांना कसा बरं ओळखतो ?' त्यांना काय माहीत की त्यानं चांगला आठ दिवस जिमच्या घरी पाहुणचार झोडला होता.

पण हॅपीला लॅसी दिसली नाही म्हणून तो अस्वस्थ झाला. जिमचा नाईलाजच होता. 'कुत्रे आणू नयेत' असा बोर्ड संग्रहायाच्या बाहेर लावला होता. त्यामुळे लॅसी बिचारी गाडीतच बसून राहिली होती. इतक्यात चिंपाझीला खायला द्यायला तिथला एक अधिकारी आला. तरीपण हॅपी स्वस्थ बसेना. तेव्हा तो अधिकारी आजोबा, जिम, व फोर्टीला म्हणाला, "तुम्ही जरा वेळ बाजूला होता का ? तुम्हाला पाहून तो बेभान झाला आहे." आजोबा तात्काळ म्हणाले, "काही हरकत नाही. तुम्ही त्याला खायला द्या, आम्ही थोड्या वेळानं येतो."

हॅपी मात्र आज ऐकण्याच्या मूडमध्ये नव्हता. त्यानं खाण्याची बादली उपडी काय केलीन्, पिंजऱ्यात ठेवलेल्या झुल्यावर चढून काय बसला. शेवटी खाली पडलेला खाऊ त्यानं खायला सुरुवात केली आणि खाऊ देणारा माणूस एकदाचा बाहेर आला. या साऱ्या गोंधळात त्याच्या पिंजऱ्याचा दरवाजा मात्र बंद करण्याचा राहून गेला. आणि ही संधी साधून हॅपी पिंजऱ्याबाहेर निसटला, तो थेट लॅसीला शोधायला बाहेर पळाला.

तेवढ्यात जिम, फोर्टी, आजोबा, व जेम्स पुन्हा पिंजऱ्याजवळ आले. पहातात तर काय ? हॅपी पिंजऱ्यात नाही आणि पिंजरा सपशेल मोकळा. आजुबाजूची बरीच माणसं तिथं जमली. संग्रहालयाच्या अधिकाऱ्यांची या गोष्टीमुळे चांगलीच भंबेरी उडाली. त्यांनी हाताखालच्या माणसांना हाका मारून बोलावलं व सगळ्यांना आज्ञा दिली, 'चला बाहेर जाऊन शोधा, अजिबात वेळ घालवू नका.' सर्वांची एकच तारांबळ उडाली.

हॅपी, उभ्या असलेल्या सगळ्या गाड्यांवरून उड्या मारीत मारीत ज्या गाडीत लॅसी होती तिथं आला. हॅपीला पाहून लॅसीला कोण आनंद झाला, आणि तिनं बारीक आवाज काढून तो व्यक्तही केला. हॅपीनं सरळ गाडीत उडी मारली आणि तिथं पडलेला कोट अंगावर ओढून घेऊन तो गुपचुप पडून राहिला.

इथे कुणालाचा हॅपी सापडला नाही. आजोबासुद्धा बराच वेळ

झाल्यामुळे मुलांना घेऊन गाडीपाशी आले. त्यांना ओझरतीही कल्पना नव्हती की हॅपी मागच्या बाजूला सीटखाली लपून बसला आहे. आजोबा, जिम, व फोर्टी पुढे बसले, तर पाठीमागे लॅसी आणि जेम्स. आजोबांनी गाडी चालवताना गप्पा चालू गेल्या. त्या तिघांचंही लक्ष पाठीकडे गेलं नाही. पण जेम्सच्या मात्र लक्षात आलं की हॅपी खाली लपला आहे. मात्र तो तसाच चूप राहिला.

सर्वजण घरी आले. सर्वांच्या मागून हॅपी उतरला. बरोबर लॅसी व जेम्स उतरले. मग जेम्सनं लॅसीला व हॅपीला तळघराच्या बाजूला नेऊन लपवलं.

थोड्या वेळानं आपलं काम करायला आजोबा नेमके त्याच जागी गेले. हॅपी, झाकलेला कपडा वर करून मध्येच त्यांच्याकडे पाहात होता. मध्येच त्यानं त्यांचा चिरूट पळवला आणि त्यानं तो खुश्शाल ओढायला सुरुवात केली. आजोबा मात्र चिरूट नाहीसा झाला म्हणून जाम वैतागले.

मम्मीनं सगळ्यांना दूध व केक खाण्यासाठी हाक मारली, ''फोर्टी, जिम, जेम्स, चला लवकर, तुमचा दूध व केक बाहेर काढला आहे.'' जेम्ससकट सारे टेबलाकडे आले. तेव्हा त्यांच्यात लॅसी नाही हे बघून मम्मीनं विचारलं, ''जेम्स, लॅसी कुठे आहे?'' जेम्स चांगलाच गोरामोरा झाला. पण त्यानं बतावणी करून ती 'बाहेरच आहे' म्हणून वेळ मारून नेली.


इथे हॅपीनं आजोबांचा पळवलेला चिरूट ओढला आणि कंटाळा आल्यावर बेदरकारपणे कचऱ्याच्या टोपलीमध्ये टाकून दिला. व्हायचा तोच परिणाम झाला. हळुहळू आग धुमसायला लागली. थोड्याच वेळात आगीनं चांगलाच पेट घेतला. आणि याची कोणालाच कल्पना नव्हती.

जेम्सनं आजोबा आत आल्याबरोबर पुन्हा एकदा लॅसी व हॅपीकडे धाव घेतली. जेम्सची बोबडी वळायचीच बाकी राहिली. तिथून त्यानं पटापट लॅसीला आणि हॅपीला बाहेर काढलं. बाहेर दोरा ओढून वर चढण्याच्या पुलीमध्ये त्यानं लॅसीला बसवलं. पण दोरा ओढायला ताकद होती का? शेवटी हॅपी मदतीला आला. त्यानं दोर ओढला आणि लॅसी कौलावर जाऊन बसली. मागोमाग हॅपी वर चढून गेला आणि जेम्सनं सुटकेचा निश्वास सोडला.


जेम्सला व लॅसीला शोधायला सगळे बाहेर आले. तेवढ्यात लॅसीनं मोठमोठ्यानं भुंकायला सुरुवात केली होती. आगीच्या धुराचा लोट उसळला होता. लॅसीचा विचार येऊन जिम आणि फोर्टीच्या जिवाचा थरकाप झाला. आजोबांची तर पाचावर धारण बसली. प्रथम ते धांदरटासारखे इथुनतिथून पळू लागले, पण मग थोड्याच वेळात सावरले. त्यांनी अंगणाच्या कोपऱ्यात गुंडाळून ठेवलेला पाईप उचलला व तो नळाला लावू लागले. हॅपीला तर मदत करण्याचा उत्साहच आला होता. त्यानं तिथं पडलेली बादली घेतली आणि

त्यांच्यामागून तो नळाकडे धावत गेला. लॅसी हे सारं पाहात होती. पण वरून खाली येणं मात्र तिला अशक्य झालं होतं. त्यामुळे तिचं भुंकणंही अधुनमधून चालू होतं.

जिमनं लॅसीला वर अडकून पडलेलं पाहिलं. तो शिडीवरून चढून वर गेला. लॅसीला त्यानं पुलीमध्ये बसवलं. खालून हॅपीनं व फोर्टीनं पुली ओढली आणि लॅसी अगदी सुखरूप खाली आली. सर्वांना हायसं वाटलं. जेम्सच्या छुपेपणामुळे व हॅपीच्या निष्काळजीपणामुळे लॅसीचं जीवन जवळजवळ धोक्यात आलं होतं. पण तिचा जीव वाचविण्यातही जेम्स आणि हॅपीनंच मदत केली. जिमनं हॅपी व लॅसीचे खूप लाड केले तर मम्मीनं हॅपीला एकदम बिलगून जवळ घेतलं. जेम्स मात्र हिरमुसला चेहरा करून उभा होता. मम्मीनं जेम्सला पाहिलं आणि ती त्याला म्हणाली, ‘‘जेम्स, बाळ, वाईट वाटून घेऊ नकोस बरं. पण पुन्हा असं करू नको.’’ यावर जेम्स एकदम गोड हसला. दुसऱ्याच दिवशी सकाळी हॅपीला त्याच्या योग्य स्थळी पोचविल्यानंतर आजोबा-मम्मीचा जीव भांड्यात पडला. □



# लॅसीची शिक्षा



आज छोट्या जेम्सला जिमच्या मम्मीनं नवीन कोट, नवीन पॅन्ट शिवली. तिनं जेम्सला हाक मारली, ''जेम्स, अरे जेम्स, लवकर ये.'' ''काय ऑन्टी'' म्हणून जेम्स धावतच आला. मम्मी त्याला पाहून म्हणाली, ''जेम्स, तुझ्यासाठी हा नवीन कोट व पॅन्ट. आवडला का?'' जेम्सचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे उमटला. मम्मीनं त्याला कोट, पॅन्ट घालायला मदत केली. सर्वांनी त्याचे 'छान दिसतो' म्हणून कौतुक केलं. जेम्स मम्मीला म्हणाला, ''ऑन्टी, मी जरा बाहेर जाऊ का?''

मम्मी म्हणाली, ''जा. पण तुझे नवीन कपडे खराब करू नकोस.''

'बरं' म्हणून जेम्स बाहेर गेला.

जेम्सच्या मागून लॅसी गेली. त्याच्याबरोबर खेळायला मिळणार म्हणून तीही खुशीत होती. जेम्स बाहेर येऊन एका दगडी बाकावर बसला. लॅसीनं कोपऱ्यातला बॉल उचलला आणि ती जेम्सजवळ आली. त्याच्याजवळ तिनं तो देण्याचा प्रयत्न केला. ती त्याला घासू लागली. पण जेम्स आज खेळायच्या मूडमध्ये नव्हता. तो लॅसीला म्हणाला, ''लॅसी, माझे कपडे नवीन आहेत. तू ते खराब करू नकोस हं. मी हे नवे कपडे बदलून दुसरे घालीन तेव्हाच आपण खेळू. शहाणी माझी लॅसी.''. एवढं बोलून जेम्स आपले चिमुकले पाय हलवू लागला. त्याच्या चेहऱ्यावरून आज आनंद ओसंडत होता.

एवढ्यात लॅसीचं लक्ष एका सरड्यासारख्या सरपटणाऱ्या प्राण्याकडे गेलं. तो प्राणी सरपटत जिथे कोपऱ्यात लोखंडी सामान ठेवलं होतं अशा अडचणीच्या जागेत गेला. झालं! लॅसीनं भुंकायला सुरुवात केली. लॅसी उगीच भुंकणार नाही हे सर्वांना माहीत होतं आणि जेम्सही याला अपवाद नव्हता. लॅसीनं भुंकून त्याला त्या अडचणीच्या जागी नेलं. नक्कीच तेथे काहीतरी असलं पाहिजे, म्हणून जेम्स त्या अडचणीच्या जागेत शिरला, आणि काही दिसतं का, पाहू लागला. एवढ्यात त्याच्या खांद्याला काहीतरी टोकदार खरचटलं आणि 'टर्र' असा आवाज झाला. जेम्स त्या आवाजानं चरकला. आपला कोट तर फाटला नसेल नं? त्याच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. पाहातो तर काय त्याची भीती खरी ठरली. त्याच्या खांद्याच्या खाली हाताकडे कोट फाटला होता. कोटाची ही दशा पाहून जेम्स घाबरला, आणि त्याला रडूच फुटलं. आता ऑन्टी आपल्याला रागावणार हे नक्की.

जेम्सच्या रडण्याच्या आवाजानं जिम, मम्मी, आजोबा, सर्वजण बाहेर आले. जिमनं विचारलं, "जेम्स, काय झालं? रडतोस का?" जेम्स म्हणाला, "या लॅसीनं माझा कोट फाडला."

"काय लॅसीनं फाडला? खरं सांगतोस तू?" जिम अविश्वासानं म्हणाला, पण लॅसी मात्र बारीक आवाज काढून काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करीत होती.

इतक्यात फोर्टीनं शिट्टी मारून इशारा केला आणि जिमला मासे मारण्यासाठी बोलावलं. जिम म्हणाला, "आज मी मुळीच येणार नाही." त्यानं लॅसीला बाहेर ठेवण्याची शिक्षा केली. पण त्याचं मन मात्र सांगत होतं की नक्कीच लॅसीची ह्यात काही चूक नाही, जेम्सच भित्रा आणि खोटारडा आहे.

लॅसी रात्रभर बाहेर बारीक आवाज काढून रडत होती. शेवटी मम्मी जिमला म्हणाली, "जिम, आता लॅसीची शिक्षा पुरे नाही का झाली? अरे, थोडं समजुतीनं घ्यावं." आजोबांनीही परोपरीनं समजावून सांगितलं. पण जिम अडून बसला होता.

इथे जेम्स आपल्या खोलीत रडत बसला होता. त्याच्या चिमुकल्या गालांवरून आसवं ओघळत होती. लॅसीच्या बारीक आवाजातील रडण्यामुळे तो अत्यंत अस्वस्थ झाला होता. रात्री कोणीच झोपलं नाही. अगदी जेम्ससकट सगळे जागे होते.

जेम्स उठला. तो जिमच्या खोलीत आला. आढ्याकडे डोळे लावून जिम बसला होता. त्याची लॅसी एकटी बाहेर शिक्षा भोगत होती. त्यामुळे त्याच्या मनाला यातना होत होत्या. जेम्स चोरपावलांनी जिमजवळ येऊन उभा राहिला. त्याच्या हुंदक्यांनी जिम भानावर आला. त्यानं रागावलेल्या चेहऱ्यानं जेम्सकडे पाहिलं. तो त्याच्याशी बोलायलाही तयार नव्हता. अखेरीस धीर करून जेम्स म्हणाला, "जिम, मला क्षमा कर, मी तुझी माफी मागतो. आता लॅसीची शिक्षा पुरे झाली." पण जिमनं काही त्याचं ऐकलं नाही.

सकाळ झाल्यावर जेम्स लॅसीकडे आला. पण त्याला ती जागेवर दिसलीच नाही. घाबरून त्यानं जिमला येऊन सांगितलं आणि जिम ताबडतोब लॅसीला शोधायला निघाला. त्यानं सर्व जागा शोधल्या, पण लॅसी सापडेना.

शेवटी एका झाडाच्यामागे लपून राहिलेली लॅसी जेम्सला सापडली. जेम्सला पाहाताच ती मागे सरली. ती जेम्सवर रुसली होती. तिनं त्याचा कोट फाडला नव्हता. चूक तिची नव्हतीच मुळी. शेवटी जेम्सला राहावलं नाही. तो लॅसीजवळ गेला. तिला त्यानं मायेनं घट्ट जवळ घेतली. तिला म्हणाला, ''लॅसी, मला माफ कर. तू दोषी नाहीस ग. मी पुन्हा खोटं बोलणार नाही.'' लॅसीला त्याचं बोलणं पटलं. तीही जेम्सला चाटू लागली, त्याच्या डोळ्यांतले अश्रू तिनं चाटले. तिला घेऊन तो घरात आला. तेवढ्यात जिमही परत आला. पहातो तर लॅसी आणि जेम्स एकमेकांचे लाड करीत आहेत.

जिमला पाहाताच जेम्सनं पुन्हा एकदा आपली चूक कबूल केली. 'कोट फाटला. मग तुम्ही रागवाल, म्हणून मी खोटं बोललो,' असा कबुलीजबाबही त्यानं दिला. आता मात्र जिमनं त्याला खरोखरीची क्षमा केली. 'पुन्हा खोटं बोलू नकोस' असं सांगून त्याचे लाडही केले. लॅसीचेही लाड झाले. सर्वांना आनंद झाला. मम्मीनं सर्वांना ब्रेकफास्ट दिला आणि लॅसीलाही तिचा खाऊ मिळाला. □





# अपशकुन

'फियापी' म्हणून ओरडतच फोर्टी सायकलवरून आला. फोर्टी आला की नेहमीच तो हा दोघा मित्रांमधला खुणेचा शब्द मोठ्यानं ओरडत येई. त्याला पाहाताच जिमला आनंद झाला. इतक्यात काळ्या रंगाचं एक मांजर तिथून धावत गेलं. त्याला पाहून लॅसी भुंकायला लागली, पण फोर्टी मात्र अस्वस्थ झाला. जिम फोर्टीकडे पाहातच राहिला. फोर्टीनं मोठ्ठा सुस्कारा काय टाकला, आपलं बोट हनुवटीवर ठेवून अस्वस्थतेनं मान काय हलवत होता. शेवटी जिमला राहावलं नाही. तो फोर्टीला म्हणाला, "अरे फोर्टी, असं काय करतोयस ? झालंय काय तुला ?"

फोर्टीनं जिमला म्हटलं, "अरे जिम, आत्ताच नाही का आपण काळं मांजर जाताना पाहिलं ?"

"हो मग ! त्यानं आपलं काय वाकडं केलं आहे ? ते आपल्या वाटेनं निघून गेलं," जिम म्हणाला. "अरे, तसं नाही रे जिम. हे बघ, काळं मांजर पुढून गेलं तर 'बॅड लक', अगदी वाईट असतं बघ," फोर्टी म्हणाला.

पण जिम म्हणाला, "आपल्याला नाही बुवा पटत तुझं म्हणणं"

"बरं, अनुभव येईल तेव्हा बघा" फोर्टी म्हणाला.

एवढ्यात आजोबांनी जिमला हाक मारली, "अरे जिम, माझी

हॅट पाहिलीस का ? इथं, कपाटावर ठेवली होती मी.'' जिम धावतच आला आणि त्यानं आजोबांना रेडियोवर असलेली हॅट शोधून दिली. आजोबा जिमला म्हणाले, ''जिम, मी जरा बाहेर जाऊन येतो,'' आणि आजोबा जायला निघाले. आजोबा बाहेर पडायला आणि बाजूला टेकून ठेवलेली शिडी पडायला, नेमकी एकच गाठ पडली. आजोबा अगदी थोडक्यात बचावले. ते पाहून फोर्टी जिमला म्हणाला, ''पाहिलंस जिम, आला नं माझ्या म्हणण्याचा अनुभव.''

फोर्टीला आता लॅसीबद्दल भीती वाटली. तिला काही झालं तर ? जिमला सांगून त्यानं लॅसीला घरातच ठेवलं. जिम व फोर्टी चेंडू घेऊन खेळू लागले. गंमत म्हणजे अगदी योगायोगानं जिमचा चेंडू खिडकीच्या काचेवर जाऊन आदळला आणि ताडकन् काच फुटली. फोर्टीनं पुन्हा एकवार जिमला काळ्या मांजराच्या अपशकुनाचा अनुभव आणून दिला.

इथं लॅसीला घरात कोंडून ठेवलं होतं. पण लॅसी थोडीच आत राहाणार ? तिनं भुंकून-भुंकून सगळ्यांना हैराण केलं. जिम व फोर्टी तिला शांत राहण्यास सांगत होते. पण ती मात्र जरासुद्धा ऐकायला तयार नव्हती. शेवटी रागारागानं तिनं खोलीतले सारे कागदच फाडून टाकले, खिडकीच्या फुटलेल्या काचेतून ती खोलीबाहेर पडली आणि धूम पळाली.

लॅसीचा आवाज ऐकू येईनासा झाला तेव्हा मात्र जिम व फोर्टीची पाचावर धारण बसली. हळूच त्यांनी खोलीत जाऊन पाहिलं तर काय ! लॅसी खोलीत नव्हतीच. जिमला वाटलं, फोर्टी म्हणतोय तसं काहीतरी घडतंय खरं.


एवढ्यात अंगणाच्या बाजूलाच असलेल्या गोठ्यात कसलातरी आवाज झाला, आणि जिम व फोर्टी तेथे धावत गेले. पाहातात तो गाय धपकन् खाली पडली होती आणि ती अगदी तळमळत होती. जिम व फोर्टी घाबरले. घरात तर आजोबा आणि मम्मी, दोघंही नव्हते. आता करायचं तरी काय ? जिमनं जेनला फोन केला आणि काय झालं ते तिला सांगून डॉक्टरांना लगेच पाठवून द्यायला सांगितलं.

काही वेळातच डॉक्टर आले. त्यांनी गायीला पाहिलं आणि ते लगेच समजून गेले. त्यांनी तिला आधी इंजेक्शन दिलं आणि थोडा वेळ ते तिथंच थांबले. जिम व फोर्टी भेदरून हे सारं पाहात होते. डॉक्टरांनीही थोडा वेळ त्यांना कोड्यातच ठेवलं. इथं गायीचं विव्हळणं चालूच होतं. फोर्टीला तर आत्ता घडलेल्या या साऱ्या गोष्टींवरून काळ्या मांजराच्या 'बॅड लक्'चा चांगलाच अनुभव आला, आणि जिमलाही तसंच वाटू लागलं.


त्या तिथं एकदम शांतता पसरली होती. निळ्याभोर आकाशात एखाददुसराच पक्षी उडताना दिसत होता. मधूनच पानांची सळसळ ऐकू येत होती. तशातच लॅसीही निघून गेली होती. त्यामुळे जिम व फोर्टी मनातून अगदी अस्वस्थ, अशांत झाले होते.

आणि ते अशा या विचित्र परिस्थितीत असताना आजोबा व

मम्मी घरी आले. मम्मीनं जिमला हाक मारली. जिम 'आलो ग, मम्मी' म्हणत धावत मम्मीकडे गेला. जिमचा घाबरलेला व भेदरलेला चेहरा पाहून तिनं विचारलं, ''जिम, काय झालं?'' जिम म्हणाला, ''आजोबा, मम्मी, लवकर चला. आपली गाय आजारी आहे. मी डॉक्टरांना बोलावलं आणि तेपण तिथंच आहेत.'' आजोबा व मम्मी धावतच तिथे गेले, आणि पाहातात तर त्यांना दोन गोंडस वासरं दिसली. जिमला खूप आनंद झाला. डॉक्टर म्हणाले, ''गुड लक्, आता कसलीच काळजी नाही''. सर्वांनी डॉक्टरांचे आभार मानले. तेवढ्यात लॅसीही धावत आली. जिमनं तिला जवळ घेऊन लाड केले. फोर्टीपण खूष झाला. काळ्या मांजराचा अपशकून त्याच्या डोक्यातून पार पळाला. □



# मम्मी लॅसीला शिस्त लावते



आजोबांनी बाहेर आपल्या गाडीच्या दुरुस्तीचं काम काढलं होतं. आजुबाजूला दुरुस्तीसाठी लागणाऱ्या सामानाचा पसारा पडलेला होता. आणि आजोबा अगदी गुंग होऊन आपलं काम करत होते. जिम तिथंच आपली सायकल चालवत होता. एवढ्यात चुकून त्याचा धक्का आजोबांना लागला. आजोबा जिमला रागावून म्हणाले, ''समजत नाही तुला, मी काम करतो आहे ते ?''

''सॉरी आजोबा'', जिम म्हणाला. एवढ्यात मम्मीनं जिमला हाक मारली. तसा जिम धावतच घरात गेला. मम्मीनं आज केक केला होता. तो तिनं ताजा-ताजा जिमला व लॅसीला खायला दिला.

केक खाऊन होताच मम्मीनं लॅसीला 'तिथं असलेला बूट रूममध्ये नेऊन ठेव' म्हणून सांगितलं. प्रथम लॅसीला काहीच समजेना. ती तिथंच उभी राहिली. पण मम्मीनं आज निर्धार केला होता की लॅसीला शिस्त लावायचीच, ती लॅसीला पुन्हा म्हणाली, ''लॅसी, जातेस की नाही ? हा बूट रूममध्ये नेऊन ठेव.''

लॅसी खरंच गुणी आणि आज्ञाधारक होती. तिनं बूट तोंडात धरून रूममध्ये नेऊन ठेवला. आता दुसऱ्या आज्ञेसाठी ती पुन्हा मम्मीजवळ आली. मम्मीनं तिला एक काठी दिली. तिनं ती तोंडात धरली, तडक रूममध्ये ती नेऊन ठेवली आणि पुन्हा परत

आली.

आता तर लॅसीनं वस्तू नेऊन ठेवण्याचा सपाटाच लावला. जणू तिला तो छंदच लागला. मम्मीच्या हातात किचनमध्ये वापरण्याचा फडका होता. झालं! लॅसीनं तो पाहिला मात्र, तो रूममध्ये नेऊन ठेवण्यासाठी तिची मम्मीच्या हातातल्या फडक्यासाठी झटापट सुरू झाली. फडक्याचं एक टोक मम्मीच्या हातात तर दुसरं टोक लॅसीच्या तोंडात. लॅसी फडका जोरजोरानं ओढत होती, आणि शेवटी एकदा फडका हिसकावून घेण्यात तिला यश मिळालं. त्याबरोबर, तिनं तो फडका त्याच रूममध्ये आणून ठेवला. जिमला व मम्मीला लॅसीचं हे वागणं पाहून एवढं हसू आलं की काही विचारू नका.

पण त्यानंतर लॅसीला प्रत्येक वस्तू त्या रूममध्ये नेऊन ठेवण्याचं वेडच लागलं. आजोबांची हॅट, जिमचा शर्ट, मम्मीच्या वस्तू तोंडात धरून रूममध्ये नेऊन ठेवण्याचं सत्र लॅसीनं चालू ठेवलं.

आता मात्र लॅसीच्या ह्या वागण्याचं हसू येण्याऐवजी मम्मीला राग येऊ लागला. तिनं लॅसीला बजावलं, 'लॅसी, तू एका जागी बस बरं.' लॅसी खरंच थोडा वेळ कोपऱ्यात जाऊन बसली. तेवढ्यात मम्मीनं जिमला म्हटलं, ''जिम , बाहेर जाऊन आजोबांना जेवायला बोलाव.'' जिमनं आजोबांना जेवायला बोलावलं. आत आल्यावर त्यांचा कोट, बूट पुन्हा लॅसीनं उचलला आणि रूममध्ये नेऊन ठेवला. आधीचा प्रकार माहीत नसल्यानं आजोबांना लॅसीचं कोण कौतुक वाटलं! ते लॅसीला 'गुड गर्ल' म्हणाले, तिची पाठ थोपटून त्यानी तिचे लाड केले. झालं! लॅसीच्या आज्ञाधारकपणाच्या वेडाला पुन्हा उधाण आलं.

जेवणं झाली. आजोबा पुन्हा आपल्या कामाला लागले. जिमही तिथं काहीबाही लुडबुड करीत होता. अर्थात् लॅसी तिथं उपस्थित होतीच. तेवढ्यात आजोबांनी जिमकडे दुरुस्तीचं हत्यार मागितलं. जिमनं ते त्यांच्यापुढे धरलं. पण लॅसीला वाटलं, ते रूममध्ये ठेवायला हवं. तिनं ते झटकन् तोंडानं ओढून घेतलं आणि रूममध्ये नेऊन ठेवलं. तशीच ती पुन्हा धावत आली. तिथं लाकडाची एक फळी होती. थोडी उभी करून तिच्या आधारानं आजोबा काम करीत होते. ती फळी लॅसीनं ओढली आणि आजोबा धाडकन् खाली आदळले. पण ती फळी ओढून घरात नेण्यात लॅसी यशस्वी झाली नाही. तितक्यात आजोबांचे मित्र तिथं आले आणि त्यांनी आजोबांना उठायला मदत केली. पण या साऱ्या भानगडीत आजोबांची कंबर चांगलीच दुखावली.

आता मात्र लॅसीची गंमत वाटण्याऐवजी सर्वांना तिचा त्रास झाला व रागही आला. मम्मीचा लॅसीला शिस्त लावण्याचा निर्धार तिच्याच गळ्यात आला. शेवटी निस्तरण्याचं काम तिलाच करावं लागलं. तिनं लॅसीला हाक मारली. तशी लॅसी बारीक आवाज करून मम्मीकडे आली. मम्मी लॅसीला म्हणाली, ''लॅसी, तू यापुढे कुठलीही गोष्ट रूममध्ये

नेऊन ठेवायची नाही. समजलं?'' मम्मीचा स्वर रागीट होता. ''तू इथं नुसती बसून राहा कशी.'' आता आपण नक्की काय केलं ज्यामुळे मम्मी आपल्यावर रागावली हे न समजून लॅसी चुपचाप बसून राहिली. यांनतर मात्र मम्मीनं लॅसीला शिस्त लावण्याचं नावही घेतलं नाही.





# लॅसी व कोल्हा

अलिकडे चार रात्री एका कोल्ह्यानं सगळ्यांच्या झोपेचं अगदी गुळखोबरं करून टाकलं होतं. तो आला की खुराड्यातील कोंबड्या घाबरून एकच गलका करीत. गुरं-वासरं हंबरू लागत आणि एखादं कोंबडं नाहीसं झाल्याचं सकाळ झाल्यावर लक्षात येई.

'यावर काय बरं उपाय करावा ?' सगळ्यांना चिंता लागून राहिली. शेवटी जिमला एक उपाय सुचला. तो मम्मीला म्हणाला, "मम्मी, मी लॅसीसाठी बॉक्सचं एक घर करतो आणि त्यात तिला बसवतो." मम्मी म्हणाली, "त्यानं काय होईल ? उगीच काहीतरी !" त्यावर जिम म्हणाला, "नाही मम्मी, त्यानंच होणार आहे, बघ. रात्री कोल्हा आला की लॅसी पटकन् बाहेर येईल आणि त्याला पकडून देईल."

"बरं, बरं, काय करायचं ते कर" म्हणून मम्मी कामाला लागली.

जिमनं मोठ्या कष्टानं लाकडाचा एक मोठा खोका तयार केला. लॅसीला आत बसायला छानपैकी मऊ चादर घातली. तो लॅसीला म्हणाला, "लॅसी, आत जाऊन बस बरं. रात्री जेव्हा कोल्हा येईल तेव्हा त्याला तू पकडून दे." लॅसी चूपचाप आत जाऊन बसली.

रात्र झाली आणि सगळ्यांची जेवणं झाल्यावर प्रत्येकजण

आपापल्या खोलीत झोपायला गेला. जिमही आपल्या खोलीत गेला; पहातो तो काय, लॅसी आधीच पलंगापाशी येऊन बसली होती. जिमला पाहून तिनं बारीक आवाज काढला. जणू काही ती म्हणत होती, 'मी तुझ्याकडेच झोपते.' पण जिमीनं तिचे लाड केले आणि तो तिला म्हणाला, "लॅसी, बाहेर जा आणि त्या बॉक्समध्ये झोप बरं. चल, मी तुला पोचवतो." लॅसी निमुटपणे उठली आणि जिमच्या मागून बाहेर येऊन बॉक्समध्ये जाऊन बसली. जिमनं पाहिलं तर तिला ठेवलेला खाऊ तिनं खाल्ला नव्हता. आता जिमलाही तिला एकटीला सोडून जायचं जिवावर आलं. पण मन घट्ट करून तो आत निघून गेला.

मध्यरात्र होत आली. बाहेर काळोखाचं साम्राज्य पसरलेलं होतं. वाऱ्यानं पानांची सळसळ होत होती. मध्येच एखादा कुत्रा भुंकल्याचा आवाज तेवढा येत होता. बाकी सारं शांत होतं. यावेळी लॅसी हळूच खिडकीतून आत आली. तिनं जिमचा शर्ट तोंडात घेतला आणि बॉक्समध्ये आणून ठेवला. पुन्हा ती आत आली आणि स्वयंपाकघरात जाऊन तिनं मम्मीचा एप्रन घेतला, तो बॉक्समध्ये ठेवला आणि आजोबांची हॅटही आणली. त्या रात्री ती स्वस्थ झोपलीही नाही.

सकाळ झाली. मम्मीनं सर्वांचा ब्रेकफास्ट तयार केला. जिमला तिनं हाक मारताच तो उठला आणि तोंड धुऊन ब्रेकफास्ट घ्यायला आला. आजोबाही आले. त्या रात्री कोल्हा आला नव्हता, आणि कोंबड्यांचाही आवाज कोणाला ऐकू आला नाही.

थोड्या वेळानं आजोबांनी कामाला बाहेर जाण्याची तयारी केली. ऐनवेळी त्यांना त्यांची हॅट मिळेना. त्यांनी मुलीला हाक मारली, "ॲलन, माझी हॅट कुठे मिळत नाही बघ." जिम तेवढ्यात म्हणाला, "माझा शर्ट सापडत नाही." आणि मम्मीला तर तिचा एप्रनच मिळत नव्हता. मम्मी म्हणाली, "मोठं नवल आहे! जादू झाली की काय? सर्वांची एकेक गोष्टी सापडेनाशी झाली आहे."

इतक्यात लॅसीच्या भुंकण्याचा आवाज आला. सर्वांना तिची आठवण येऊन ते तिच्याजवळ गेले. पहातात तो काय! लॅसीच्या बॉक्समध्ये त्यांना आजोबांची हॅट, मम्मीचा एप्रन आणि जिमचा शर्ट सापडला. सर्वांना ह्या गोष्टीचं खूप हसू आलं. मम्मी म्हणाली, "पाहिलंत! असं आहे कुत्र्यांचं प्रेमळ मन! आपण जवळ नाही म्हणून तिनं आपले कपडे आपल्याजवळ ठेवले, आणि आपण जवळ असल्याचं समाधान मिळवलं."

त्यानंतर दिवस कसा संपला ते कळलंच नाही. लॅसी आपल्या बॉक्समध्ये बसून होती. पण रात्र झाल्यावर ती जिमच्या खोलीत आली. जिम म्हणाला, "लॅसी, तू शहाणी आहेस, तेव्हा बाहेर जा बरं." नाईलाजानं लॅसी बाहेर गेली.

रात्र बरीच होऊन गेली. नेहमीप्रमाणे दबकत दबकत कोल्हा आला. तो कोंबड्यांच्या खुराड्याच्या दिशेनं जात होता. पण लॅसीला त्याच्या अस्पष्ट पावलांचा आवाज

ऐकू आलाच. मग ती थोडीच थांबते? तिनं एकदम जाऊन त्या कोल्ह्यावर झडप घेतली आणि दोघांची झटापट सुरू झाली. कोल्ह्याला पाहून कोंबड्यांनी ओरडा सुरू केला.

लॅसीचा आवाज, कोंबड्याचा गलका, यानं साऱ्या घराला जाग आली. आजोबा समजून चुकले की नक्की लॅसीनं कोल्होबाला पकडलं आहे. त्यांनी आपली बंदूक काढली आणि ते धावतच बाहेर आले. त्यांच्या पाठीमागून जिम आणि मम्मीपण आली. एकच धावाधाव झाली. आजोबांनी लॅसीला लागणार नाही अशा बेतानं नेम धरून चाप ओढला आणि कोल्ह्याला गोळी मारली. तो तिथंच गतप्राण झाला. सर्वांनी लॅसीला जवळ घेतली. तिचे खूप लाड केले. जिमनं तिला आपल्या खोलीत बोलावलं, पण ती मात्र त्या बॉक्समध्येच जाऊन बसली. दोन दिवस लॅसी असाच प्रकार करीत होती. अखेर कंटाळून जिमनं त्या बॉक्सला फळी मारली व तो बंद करून टाकला. आणि लॅसी नेहमीप्रमाणे जिमच्या खोलीत येऊन झोपू लागली. □



# फोर्टी नदीत बुडतो



शाळेला सुट्टी असल्यावर जिम, त्याचा जिवलग मित्र फोर्टी, आणि लॅसी नदीकिनारी मासे पकडायला गेले नाहीत असं कधी झालंच नाही. जिमच्या हातात मासे धरायचा गळ, फोर्टीच्या हातात मासे ठेवायची टोपली, व लॅसीच्या तोंडात लहान-सहान गोष्टी ठेवलेली पिशवी, अशा मोठ्या लवाजम्यासहित ते निघत. आजही शाळेला सुट्टी असल्यानं नदीकिनारी मासे पकडायचा बेत दोघा मित्रांनी आखला होता.

नदी तशी त्यांच्या घरापासून दूर अंतरावर होती. वाटेत अनेक झाडाझुडपांतून, काट्याकुट्यातून त्यांना जावं लागे. आजुबाजूला मोठी-मोठी झाडं पसरलेली होती आणि त्यापुढे जरा दूरवर शेती पसरलेली होती.

जिम, फोर्टी, व लॅसी आपलं मासेमारीचं सारं साहित्य घेऊन जरा लवकरच मासे पकडायला निघाले. आज भरपूर मासे पकडून घरी घेऊन जायचं असे मांडे दोघं मित्र मनात खात होते.

आजुबाजूला पसरलेल्या गडद झाडीतून मार्ग काढत, गप्पा मारत ते दोघं व लॅसी नदीकिनारी पोचले. नदीकाठी त्यांनी आपलं मासे पकडण्याचं साहित्य ठेवलं. लॅसी त्यांच्या बाजूला शांत बसून होती, फोर्टीनं व जिमनं गळाला माशांसाठी खाऊ लावला व गळ पाण्यात टाकला. थोड्याच वेळात छानपैकी मोठे दोन मासे जाळ्यात सापडले. दोघांना

खूपच आनंद झाला. मासे काढून त्यांनी ते टोपलीत ठेवले आणि पुन्हा गळ पाण्यात टाकून मासे अडकण्याची वाट पाहू लागले.

पण अचानक वारा सुटला, झाडांची पानं सळसळू लागली. आकाशात विजा चमकू लागल्या आणि थोड्याच वेळात पाऊस कोसळण्याची चिन्हं दिसू लागली. क्षणभरातच पाऊस अगदी जोरानं कोसळू लागला.

आता मात्र जिम घाबरला. तो फोर्टीला म्हणाला, ''फोर्टी, चल आपण आवरतं घेऊ या. आपल्याला आता घरी जायलाच हवं.'' पण फोर्टीला नदीत टाकलेल्या गळाचा मोह काही आवरेना. तो म्हणाला, ''जिम, प्लीज थोडा वेळ थांब नं. ह्या गळाला मासे लागले की ते घेऊन आपण लगेच जाऊ.'' असं म्हणून फोर्टी गळ ओढण्यासाठी जरा पुढे वाकला मात्र, आणि त्याला त्याच्या बोजड शरीराचा तोल सांभाळता आला नाही. फोर्टी सरळ पाण्यात पडला आणि गटांगळ्या खाऊ लागला. भीतीनं तो ओरडू लागला. जिमला तर काही सुचेनासं झालं. 'फोर्टीला पाण्याबाहेर कसा काढावा?' तेवढ्यात जोराचा वारा सुरू होऊन आणखी मोठा पाऊस पडू लागला. आता फोर्टी नदीच्या पाण्यात अगदी आतपर्यंत वाहात गेला. त्याच्या नाका-तोंडात पाणी जाऊन तो गुदमरण्याची वेळ आली.

जिमवर मोठा बाका प्रसंग आला होता. लॅसी हे सारं पाहात होती. तिनं फोर्टी बुडत असल्याचं पाहिलं मात्र, तिनं सरळ नदीत उडी घेतली. तुडुंब भरलेल्या नदीतून पोहत, मार्ग काढत ती फोर्टीकडे जात होती. वारा, पाऊस यामुळे नदीच्या पाण्याला अतिशय ओढ होती. तरीही लॅसीनं माघार घेतली नाही. मध्येच पाण्याखाली जाऊन ती दिसेनाशी झाली की जिमचा जीव खालीवर होऊ लागे.

अखेर पोहत पोहत लॅसी फोर्टीकडे आली. तिनं त्याचा पाय तोंडात धरला आणि ती तशीच पाण्यातून फोर्टीला ओढत निघाली. महत्प्रयासानं लॅसीनं फोर्टीला नदीच्या काठावर ओढत आणलं. तिथं जिमनं त्याला सुरक्षित ठिकाणी ओढून घेतलं.

फोर्टीच्या नाका-तोंडात खूप पाणी गेलं होतं आणि त्याची शुद्धही हरपली होती. त्याची ती अवस्था पाहून जिम खूपच घाबरला, त्याची पाचावर धारण बसली. त्यानं लॅसीला आज्ञा केली. तो म्हणाला, ''लॅसी, पळत जा आणि मम्मीला व आजोबांना घेऊन ये.''

भिजलेली, दमलेली लॅसी तशीच पळत गेली. आजोबांचा शर्ट तोंडात धरून, ती त्यांना बारीक आवाजात आपल्याबरोबर चलण्यास सांगू लागली. वादळवारा आणि पावसानं थैमान घातलं होतं, त्यावरून आजोबा आणि मम्मी समजले की काहीतरी घोटाळा आहे. जिम व फोर्टीही अद्याप घरी आले नव्हते. त्यांनी लगेच मोटार काढली. लॅसी मोटारीपुढे पळत होती. ती त्यांना नदीकिनारी घेऊन आली.

आजोबा व मम्मी धावतच फोर्टीजवळ आले. फोर्टी अजूनही बेशुद्ध होता. आजोबांनी फोर्टीला पालथा घातला. त्याच्या पाठीवर धपाटे मारून पोटातील पाणी बाहेर काढलं. हळुहळू पोटातलं पाणी नाका-तोंडातून बाहेर आल्यामुळे फोर्टी शुद्धीवर आला, आणि सर्वांना हायसं वाटलं. फोर्टीला उचलून आजोबांनी गाडीत ठेवलं आणि लॅसीसह सर्वजण गाडीत बसून घरी आले. आज लॅसीनं स्वत:चा जीव धोक्यात घालून फोर्टीला बाहेर काढलं नसतं तर? ह्या विचारानं सगळ्यांचं मन सुन्न झालं. पण आता फोर्टी पूर्णपणे सावध झाला होता. लॅसी त्याला मायेनं चाटू लागली. फोर्टीच्या जिवावरचं संकट आज पूर्णपणानं टळलं. ही देवाची तर खरंच, पण लॅसीचीच कृपा! □





# कुत्री व तिची पिल्ले

आज लॅसीला घेऊन जिम सकाळीच फिरायला निघाला. वाट नेहमीचीच. झाडाझुडपांतून, दगडांमधून वाट काढत दोघं मजेत चालले होते.

चालता चालता एका ठिकाणी चिखल व पाणी यामध्ये घसरून जिम त्या चिखलात सपशेल आडवा झाला. त्याचे सारे कपडे चिखलानं भरले. तिथूनच त्यानं लॅसीला हाक मारली. लॅसी चालत थोडी पुढे गेली होती. पुन्हा जिमनं हाक मारली, 'लॅसी, लॅसी'. त्याचा स्वर रडवेला झाला होता. लॅसीनं जिमची हाक ऐकली आणि ती जिमजवळ आली. तसा जिम लॅसीला म्हणाला, 'लॅसी, चल आपण घरी जाऊ. हे बघ, माझे कपडे चिखलानं भरले आहेत.' लॅसी जिमच्या मागून निमुटपणे चालू लागली.

थोडं पुढे गेल्यावर एका झाडाच्या मागे लॅसीला कुत्र्याच्या पिल्लांचा आवाज ऐकू आला. जिम तर पुढे पुढे चालतच राहिला. त्याला केव्हा एकदा चिखलानं माखलेले कपडे बदलतो असं झालं होतं. पण लॅसी मात्र आवाजाच्या दिशेनं गेली. पहाते तर काय, एक कुत्री व तिच्या कुशीत तिची गोजिरवाणी चार पिल्लं कुईकुई आवाज काढून वळवळ करत होती !

लॅसीनं त्यांच्याजवळ जाऊन पिल्लांना व कुत्रीला चाटलं आणि ती जायला निघाली. एवढ्यात बाजूच्या झाडामागून वाघाचा छोटा बछडा गुरगुरून त्या पिल्लांजवळ

यायला बघत होता. मग मात्र लॅसी पुन्हा मागे फिरली आणि भुंकून भुंकून तिनं त्या वाघाच्या बछड्याला दूर पळवून लावलं. नंतर तिनं एक-एक पिल्लू तोंडात धरून ढोलीसारख्या असलेल्या जागेत आणून ठेवलं.

थोड्याच वेळात लॅसी घरी आली. घरात सर्वजण जेवायला बसले होते. ती तडक आली आणि तिनं जिमचा शर्ट तोंडात धरला. कुणालाच काही समजेना. मम्मी जिमला म्हणाली, 'जिम, तू जेव पाहू. लॅसी, चल तुलापण मी खाऊ देते.' पण लॅसीनं मम्मीनं दिलेल्या खाऊला तोंड न लावता, ती तशीच धावत बाहेर गेली आणि त्या पिल्लांजवळ आली. पिल्लांना तिथं सुरक्षित पाहून तिला हायसं वाटलं.

लॅसीनं एका पिल्लाला तोंडात धरलं आणि घरामध्ये सामानाच्या खोलीत, जिथं थोडं गवत पसरलेलं होतं तिथं, आणून ठेवलं. पुन्हा जाऊन तिनं दुसरं पिल्लूही आणलं. तिसरं पिल्लू आणायला जाणार एवढ्यात जिम, 'लॅसी, लॅसी' अशी हाक मारत बाहेर आला. तो लॅसी त्याला धावत जाताना दिसली. त्याचवेळी त्याचं लक्ष त्या दोन पिल्लांकडे गेलं आणि त्याला खूपच आनंद झाला. तसाच तो लॅसीच्या मागून पळत गेला.

जिम लॅसीला हाका मारू लागला तेव्हा लॅसीनं भुंकून त्याला जवळ बोलावून घेतलं. पहातो तर काय? एका कुत्रीच्या कुशीत अजून दोन पिल्लं कुईकुई करत होती. जिमनं त्या पिल्लांना मोठ्या प्रेमानं हातात धरलं आणि लॅसीला घेऊन तो घरी आला.

आल्याबरोबर जिम मोठ्यानं ओरडला, "मम्मी, आजोबा, लवकर या. गंमत दाखवतो, लवकर या." मम्मी व आजोबा, जिम का ओरडतो आहे? व कसली गंमत आहे? हे पहाण्यासाठी धावत आले. पहातात तर, त्यांना चार इवली इवली, दोन आठवड्यांची पिल्लं दिसली. मम्मीनं तर पिल्लांना उचलून त्यांचे लाड केले. त्यांना भूक लागली म्हणून तिची कोण धावपळ सुरू झाली. ती घरात गेली आणि तिनं गॅसवर दूध गरम केलं. मग तिनं स्वच्छ हात धुतले व एक रबरी हातमोजा घेऊन तोही तिनं स्वच्छ धुतला, व त्याच्या एका बोटाला भोक पाडलं. जिम हे सारं पहात होता. त्यानं विचारलं, "मम्मी, हे कशाला ग?" मम्मी म्हणाली, "अरे, त्यांना दूध प्यायला येणार नाही म्हणून असं पाजणार." मग मम्मीनं त्यांना दूध पाजलं. पिल्लं फार भुकेलेली होती. त्यांनी भराभर दूध प्यायला सुरुवात केली.


आता सर्वांना त्यांच्या आईची आठवण झाली. तिला तर इथं आणायलाच हवं. मग आजोबा व जिम पिल्लांच्या आईला आणायला गेले. पण पिल्लांचं दुर्दैव! त्यांची आई वाघाच्या भीतीनं पळून गेली होती. खट्टू होऊन जिम व आजोबा परत आले.

छोट्या पिल्लांना वाघाच्या तावडीतून वाचविण्याचं काम लॅ

केलं. आता त्यांना दूध देऊन वाढविण्याचं काम मम्मीनं आपल्या हातात घेतलं. जिमतर त्या पिल्लांभोवतीच घुटमळत राहिला. □

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
ना. क्र. २८७६ दिनांक
विषय बा.वा. क्र.
BVBK-0402776





मनाला भिडलेली घटना कुणालातरी सांगावी, असे तीव्रतेने वाटणे, ही मानवी मनाची अटळ अशी गरज आहे. असे हे सांगणे म्हणजे, या घटनेची, प्रसंगाची आपल्या शब्दांतून, आपल्या दृष्टिकोनातून केलेली एक प्रकारची पुनर्निर्मिती असते. माणसाच्या या मूलभूत गरजेतूनच पुढे त्याची साहित्यनिर्मिती होत असावी. अमेरिकेत 'जॅक ॲण्ड लॅसी' या नावाने एक दूरदर्शनमालिका गाजली. ती पाहता पाहता लेखिकेला गोष्टी स्फुरत गेल्या आणि त्यातून हे पुस्तक निर्माण झाले. परत परत वाचावे आणि रमून जावे असाच हा प्रकार आहे.

**- मंगेश पाडगावकर**